## नीता जयवंत

# रुणुझुणू

# रुणुझुणू

नीता जयवंत

ई साहित्य प्रतिष्ठान

रुणुझुणू

नीता जयवंत

neeta. jaywaant13@gmail. com

fb@https://www.facebook.com/neeta.jaywant

Blog@ http://neetajaywant.blogspot.com

ई प्रकाशक :
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com
ई प्रकाशन : 5 सप्टेंबर २०१६ गणेश चतुर्थी
©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखिकेचे मनोगत

===========

नमस्कार वाचक मित्रहो ,

प्रथम पासून लिखाणाची आवड होती . सहज सुचलं तसं लिहित गेले . लेखन म्हणजे शब्दभावना विचार यांची सुरेख रांगोळी आणि व्यक्त होण्याचं सुंदर माध्यम. या लेखन प्रवासात मनापासून कौतुक करणारे व लिहिण्यास प्रोत्साहित करणारे रसिक भेटले आणि हा लेखन प्रवास वाढत गेला. समाजामध्ये जे विचार चांगले वाटले , जी नाती आपुलकीची वाटली , निसर्गा मधील उत्तम असलेलं जे भावलं ते लेखनातून मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. व्यक्त होण्याचा एक उत्तम साधन म्हणजे हे लेखन. या लेखनासाठी ज्यांच्याकडून कायम प्रोत्साहन मिळालं त्यातील पहिली व्यक्ती कर्नल चंद्रशेखर जयवंत आणि दुसरी व्यक्ती मनस्वी विद्या. तुम्हा दोघांचे खूप खूप आभार जे शब्दात व्यक्त करता येत नाही . या लेखणीतून मनाच्या भावनांना शब्दरूप देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. मराठी साहित्य आणि संस्कृतीला आपले योगदान देणाऱ्या आणि मराठी साहित्यिकांना व्यासपीठ देणाऱ्या ई साहित्य समूहाचे आभार. ई साहित्यच्या उपक्रमाला पुढील प्रवासासाठी शुभेच्छा. लोभ असावा.

नीता जयवंत

मी नीता जयवंत ,



खरं पाहिलं तर ओळख करून द्यावी इतके काही कर्तृत्व मोठे नाही. पण लहानश्या प्रवासातही आपण एकमेकांची ओळख करून घेतो मग या पुस्तक वाचन प्रवासात ही ओळख असावी. खरं तर मूल हे माझे विश्व, गेल्या 31 वर्षात त्यांना शिकवताना त्यांच्यात रमले आणि त्यांच्याकडून खूप काही शिकत गेले. आता निवृत्त झाल्यावर त्या आठवणी, किस्से त्यांचे निष्पाप मन सगळ आठवते . संवाद खुंटला पण मग भावना, विचार यांना शब्द रूप मिळाले अन सुचेल तसे लिहित गेले.

नोकरी, संसार करताना कितीतरी आवडी राहून गेल्या त्या नव्याने पूऱ्या करतेय. जीवनाचा आनंद घेत ते जगतेय. लेखन, अभिवाचन त्याच्या बरोबर चित्रकला, हस्तकला याशिवाय पाककलेत मला नेहमीच रमायला आवडतं. धन्यवाद .

नीता जयवंत

Email Id : neeta.jaywant13@gmail.com

**अर्पण पत्रिका**

========

श्री गणेशाय  नम:




चौदा कला आणि चौसष्ट विद्यांची देवता श्री गणेशा चरणी अर्पण.

नीता जयवंत

=========================================

# प्रस्तावना

नमस्कार वाचकहो,

" रुणुझुणु" ई पुस्तक हातात पडल्यानंतर सुरवातीची काही पाने वाचल्यावर संपूर्ण पुस्तक वाचण्याचा मोह आवरता आला नाही. त्याची अनेक कारणे सांगता येतील. मुख्य कारण म्हणजे जरी लेखिकेचे हे पहिलेच प्रकाशित पुस्तक असले तरी त्यातले अनुभव हे आपल्या रोजच्या जीवनाशी निगडीत आहेत. लेखिकेच्या वेगवेगळया भूमिकेतून उलगडत जाणाऱ्या समृद्ध झालेल्या जाणीवा ते आत्मज्ञाना पर्यंतचा प्रवास आपल्याला लिखाणातून अनुभवायला मिळतो. कौटुंबिक जबाबदारी सांभाळणारी एक स्त्री, एक शिक्षिका, जागृत नागरिक अशा विविध भूमिकेतून अनुभवलेले अनेक किस्से, स्त्री मनाचे कंगोरे, माणसांचे स्वभाव, त्यांचे वागणे, नातेसंबंधांचे अनेक पैलू अश्या अनेक विषयांवर अगदी सोप्या शब्दात केलेले भाष्य आणि ओघवत्या शैलीतील ललित लेखनाने पुस्तकाचे वेगळेपण निश्चित आहे.

शुन्याकडून सुरु होऊन पुन्हा शून्याकडेच संपणारा मानवाचा प्रवास. या मधल्या काळात माणूस जे अनुभवतो ते जीवन. आज बदलत्या जीवनशैलीत आपण मनापासून जगतो का? हा एक प्रश्नच आहे. प्रत्येक जण आज कुठेतरी निघालाय. एका मागोमाग धावतोय, पळतोय, धडपडतोय. पण तो अश्या प्रवासाला निघालाय ज्याला अंत नाही. कारण त्याला कुठे जायचंय हेच ठाऊक नाही. या प्रवासात त्याला क्षणभर विसावा घेण्याचे भान उरलेलं नाही. हा विसावा म्हणजे आपली स्वतःची ओळख. हा

जिवनातील महत्वाचा टप्पा गाठण्यासाठी तरुण पिढीला मार्गदर्शनाची खरी गरज आहे.

“हर तरफ़ लगी है आग, हर तरफ़ उठा है धुआँ

न जाने क्यूँ मेराही घर रेह गया इससे अनछुआँ...”

एक सिरफिरा शायर असतो. त्याला वाटतं “अरे इथे प्रत्येकाला काही ना काही समस्या, दु:ख आहे, कुणाच घर जळत आहे कुठून धुर निघतोय. हा वेडा शायर विचारात पडतो की मीही इथेच तर राहतो मग माझे घर का जळत नाही?”. आज जगण्याची कैफियत अशीच आहे.

कस जगावं? याला जगण्याचे निश्चित सूत्र अस काहीच नाही. ते आपल्याच हातात आहे. आपलं जीवन आपणच समृद्ध करू शकतो. आपल्या जगण्याची दिशा काय असावी हे मात्र या पुस्तकाच्या माध्यमातून निश्चित सापडायला मदत होईल यात शंका नाही.

हे पुस्तक वाचकांसाठी विचारांचा मौलिक ठेवा सिद्ध होईलच यात दुमत नाही. पुढील वाटचालीसाठी लेखिका नीता जयवंत यांना खूप खूप शुभेच्छा आणि शून्याकडून सुरु झालेला लेखिकेच्या भूमिकेतला त्यांचा प्रवास अखंड सुरु राहो, समृद्ध होवो ही सदिच्छा!

मनिष चोगले

# रुणुझुणू

January 3 at 7:34pm

आठवणी आठवायच्या असतात, आठवणी साठवायच्या असतात... आठवणींच्या पसाऱ्यातून त्या अलगद वेचायच्या असतात....... कि आयुष्याच्या झुल्यावर झुलत त्या फक्त कुरवाळायाच्या असतात............ आठवणी असतात गोड खडीसाखरेच्या खड्यासारख्या पटकन विरघळणाऱ्या........... आठवणी असतात गाभूळलेल्या चिंचेसारख्या आंबटगोड चवीच्या. आठवणी असतात कडू काल्र्याच्या चवीच्या पटकन गिळायला लावणाऱ्या.......... काही आठवणी मात्र असतात मउ, मुलायम सुंदर मोर्पिसासारख्या...... फक्त हुळूवारपणे जपायला लावणाऱ्या....................... ! …

================2015=========

December 24, 2015 at 1:34pm ·

# नाक

परवा मुलाना समजावता समजावता मी राजला म्हंटले. " तू चांगली मेहनत कर नाहीतर साक्षी घेऊन जाईल पहिली जागा "याचं ताडकन उत्तर, " टीचर चिंता मत करो, मै उसके नाक के निचेसे ले

जाउंगा" मुलांचे वाद सुरु झाले अन त्याना समजावंता माझा वेळ...... मग लक्षात आले अरे चेहऱ्यावरचा हा ठळक अवयव भारीच भाव खाऊन जातो.

कोणाच्या नाकाखालून कांही पळवणे म्हणजे काही सोपे काम नव्हे, अपार मेहनत करावी लागते. श्वास घेण्याचे साधन असलेला हा अवयव. आपल्या भाषेत महत्वाचे स्थान राखून आहे... मानाने!!! लहानपणी आई नेहमी म्हणायची, आधी नाक शिंकरून ये,,,, आणि मी धावत जायचे,,, कारण मला नाक कापलेली शूर्पणखा आठवायची,, शूर्पणखेचं, नाक कापलं नसतं तर कदाचित वेगळे रामायण घडते,,,, नाक कापलेल्या माणसाचं आयुष्य काय भयंकर असेल नाही? मला वाटतं आपली नेते मंडळी याचं उत्तम उदाहरण असावीत.... सासरी जाणाऱ्या प्रत्येक मुलीला आई हाच सल्ला देत असते, "आमचं नाक खाली होईल असं काही वागू नकोस हो " पण त्यातली गोम आणि खोच कळायला पुलाखालून बरंच पाणी जावं लागत,,,,,,, जाणारी मुलगी आणि येणारी सून,,, सासूबाई साठी येणाऱ्या सूनेचं किंचित आगावू वागणे हे नाकाने कांदे सोलण्या इतके भयंकर असते,,,, सूनही मग यथावकाश ' किती नाक वर करून फिराल याल झकत माझ्या जवळ' 'असं सांगायला मागे पुढे पाहत नाही. नथ घालणाऱ्या नाकाना मोती जड होत असतील का? सरळ नासिकेच्या या ललना नथीचं वजन कसं सहन करत असतील? कि नाकापेक्षा जड मोती त्याना आयुष्य भर सांभाळावा लागत असेल लग्नाच्या दुनियेत नाकाला फार किमंत आहे. चाफेकळी सारख्या सरळ नाकाची इथे चटकन वर्णी लागते. नाकासमोर चालणारा बिच्चारा कितीवेळा तोंडघशी पडतो पण नाकासमोर चालणे सोडत नाही,,,, जग मात्र त्याची टवाळी

करतं...... कामवाल्या ताईची धमकी,,, ती पण नाक सोडत नाही,,,, " ओ म्याडम उग्गाच कायबी बोलू नगा, चार दिस नाय झाले तर नाक रगडीत याल माझ्याकडं "........

'नाकी नऊ आणणे ' हा प्रकार तुम्ही शब्दश: अनुभवलाय कधी? तो घडत असताना पहाणारा, अनुभवणारा हताश होतो, चक्रावून जातो,,,,,,, त्यावेळी सुरा किंवा जंजीर सोडा पण ' नाक खुपसणारा' हि जवळपास नसतो... दुर्दैव !! चेहऱ्यावरचा हा अहं अवयव आम गृहिणी साठी मात्र हिऱ्याची चमचमती चमकी घालण्यासाठी आहे...........

==============

October 15, 2015 ·

**ग्रंथ**

ग्रंथ हेच गुरु, वाचाल तर वाचाल, दिसामाजी काहीतरी वाचीत जावे.. अशा प्रकारची वाक्यं नेहमी ऐकतो पण पुस्तकांशी मैत्री यासारखा दुसरा आनंद नाही. पुस्तकांची दुनिया... या दुनियेत जितक्या लवकर येऊ तितकी हि दुनिया आपल्याला अधिकाधिक समृद्ध बनवते. लहानपणी नवीन पुस्तक मिळाल कि ते हुंगून बघावं वाटे.. तो वास नाकात भरून घेण्याचा एक आगळा नाद होता. आताही तेच होतं पण अधाशीपण कमी झालंय. पुस्तकाला वाचताना त्याकडे एक व्यक्ती म्हणून पाहिलं कि ते आपलंसं होतं, अंतरंगात उतरतं. वाचनाच्या या प्रवासाची सुरवात चांदोबा पासून झाली अन मग समोर येईल त्याचा वाचून फडशा

पाडायचा एवढच ठाऊक झालं. आज तर खऱ्या अर्थाने हि पुस्तकं मित्र बनलीत.... तिन्ही सांजेची कातर वेळ... असे वाटते हि संध्याकाळ जणू आक्रमक होतेय.... अंगावर येतेय आणि मग आधार बनून तो पुस्तक नावाचा मित्र साथ देतो..................

================

October 5, 2015 ·

क्षण

येते क्षण जाते क्षण, येत्यांचं स्वागत अन जात्याना अलविदा. पण खरंच अलविदा म्हणून हे क्षण जातात का? नाठाळ, अवखळ, प्रेमळ असे हे क्षण कायमच आजूबाजूला घोटाळत असतात. जरा मनस्वी होताच, नजरेन खुणावतात, कानाना हलका स्पर्श करून जातात. कुठली सफर कुठे अन अन कशी घडवतील कळतच नाही, वाऱ्या च्या थंड झुळकी सारखे सुखावतील तर क्वचित डोळयांच्या कडा पाणावून टाकतील. एखाद्या उतारावर सप्तपदीची आठवण तर कधी लहानपणीच्या सवंगड्याला विट्टी लागून झालेली भळभळती जखम, जीवनाच्या सारीपाटावरची अचानकपणे हरलेली खेळी आवडत्या कवियित्री च्या सुरेख ओळी,, कधी सहकाऱ्यां मधले मार्मिक संवाद,, पुस्तकातल्या लेखनाचा खोलवर स्पर्श, एखाद्या चर्चेतील अधोरेखित विधान, आवडत्या व्यक्तिमत्वाच्या मनातं रेंगाळणाऱ्या खुणा, आपल्या आवडत्या माणसाला भेटण्याची मनातील अतृप्त इच्छा. एक ना अनेक............ क्षणांचं हे रिंगण सभोवताली सुरेख गुंफलेल, एकातून दुसऱ्यात, मग तिसऱ्यात, हे सारेच क्षण आपल्या आठ्वणींचं सामान घेऊन फिरणारे, न कळतच त्याचा भार वहाणारे. त्या

क्षणा कडून त्या व्यक्तींकडून हे सामान या आठवणी फक्त गोळा करायच्या..... मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है......... असं म्हणत.

================

September 8, 2015 ·

मन

माणसाचं मन हे एखाद्या निबिड अरण्यासारखं असतं, भावभावनांची अनलिमिटेड झाड, कधी ती आडवी तिडवी फोफावतात, कधी सरळ वाढतात, कधी अळी पडून किडतात, आसक्तीचे तण, रागाची फळ ......सहानुभू ती, उद्वेग, मोह -निर्मोह, एकटेपण, दुस्वास, कुतूहल यादी कितीतरी वाढेल पण या सर्व वाढणाऱ्या भाव भावनांतून कोणती झाडे मुळातून नाहीशी करायची, कोणती निगराणीने जपायची हे मात्र आपणच ठरवायचं. फोफावलेले नतद्रष्ट तण अलगद उपटून फेकायचे. समभाव अन प्रेमभाव वाढीला लागले कि मनाची जमीनही हिरवी गार होते ......

=================

August 1, 2015 ·

मन, त्याचं अंतरंग अन त्याचे अनेकानेक कप्पे. या कप्प्यातून निर्माण होणाऱ्या अनंत भावना चांगल्या -वाइट, आनंदी -उदासीन, क्रौर्य -

दया, सयंत-अधीर सगळाच गुंता न सुटणारा. हे मन म्हणजे अनेक रंगांचे मिश्रण, कोणता रंग किती आणि कसा ओघळेल.... कसं सांगावे? पण उत्तम चित्रकार मात्र या रंगातून सुरेख अन लोभसवाणं चित्र साकारतो. पण या रंगान वरचं नियंत्रण सुटल कि हेच रंग भडक, ओंगळवाणे, फिकट, बटबटीत वाटू लागतात. भावना अनेक रंग अनेक ! आहे प्रत्येक भावनेला रंग, पण आनंदाला किनार आहे हास्याची. प्रत्येक भावनेलाही असावी का किनार? उदासीनता हि अशीच एक भावना काळसर राखाडी रंगाची, अचानक मनावर पसरणारी, मनावर पसरताना शरीराचा ताबा घेणारी..... पण या उदासीनते मागे लुकलुकतात आशेचे किरण आपल्या आगमनाची वर्दी देत......

===================

May 14, 2015 ·

जो जन्माला आला, तो आज ना उद्या मरणाला सामोरा जाणार हे तर ढळढळीत सत्य आहे. तरीपण ' हे मृत्यो मला आपल्या कवेत घे' म्हणणाऱ्याला मरण हूल देत, पण मला मरणाची भीती वाटते असे सांगणाऱ्याला मात्र अलगद आपल्या कुशीत घेत. या मरणाचा बाज कधी कळलाच नाही. अवेळी घाला अन वेळ संपूनही येरझारा. या मरणाला कधी दया माया वाटत नसेल का? कि फक्त कठोर कर्तव्याचं पालनच करतो तो? हे मात्र खरं कि मरणाला हुलकावणी देऊन जगणाऱ्या वर बारकाईने

लक्ष ठेवतच असणार तो. कधी कधी जिवंतपणी अनेक मरणे मरावी लागतात, आठवणीत जिवंत राहण्यासाठी..........

==================

May 9, 2015 ·

विविध प्रकारची नाती अन त्यांचे धागे यात आपण पूर्ण अडकलेले असतो. काही नाती जन्मान जडतात तर काही, आपणच सोयीस्कर जोडून घेतो. काही प्रवासात जोडलेली नाती तर काही जिवन प्रवाहातून तोडलेली नाती, काही दूरस्थ आणि काही हृदयस्थ, हवीहवीशी! या नात्यांचे रेशमी मऊपण टिकवायचे असेल तर किती पथ्य पाळावी लागतात,.... याचं कारण हि तितकंच हळवं असतं, समोरचा दुखावला जाऊ नये. मधाचं गोडपण कायम ठेवायचं पण मधमाशीचा डंख मात्र टाळायचा. जिभेवरची खडीसाखर संपते कधी तरी, आपलं मनोस्वास्थ्य टिकवण्यासाठी धडपड करावीच लागते. त्रासिक चेहऱ्याने सगळे मुद्दे नाही ना सोडवता येत... कशाला गोड गोड बोलायचं? का म्हणून अन्याय सहन करायचा? पण मग लक्षात येत थोडंसं झुकलो तर विसंवाद सुसंवाद कडे वळतोय, आशेचे लुकलुकते तारे समोर येतात. आत्मसन्मानाचा तो बिंदू खाली वर होऊ लागतो. नात्यातला ओलावा टिकवायचा तर 'मी' पण थोडं बाजूला सारायचं.... प्रत्येकालाच हवी असते शांतता, जीवनाला अर्थपूर्ण बनवणारी, नात्याचे स्पर्श जपणारी ! नात्यांच्या या संवादात अभिनिवेश नाही पण सौम्यता असावी. एक तुटत नातं आपोआप जपलं जातं.

========================

April 27, 2015 ·

संकल्प अन सिद्धी या किती विजोड विचारधारा आहेत ना..? संकल्प ढीगभर होतात पण ते, केलेले संकल्प सिद्धीला नेण्याची ची कुवत मात्र टीचभर असते आपल्याजवळ. {अर्थात नियमाला अपवाद असतात ह }येणार नवीन वर्ष, डॉक्टरची भेट, बऱ्याच काळाने घेतलेली मैत्रिणीची मुलाखत, अन अशाच अनेक गोष्टी, संकल्पाना चालना देतात. पण हे नवे संकल्प सुफल संपूर्ण होतीलच याची मात्र धागधुग असते. आतला आवाज सिद्धीकडे जाण्याचा आग्रह करत असतो, पण मनाचा थकलेला दुसरा आवाज मात्र असहकार दाखवतो. क्वचित मोहाच्या मांजरीही आडव्या जातात. कधी कधी मनाची मनाशी गट्टी जमते आपलं वैयक्तिक सुख काय आहे याचं गणित पक्क समजत (? ) अन मग कोणाला काय वाटो याची पर्वा न करता संकल्प सिद्धी कडे वळवले जातात. केलेले संकल्प जाहीर करणे तसं घातकच कारण नामुष्कीची आपल्यावरची वेळ, ती टाळणे हे परत आपल्याच हातात. या बाबतीत निरागस मुल बरी, नाही जमल तर कबूल करून मोकळी होतात, आम्ही मात्र कारण देतो. यापेक्षा लहानपणचे ते छोटे छोटे संकल्प आठवतात, जिवाचा आटापिटा करून ते पूर्ण करायचे अन मोठ्यांकडून शाबासकी घ्यायची. आता नवीन वर्ष यायला खूप अवकाश आहे................. अन शाबासकी कोण देणार आहे?

===================

April 21, 2015 ·

अनेकानेक नाती आणि त्यांच्या अनंत छटा, नाती विश्वासाची मनान मनाशी जपलेली. अनेक रंग, अनेक बंध, अगणित छटा. या नात्यांची त्रिसूत्री मात्र जपायला हवी.... प्रेम, संरक्षण अन विश्वास ! दोन मनांचे श्वास एकत्र येण्यास विश्वास हवा असतो. आपल्याच माणसांवर दाखवलेला विश्वास त्याचं आपल्यावरील प्रेम वाढवण्यासाठी पुरेसा असतो नव्हे नात्यांची निव तो मजबूत करतो. जिथे प्रेम असते तिथे आपले नात्या विषयीचे भावबंध कोमल असतात, अशावेळी वर्चस्वाची हलकी छटा मनमोहक ठरते, पण कायम वर्चस्वाखाली रहाणे क्वचित संशयाच्या वर्तुळात फिरणे विश्वासाला तडा आणते. कोणत्याही नात्यात विश्वास अक्षय असावा त्याचा क्षय म्हणजे प्रेमाची अन नात्याची सांगता.

=====================

April 8, 2015 ·

इच्छा अन गरजा यांचं प्रमाण किती व्यस्त आहे नाही? गरजा खरं तर कमीत कमी असतात पण इच्छा, त्या मात्र पोत भर !(पोट भर ) गरजेच्या कमीत कमी वस्तुत आपण आनंदी राहू शकतो. पण इच्छे च्या घोड्यावर स्वार होवून आनंदी होण्याचा सोपा मार्ग सापडत मात्र नाही. गरज आणि इच्छा या जुळया बहिणीं सारख्या असाव्यात. गरजेपोटी माणूस अक्कल गहाण टाकतो पण इच्छा, त्याला प्रयत्नांचं पाहिलं पाउल उचलण्यास प्रवृत्त करते. गरजेचे बियाणे प्रगतीच्या पिकाकडे अलगद जाते. तसं इच्छा अन उत्साह यांचही एक सुरेख नातं आहे, इच्छेने उत्साह वाढतो

आणि प्रयत्नाच्या वळणावर आपल्याला न कळतच येता येत...... पृथ्वी प्रदक्षिणेची इच्छा आहे, पाहू काय होतं?

=====================

April 4, 2015 ·

' केवळ काही क्षणांच्या उशिराने तोंडातील घास निसटू शकतो', हे ज्याला समजते त्याला वेळ कळते. पण हे खरंच खरं आहे का? कारण लोक कुत्रा पाळतील, मांजर पाळतील, पण त्याना वेळ पाळायला सांगा...... अजिबात पाळणार नाहीत. खरं तर आयुष्यात सर्वात महत्वाचे काय असेल तर तो वेळ, पण या वेळेचं उल्लंघन माणूस सतत करतो. आपल्या मनोवृत्तीत बदल केला तर वेळ आपोआप पाळता येते. पण ती वेळच आपण आपल्यावर आणत नाही. वेळ काही सांगून येत नाही आपल्याला, म्हणूनच आपण तिला किमंत देत नाही का? पण खरं सांगू...? वेळ राखायचा असेल तर, तो काढायला शिकलं पाहिजे. शिकणं आलं कि व्यवस्थापन आलं आखणी आली, आखणी केली तर कदाचित भविष्य सुसह्य करता येईल. वेगे धावणारा ससा अन नेटाने चालत कासव यांची मोट बांधली पाहिजे. आपल्याला दिलेल्या वेळेत स्वतःला सिद्ध करणं ही तारे वरची कसरत असते, अन सहज साध्य प्रत्येकाला होतेच असं नाही. वेळ वाचवणे हे एक तंत्र आहे, थोडी मश्क्कत, थोडी सावधनता आपल्याला बचतीच्या लक्षाकडे नेते. वेळ बदलाचं हत्यार निसर्गाकडे ही आहे तो ही शिकवतोच कि ते आपल्याला.

====================

March 27, 2015 ·

तंत्रज्ञानाने किती प्रगती केलीये नाही? हे थोडं अधिक प्रगत करून आपल्याच काही हरवलेल्या वस्तू मिळवता आल्या तर, जसं घड्याळ, चष्मा, चिल्लर ठेवलेली चिमुकली पर्स, यादी तशी लांबवता येईल पण मुद्दा तो नाही.... आपल्याच घरात आपणच चुकून इथे तिथे ठेवलेल्या वस्तू.. आपण त्या वस्तूच्या नावाने मारलेल्या हाकेसरशी विशिष्ठ आवाज करतील अन मग काय सापडली कि ती वस्तू. मला तर बाई भारी आवडेल असं काही, मेंदूला पण आराम थोडासा. रोज उठून शोध शोधीचा वेळहि वाचेल.

--------------------------------

March 24, 2015 ·

आपण केलेल्या एखाद्या छोट्याश्या गोष्टीचा कोणालातरी आनंद होतोय हे लक्षात आल्यावर तिच गोष्ट, आपण त्या व्यक्तीसाठी परत परत करतो, त्या आनंदाचा पुनःप्रत्यय त्याला देत रहातो त्यात गैर काहीच नाही..... ती आहे सहृदयता, समोरच्याची घेतलेली काळजी !

--------------------------------

March 22, 2015 ·

काय चांगले करता येईल याचा विचार करण्या परिस ते करून मोकळे व्हावे.... March 20, 2015 ·

छोट्यांच्या नजरेतून जग पाहिले कि ते जास्त चांगले, जास्त सुंदर वाटते..... !!

====================

March 16, 2015 ·

माणसाचं आपल्या आयुष्यातून निघून जाणं जसं अन जितक अचानक असतं तितकंच मागे असलेल्याला त्याला विसरणं अशक्य असतं. जाणारा अलविदा म्हणून निरोप घेतो, सारवासारव करतो, तर कधी निरोप घेण्याची संधी ही नियती त्याला देत नाही. काल ज्याच्या अपार आनंदात आपण सहभागी होतो आज त्याच्याच अंत्ययात्रेत सामील होण्याची वेळ येते........ आणि मग आपण आठवत रहातो त्याने आपल्या आयुष्यात काढलेल्या रेघा अन थेंबांची रांगोळी. मनातं येतात सुरेश भटांच्या दोन ओळी...... दिवस हे जाती कसे, अन ऋतू असे छळतात का? विसरतो आहे तुला पण, आसवे ढळतात का?

===================

March 11, 2015 ·

जेंव्हा आपण बराच काळ एकमेकांच्या सहवासात असतो, कामानिमित्त एकत्र येतो तेंव्हा मनामनांच्या रंगांचा एक गोफ आपल्याही न कळत गुंफला जातो याचे रंग कधी गडद होतात कधी फ़िकुटतात, त्यांच्या सूक्ष्म छटा मनाचा मूड बदलतात. रंग पंचमीचा खेळ हि खेळला जातो पण अचानक एखादी रंग छटा मनावर अधिराज्य करते अन सारच बिनसतं...... बिघडत !

===================

February 25, 2015 ·

मन तसं कोणालाच जुमानत नाही. त्याचं म्हणणं ते सतत पुढे रेटत असतं... मन मानी चा प्रयत्न अढळपणे चालू असतो. हा पाठलाग, हि आवर्तन चालू असतात त्या 'मितवा ' साठी. हा मितवा म्हणजे आवडणार काहीही, रानफुलापासून ते क्षितिजावंर मंदावणाऱ्या चांदणफुला पर्यंत कोणीही मितवा होवू शकतो. दिवास्वप्न पहाणार मन पाहता पाहता समोरच्या दृश्यात विरघळून जातं. आणि मग शकतो. दिवास्वप्न पहाणार मन पाहता पाहता समोरच्या दृश्यात विरघळून जातं. आणि मग तो पक्षी, ते फुल, ते निळ आभाळ.. ते अस्तावणार सूर्य बिंब डोळयातून थेट मनातं जातं आणि मग 'मन मितवा' होतं.

हा होणारा मितवा मग मन व्यापून टाकतो. येणारा प्रत्येक क्षण जणू या मितवा साठी जगायचा. निसर्गातिल या सुंदर गोष्टींशी मैत्र तर होतंच पण ते एका अतूट अन अदृश्य बंधनातं बांधल जातं. मन कायम या सुंदर मैत्राचा मागोवा घेत, चाहूल घेत. आपल्याही नकळत मनावर एक जादुई लहर फिरते. आपल्या अपेक्षा वाढतच जातात. मनातंलं सगळं सुंदर असं हवं असण, अन ते मितवा कडून आपल्याला मिळण्याची मक्तेदारी मन मानायला लागत. अमुर्ताकडून मुर्ता कडचा प्रवास न कळतच सुरु होतो. 'मन मानी'च्या सुंदर कल्पना, सुंदर स्वप्न ! जो पर्यंत मन आहे 'मितवा ' आहे. त्याच्या बरोबरचा हर एक क्षण मी विसरू शकत नाही.

===================

February 20, 2015 ·

आठवणींच्या बटव्यात चाचपडताना अचानकच हाती लागतो रेशीम गाठींचा एक गुंता थोडाफार गुंतलेला, पण मऊशार! धागे एकात एक गुंतलेले, क्वचित थोडेसे मळलेले पण उलगडले तर हलके हलके सुटणारे त्यांचा स्पर्श मनाला सुखवतो हळूवार हाताने कुरवाळावासा वाटतो तो गुंता स्पर्शाची जादू त्यांना एकमेकांपासून अलग करते. त्यांचं ते सुटण, एकमेकांपासून अलग होण, नकळतच मनातं लहरी उठवत, मनाच्या बांधावर फुटणाऱ्या लाटा ओठावर एक हलक स्मित आणतात.

====================

February 18, 2015 ·

माणूस आहोत चुका या होतातच ……फ़क्त केलेल्या चुकांची जाणीव हवी, आणि संधी मिळताच त्या सुधारण्याची पात्रता अंगी हवी. समाजात रहाताना आपण दुसऱ्याला मदत करतो, आपले मानून त्यांच्या जवळ जातो, विचारपूस करतो. कोणालाही जास्तीतजास्त कसे उपयोगी पडता येईल ते पाहतो ……साथी हाथ बढाना हा रुजलेला मंत्र जपतो.. आणि काळाच्या ओघात लक्षात येत आपलं त्याच्यासाठीच करणं ही चूक होती,,,,,,,,,, हे दुःख मनातं डाचत रहात. मन आपलीच समजूत घालत. काय तर, 'त्या काळासाठी त्या कामावर आपली नेमणूक होती' …मनाचं समाधान................ !!

====================

February 12, 2015 ·

जे शब्दात सा़ंगता येते, त्यात सांगण्या सारखे असतेच, पण शब्दांच्या पलिकडलेही एक जग असते...... भावनांनचे, त्या मात्र समजाव्या लागतात.....

====================

January 29, 2015 ·

तसे ते दोघे नात्याचे नसले तरी मनातंले मात्र खास, सख्खे शेजारी ! शेजारी असले तरी दोघ बरोबर क्वचितच येतात. ती मात्र आली कि धो धो कोसळते, तिच्या मनातं दाटलेल्या ढगांचा निचरा होईपर्यंत. या उच्चशिक्षित जोडीतले नात्याचे पदर अत्यंत हळूवार पण तितकेच एकमेकात गुंतलेले. दोघांजवळचा अहम शिगेला पोहचलेला. 'तिची वागण्याची पद्धत बालिश अन मूर्ख.... इति तो', तर 'हा म्हणजे व्यवहारी पणाचा अर्क.... इति ती'. त्याच्या जवळ सुखी संसाराचं सुरेख चित्र आहे पण ते चित्र अधिक उठावदार करणारी फ्रेम त्यांना मिळत नाही. भावना न समजून घेता त्या भावनांचा पाणउतारा करण्याची जणू स्पर्धाच.. हा एकमेकान बरोबरचा प्रवास ते अधिक आनंद दायी करू शकतात, एकमेकांच्या साथीने एकदुसर्याला समजून घेत. हे नातं अधिक रंगतदार होईल, पण एकमेकांचा सन्मान करूनच.

====================

January 14, 2015 ·

या ऋणानुबंधाच्या गाठी नकळतच रेशीम गाठी बनतात. आयुष्यात येणार कोणतही नातं हे प्रेमाने जपलं तर ते नक्कीच फुलत. अनेकानेक कंगोरे या नात्यांचे, फुलवावे तसे फुलतात. तोडायलाही वेळ

लागत नाही सारा शब्दांचा खेळ अन भावनांच्या लहरी. आयुष्यात येणारी व्यक्ती परिसा सारखीच असते त्याच्या परिस स्पर्शाने आपण सुवर्णमय व्हायचं. नात्यांच्या या भव सागरात तरून जाणं तसं अवघडच..... पण योग्य सुकाणूने नाव पैलतीर गाठते तसंच काहीस. नात्यातले व्यवहार आणि व्यवहारातील नाती... सगळंच अनाकलनीय. कधी वाटेवरचा वाटसरू आधार देतो अन कधी आधाराची माणसं पाठ फिरवतात. नात्यांना ओढ असावी नाते जपण्याची !!

====================

January 13, 2015 ·

जसा जसा संधिप्रकाश गडद होत जातो, हवेतला सुखद गारवाही वाढत जातो. समोरचा प्राजक्त चांदण्यांच्या अदभूत प्रकाशात परिमळून जातो. असंख्य चांदण्यांनी या झाडावर टाकलेला प्रकाश झाडाचं स्वयं तेज अजूनच खुलवत. अपुऱ्या प्रकाशी पण, हे झाड सुंदरच दिसते. त्याचा हलका सुगंध हवेत जणू आपली लहर फिरवतो. रात्री झाडावर फुललेला हा संभार सकाळ होता होता अलगद खालच्या मातीलाही सुगंधित करतो, मऊ मुलायम पांढरा केशरी गालीचा आपलं लक्ष वेधून घेतो. मातीत पडलेली हि फुले वेचताना मन ही तितकंच कोमल होतं. जमिनीवरची टवटवीत फुले ओंजळीत आली कि का कोणजाणे मलूल वाटू लागतात. पडण्यापासून वेचण्या पर्यंत चा आनंद मात्र सुबक असतो. फुले शेजारी पडोत कि आपल्या अंगणात सुवासाच्या लहरी मात्र येतच राहतात......

====================

January 8, 2015 ·

बोटाला अजाणते पणी टोचलेला काटा ओठातून वेदनेचा हुंकार आणतो तर, जाणीव पूर्वक मनाला टोचलेले शब्दांचे काटे मन नक्कीच जखमी करत असतील....

===============2014=========

December 29, 2014 ·

वर्षामागून वर्ष सरतात तसंच अजून एक वर्ष सरल. शेवटचा आठवडा या सरत्या वर्षाची अधिक जाणीव करून देतो. जमा -खर्च मांडावा इतक मोठेपण हि नसतं पण छोट्या छोट्या गोष्टी आठवत रहातात. शब्दांनी जोडलेली अनेकानेक नाती, झाडे -वेली, दगड -धोंडे, फुले रंग यातलं पाहिलेलं पण न जाणवलेलं सौंदर्य आठवत. मनाच्या बासरीवर वाजणारी सुमधुर धून किंवा गीत आठवते. आठवतात ते भावभिने संवाद ! डोळ्यासमोर येतो एखादा सुरेख संदेश, हृदयाने न कळत जपलेले प्रेमळ क्षण आठवतात........ आठवतात उणीवा आपल्यातल्याच, आपल्याच मनाची ओळख पटताना माझ्यातील मी पटकन गवसली वाटते.... या 'मी' शी गट्टी होताना काळ जातच असतो संधी, क्षमता अन सिध्द करणे यात झिरपलेला काळ दिसत रहातो. आजूबाजूची कलात्मकता पाहिली की मन परत ओढ घेते त्या अदृश्या कडे...... नवीन वर्ष नवीन आशा, नवे बहाणे !!!

====================================

===========

December 18, 2014 ·

व्यक्ती चित्रांची रांगोळी रेखतांना तोलून मापून, हुबेहूब, बारीकसारीक तपशील, मत या सर्वांचं उठावदार मिश्रण व्हावं लागतं. पण गप्पा मारणाऱ्या माणसांचं तसं नाही, त्यांच्याबद्दल आपण मनाशी ठरवत असतो. आवडलेल्या न भावलेल्या गप्पिष्ट माणसांचे बाज परत परत नजरे समोर येत रहातात......... काहींच्या गप्पा ऐकत रहाणे हा आनंद दायी सोहळा असतो. समोर बसायचं कान त्यांच्या हवाली करायचे... शुद्ध वाणी, प्रांजळ निवेदन, ओघवती शैली वेळ अन काळ विसरून जायला होतं. वर्णनपर कथनातं काही माणसं अगदी बुडून जातात अन आपल्यालाही छान पैकी तळापर्यंत नेतात त्यांच्या सोबतच गप्पांचं ते पाणी नाका तोंडात जायला लागलं कि काठ गाठायची आपली धडपड सुरु होते. कधी आपण गुदमरतो पण हात मारून बाहेर येण्यात यशस्वीही होतो. काठावरून आठवलं, गप्पांसाठी काठावर गळ टाकून बसलेली काही कमी नसतात. संभाषणात ओढून आपल्याला बोलत करणारे 'गप्पाधर'. बाहेर पडताना बोलायची कितीही इच्छा नसताना तुम्हाला बोलणे भाग पाडतात असे लोक. काहीजण 'मौकापरस्त' संधी मिळाली की 'स' च्या सुतावरून भाषणाकडे वळणारे. याना वेळ काळ याचं भान बहुदा नसतं. उद्देश, फक्त संवाद वाढवणे. फोन वरून समोरच्याला ५/७ मिनिटे केवळ मलाच ऐका असेही असतात. फोन आपण करावा दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी.... तर झडप घातल्यासारखं यांचं पाहिलं वाक्य, "शुभेच्छा दिवाळीच्या, फराळाला या ह, कसं चाललंय " फोन आपण केलेला, पण यांचं आधी ऐकून घ्यावं लागत. आपलं बोलणं ते भक्कमपणे

लावून धरतात. मुद्देसूद, प्रभावी, समोरच्याच्या मनातं अचूक शिरून मन काबीज करणारी माणसं तशी कमीच यांचा जनमानसातील पडणारा प्रभाव व लोकप्रियता वादातीत असते, अशी माणसं मनातं घर करतात. sarcastically बोलणारी माणसं कधी मनोरंजन करतात तर कधी धडा शिकवतात, सरळ संभाषणातून तिरपागड बोलायची हि सवय, विचार करायला लावते... माणसे अन त्यांच्या गप्पा... हे सगळं आठवत तेंव्हा कुठेतरी हलक स्मित चेहऱ्या वर येत नक्कीच.

=================

December 15, 2014 ·

आपण आणि माणसे यांच्यात जेंव्हा 'प्रत्यक्षता' येते, म्हणजेच त्यांची प्रत्यक्ष भेट, तो अनुभव मनाला उत्साहित व आनंदी करणारा असतो. आतुर मनाचे आडाखे क्वचित जुळतात अन निखळतातही. पण भेटी लोभावणाऱ्याही ठरतात. माणसं जोडणं हे शेवटी आपल्याच हाती. जोडलेल्या माणसांवर आपण लोभ केला कि ती आपलीशी होतात आपल्याही न कळत. लोभ अन प्रेम हा त्या माणसाना आपल्याशी जोडणारा मनोहारी साकव आहे. हा साकव क्वचित डगमगतो, पड्झडतो पण समजूतदारपणा आणि विश्वास त्याला पड्झडी पासून वाचवतात. जुळलेल्या नात्यांची सुंदरशी मेहेफील परत साकार होते. माणसांच्या नात्यांना नवी पालवी फुटते ती अधिक तजेलदार बनतात. जीवनाच्या सरत्या वळणावर अशी विलोभनीय माणसे संग्रही असणं म्हणजे भाग्यच !

==================

December 8, 2014 ·

कधी कधी वाटतं आपल्या अस्तित्वाची दृश्य अन प्रकट खुण राहूच नये कुठे. वाऱ्याच्या नाजूक झुळकीसारखं यावं फुलाना, पानाना, कळ्याना डुलवावं. पाखरांच्या पंखावर क्षणभर तरंगावं सुंदरतेच्या सुमानांवारचे दव न कळत टिपून घ्यावेत अन कुठे तरी विरून जावं. विरता विरता एका अनमोल गंधाला साथ द्यावी. कसलीही खूण या जगात ठेवू नये. पण हे लोभी मन असं करू देत नाही. साथ अन खूणा न कळतच मागे रहातात. आकाशीचा चंद्र हि मग खूण म्हणून समोर येतो. मिळालेली छोटीशीच भेटवस्तू पण देणाऱ्याने नाव मात्र आठवणीने लिहिलेलं असतं. नाव न लिहिताही त्या भेट वस्तूचं मोल कमी होत नाही अन वाढतही नाही. प्रत्येक चेहरा वेगळा, प्रत्येकाच्या अस्तित्व खुणा वेगळया. मनाचे मनाशी नाते जुळताना हि का अशाच खूणा मागे रहातात? प्रेम का कृत्रिम खुणांनी ओळखायच..? ती तर हृदयाची भाषा आहे. समजून घेण्याची. कळीचं फुल होताना कळी आपलं अस्तित्व पुसते अन फुल होते..... खूणा कितीही पुसल्या तरी फिरून उमटतात. अन पांढरा शुभ्र चांदवा मन लहरींवर प्रेमाची खूण बनून रहातो.

==================

December 4, 2014 ·

"भेटी लागी जीवा लागलीसे आस " म्हणताना भेट घडेलच असं नाही आणि ध्यानी मनी नसताना भेटीचा सुरेखसा नजराणा पुढे येईल यांसारखं सुख नाही. अश्या आयुष्यात येणाऱ्या भेटी अन त्यांचे किस्से प्रत्येकाचे वेगळे, कदाचित रोमहर्षक हि. आयुष्यात येणाऱ्या भेटी मन सुखावणाऱ्या मनाची उभारी वाढवणाऱ्या असल्या, तर सोनेपे सुहागा ! या भेटींच्या अनेक रंगछटा हि आहेत गडद, उजळ, फ़िकुट्लेल्या, कदाचित भेटीची कारणे या छटाना रंग देत असतील.

ठरवलेली भेट, मनाचे दरवाजे उघडून तयार असते, काय बोलायचं, किती मापून, किती तोलून, समोरच्याला जोखत..... पण अचानक झालेली भेट मात्र आनंदून टाकते काय, कसं, किती याला सीमा नसते. सरीवर सरी शब्दांच्या बरसतच रहातात.. भेटीत श्रेष्ठ -कनिष्ठ असा भाव नाही करता येत. प्रत्येक भेट, ग्रेट भेट !.. हो, ती आणि आभासी जगातील असेल तर......? रोजचा mute फोटो अचानक बोलका होतो. काय, कसे अन किती सांगावे हे अडथळे दूर होत माणसं आनंदाच्या समेवर येतात.

ह्या भेटीचा निखळ आनंद मन न कळतच घेत रहात. सुरावटीतले शब्द सहजच वेचत राहाते. सुंदर, अनमोल सापडतं ही कधीतरी पण भेटीचं मोल कमी होत नाही. प्रत्येक भेट ही अवर्णनीय असावी असं जरुरी नाही. या भेटीची मजा, आनंद lollipop सारखा चघळण्यात गंमत असते. हवीहवीशी भेट घडणं तसं थोडं कठीणच. काही व्यक्ती अन त्यांच्या भेटी या कल्पनेनेच करायच्या...... मुलाखातकर्ती होता आलं तर?

December 2, 2014 ·

जिवनातील प्रत्येक नातं हे एखद्या कोन्द्णासारखं असतं, कधी यात तेजस्वी स्वच्छ मोती असतो, कधी लखलखता हिरा. प्रत्येक नात्याचं महत्व हि तसंच असतं. नात्यांच्या फेसाळत्या लाटा मनाच्या बांधावर सतत फुटतच असतात. या फुटत्या लाटात कधी ओलचिंब होवून जातो तर कधी कोरडेच परततो. नात्याचा हा गजरा रंगबिरंगी खराच. चमचमती कलाबूत अलगद सुटते अन कच्चा धागा गजरा मजबूत करतो. नातीही अशीच.....

काही नाती जवळीक साधून संपर्कात रहातात, तर काही संपर्क कक्षेच्या बाहेर जातात. धुमधडाक्यात वाजतगाजत येणारी नाती अलगद शांत होतात तर पाउल न वाजवता येणारी नाती रुजतात -वाढतात अन कायमची आपली होतात. वडाच्या पारंब्या सारखी ! दूर वाटणारी, पण खोल रुजलेली हि नाती मनाला हुरूप देतात. न कळतच जाणवणारी त्यांची चाहूल मनाला आनंदी करते राग -लोभ, रुसवे फुगवे, सुख - दु:ख या लहरी तर नात्यात उमटतच रहातात, पण नाती टिकतात ती प्रेम अन विश्वासावर. तुटलेलं नातं अन त्या नात्याने दिलेल्या जखमा भरायला वेळ लागतोच. आपण आणि आपल्या बरोबरची नाती श्वासारखी असतात.... जिवन संपत येत नात्यांची कर्ज मात्र वाढतच जातात.

November 18, 2014 ·

एक माणूस दुसऱ्यापेक्षा संपूर्ण वेगळा असतो पण पण माणसांचे आतील थर मात्र एकमेकाना जुळत असतात. त्यांच्यातील दया -माया क्षमा

- शांती प्रेम - द्वेष याची प्रतवारी वेगळी असेल पण. मुळात ते अंतरंगात असतात. माणसांचे नाते संबंधातील गुंते अन ते सोडवतानाची फरफट अनाकलनीय असते..... गुंता सुटत नाही जास्त अवघड होतो. हारणं किंवा जिंकणे कशाचीही  तयारी होत नाही. या सबंधाना कधी किनार हि असते, क्वचित ते उसवलेले वाटतात क्वचीत रेशीम धाग्या सारखे जुळून हि येतात.

जन्मापासून मिळणारे संबंध आणि निर्माण केलेले सबंध.... यात दुसरे संबंध जास्त विचार करायला लावतात. जन्माने येणारे नातेसंबंध निवड करू देत नाहीत पण जुळवून येणारे नाते मात्र वाढवता येते, प्रेमाने जोपासता येते... ते जास्त रोचक बनवता येते, या नात्यांकडे जर आपुलकीने, समंजसपणे पाहिले तर एकटेपणाचे निर्णय होऊ शकणार नाहीत. नात्यांची पाळमुळं अधिक खोलवर रुजतील...

....................

November 15, 2014 ·

इथे तिथे सर्व दूर, तूच भरून राहिलास  प्राणप्रिय होता होता, प्राणवायू झालास  किरण हि तू, आभा हि तू  जीवन भराची साऱ्या, अभिलाषाही तू  नसलास कि तू, जीव वेडावून जाई  तेवती वात मनाची अजाणता क्षीण होई.

October 31, 2014 ·

घरातील 'माझी प्रतिमा' आणि जनमानसातील 'मी' या मध्ये कधी कधी खूप अंतर असतं. कारण मी जशी आहे तशी मी नाही, हे मी जाणीव पूर्वक दाखवत असते. मुलाखतकार 'सेलिब्रेटी 'ना एक प्रश्न आवर्जून विचारतात.... हे /ह्या घरात कसे असतात? उत्तर ऐकायला आपणही उत्सुक असतो.... कारण तो बाहेर वठवत असलेली भूमिका आणि प्रत्यक्षातला तो, यातून त्यांना आपण जोखत असतो. घरातला प्रेमळ, मायाळू पिता. बाहेर कडक शिस्तीचा बॉस असू शकतो... (. हे एक प्रातिनिधिक उदाहरण झालं). आपल्या घरात आणि बाहेर अशा दुहेरी भूमिका आपण नेहमीच निभवत असतो. बाहेरचा राग घरात निघतो, पण घरातला राग बाहेर carry करता येत नाहो . खऱ्या प्रतिमेपासून आपण स्वतः:ला खूप दूर घेऊन जातो, कदाचित आपणच आपल्याशी केलेला तो एक सौदा असतो; जे नाही ते आहे, असं भासवण्याचा आणि त्यासाठी उत्कृष्ट अभिनयाचं शिवधनुष्य पेलण्याचा. घरातला चेहरा हा घरातल्याना सुपरिचित असतो, त्यात होणारे सूक्ष्म बदल आपण टिपू शकतो पण... जनमानसातील प्रतिमेचे अंदाज घ्यावे तितके कमीच. खरोखरी जे नाही ते आहे असे दाखवून हसत रहाणे हे सोपे काम नोहे... आणि म्हणूनच कधी कधी 'प्रत्यक्षाहून प्रतिमा सुंदर बनते. '

October 28, 2014 ·

माणसाजवळ जिज्ञासा किती ठासून भरलेली असते न.... ' क' ची आख्खी बाराखडी या जिज्ञासे भवती फिरते. आपली जिज्ञासा शमवण्या साठी आपण नको नको ते उपाय /उपचार शोधून काढतो. पण एक मात्र

खरं कि तुमची जिज्ञासेची 'Antenna' तुम्ही कितीही वेडीवाकडी फिरवलीत, खालीवर केलीत तरी सर्व प्रश्नाची समर्पक उत्तरे मिळतील याची खात्री नाही तेंव्हा....... डिश लावली तर? smile emoticon

October 26, 2014 ·

माणूस जन्मतो तो अंगावर कसलीतरी खूण घेऊनच. कधी त्याच्या अंगावर एखादा तिळ असतो तर कधी एखादं आकाररहित चिंन्ह! अपघात झाल्यावर कुठे लागल्यावर त्या जखमेचा व्रण अंगावर शिल्लक राहतो, मग आपण म्हणतो हि मला लागल्याची खूण आहे. त्या खुणेवरून अपघाताचा पूर्वेतिहास आपणास आठवतो.. एखादी विशिष्ठ वस्तू आपल्याला भूतकाळात घेऊन जाते, त्या अबोल स्मृती जागृत होतात अन सूर उमटतात...... अजून त्या झुडपांच्या मागे सदाफुली दोघांना हसते अजून आपुल्या आठवणीनी शेवंती लजवंती होते !! सैनिकाच्या अंगावरील लढाईच्या खुणा ह्या त्या सैनिकाचे शौर्यच जणू आपणास सांगतात. लढाईच्या आठवणीने, त्या खुणा पाहून सैनिकाचे रोम रोम फुलून येतात. चोर चोरी करतो पण आपल्या अस्तित्वाची खूण तो मागे ठेवतो आणि मग तिच खूण त्याचं आयुष्य धोक्यात आणते.. मऊ रेतीत अन चिखलाच्या भागात पावलांचे ठसे उमटतात, या खुणांवरून मार्ग काढणे अगदी सोपे असते. ताजमहाल एक प्रितिचिन्ह आहे. एका बादशाहने आपल्या पत्नीवरील प्रेमाची खूण म्हणून ताजमहालसारखं श्वेतकमल या जगात निर्माण केलय. जगातली प्रत्येक वस्तू हि कसली तरी खूणच आहे. प्राचीनकाळी निरनिराळी लेणी आणि स्तूप कोरली गेली आणि म्हणूनच आज प्राचीन शिल्पकलेच्या खुणा आपल्यात शिल्लक आहेत. अथांग सागर

पसरलेला आहे, त्याच्या लाटा आपटत आहेत किनाऱ्यावर, भरतीच्या आणि ओहटीच्याही कुठे राहतात त्यांच्या खुणा? आकाशात चंद्र, सूर्य उगवतात -मावळतात, ढग येतात जातात, ग्रहणे होतात, धुमकेतू झपाटतात, तारे लुकलुकतात........ कुठे राहतात त्यांच्या खुणा? ? आकाश पुन्हा लख्ख, निरभ्र, नितळ, निळे दिसते................ !! (पु. प्र. )

October 24, 2014 ·

चंद्राचं आकर्षण तिलाही आहे मनभरून, त्याच्या सर्वच कला तिला विलोभनीय वाटतात अगदी अमावस्ये पासून पौर्णिमे पर्यंत, कारण तिच्या सारखाच.... आजूबाजूला कोणीही नसताना जास्त प्रकाशित होणारा चंद्र तिला आपला सखा वाटतो.

October 18, 2014 ·

हो आणि नाही च्या हिंदोळयावर मन झुलत असतं.... मनाच्या कमकुंवत पणाच पारड जड होतं अन ' हो' चं वजन त्यात पडतं. कितीही नको असताना मग एखादी वस्तू, कल्पना, काम, विचार पदरी बांधला जातो. भिडस्त पणा हा अवगुण ठरतो. आणि अशा भिडस्त माणसाला लोक कोपराने खणतात. नाही म्हणणे शिकायला हव. आवड निवड, वेळ काळ आपल्यालाही असते. चांगुलपणाचा रतीब घालण्याचे कामच फक्त आपण करीत नाही.... , हे हि कधीतरी दाखवून द्यायची वेळ माणसं आणतात. मला लहान लहान मुलाचं मोठ कौतुक वाटतं नको असेल, तर

ती छोटीही ते निर्भय पणे सांगतात, मग आपल्याला का भीड पडावी? समोरच्याला वाईट वाटेल म्हणून, ' हो' म्हणायला लावणारी आपलीच मानसिकता आपणच बदलणे आवश्यक वाटतं. एका नकाराने खूप साऱ्या अडचणी दूर होत असतील तर........ नकार केंव्हाही चांगला !! smile emoticon

September 26, 2014 ·

नातं आपलं लहान- थोर कोणाशीही असो, मनाचा सच्चेपणा हा त्या नात्याचा पाया असायला हवा. निर्व्याज अन निर्मोहीपण नात्याचा धागा अधिक मजबूत बनवते. नाती जपणं अवघड आहे पण अशक्य नाही. ~ नीता जयवंत.

September 23, 2014 ·

आठवणी काही सहजासहजी पुसल्या जात नाहीत. माणूस आणि त्याच्या घरातल्या वावरण्याचे ठसे जागोजागी उमटतात, त्याच्या वावरण्याची, लकबींची आपल्यावर अस्पष्ट का होईना सावली असते. आपल्याही न कळत आपण हे ठसे जपत असतो. काय शोधतो आपण त्या ठशातून? त्याची लकब, त्याचा वावर कि पुसल्या गेलेल्या त्या अस्तिवावरचा आपला खोल विश्वास....?

....................

September 22, 2014 ·

काम आवरून आलेली दुपार, थंडगार वाऱ्याच्या झोतात लागलेली विश्रांतीची चाहूल आणि घराचा सुखद व आश्वासक आधार, अशावेळी मनाचं वारू दुडक्या चालीने न चालत तर नवल. प्रसंग, विचार, माणसं, नाती या सगळयांचे सर स्मृतीतून ओघळून अलगदच गळयात येतात. या ओघळलेल्या सरांकडे दूरस्थ होवून पहाताना खूप काही जाणवते,.................... किती judgmental होतो आपण. पटकन मत बनवून टाकतो. समोरच्या व्यक्तीचा, तिच्या विचारांचा मान न राखता निर्णयाप्रत येतो. समोरच्यालाही काही अडचण असू शकेल त्याचीही काही मजबूरी असेल हा विचार सुद्धा मनाला शिवत नाही. समोरचा बदलणार नाही हे सत्य उमगून आपल्यात बदल घडवावा हा विचारही मनाला शिवत नाही. Judgmental होणे कधी कधी नात्याचा पदर विरविरीत करते. समजूत घालून न पटणारे, मन हळवे करणारे निर्णय घेऊन आपण मोकळे होतो. छोट्या. छोट्या प्रसंगातून दु:खाच्या आवरणात शिरण्यापेक्षा हे आवरण झुगारता आलं तर.... प्रेमाला स्वाद असला तर नाती अधिक गोड होतील........

September 15, 2014 ·

पुस्तक वाचता वाचता मी त्यात एव्हढी बुडून जाते कि,.... ते सगळंच खरं वाटायला लागतं. त्यांची सुख दु:ख, अडी अडचणी, समज अपसमज यात आकंठ बुडायला होतं. मनावर गारुड केल्यासारखी हि पात्रं अवतीभवती वावरतात असा भास व्हायला लागतो. वाटतं..... हीच पात्रं

जिवंत होऊन समोर येतील तर, काय मजा येईल ना ! त्यांचं वागणं, विचार, निर्णय या बाबत त्यांच्याशी छान गप्पा मारता येतील. क्वचित जाब विचारता येईल, खड्सावता येईल...... अलगद आसू ही पुसता येतील त्यांचे...... छे बाबा फारच गुंतत चाललेय मी.

....................

September 11, 2014 ·

अनेकानेक व्यक्तीमत्वाना भेटताना त्यांच्या बरोबर एक अनोखा प्रवास सुरु होतो. कधी हा प्रवास कळत नकळत होतो तर कधी तो आपण जाणीवपूर्वक पुढे नेतो. हा प्रवास म्हणजे अरण्यातील सफरी सारखा....... सफरीत काय समोर येईल याची क्वचितच जाणीव असते. खाचखळगे, चढ-उतार, झुळझुळता झरा कि पेटता वणवा..... अनभिज्ञ असतो आपण. हिंस्त्र श्वापद कि मधुर स्वरांचा कोकीळ...... कधी भावनांचा ओलावा तर कधी रुक्ष पणाचा आहेर. व्यक्त -अव्यक्ततेचा प्रवास सगळा. हवा तेंव्हा, हवा तसा सुंदर मार्ग कधी सापडणे कठीण.. हिरवळ दाट होते पायाखालची कधीतरी.... कधी चटकेही वाढत जातात. प्रवासात अशीही माणसं भेटतात, जी भेटूनही हरवतात अन अशीही भेटतात ज्यांच्यात आपण हरवून जातो. मंदिराच्या पायऱ्या चढून जावं तर विठोबा नसतो.... दिसतात फक्त विटा, आणि कधी अवचित बिन विटांचा देव हात जोडून समोर उभा............

September 6, 2014 ·

मनाच्या आरशात आपलं प्रतिबिंब पहाताना परिवारातील. शेजारातील इतर अनेक सख्यांची प्रतिबिंब गॊळा झाली..... त्या प्रतीबिम्बांकडे आरपार नजर गेली आणि जाणवल यानां बघत, निरखत तर आपण मोठे झालो. त्यांची तन्मयता, आपुलकी, नात्यांना फुलवत जपण्याची शर्थ..... आपला संसार आनंदी करत दुसऱ्यालाही आनंदी करण्याची वृत्ती...... नकळत मन गुंतत गेल. एक छंदच जडला जणू यानां निरखण्याचा. त्या वयात कामचुकार पणा करून पळ काढताना गम्मत यायची पण हे कष्टाळू चेहरे समोर यायचे अन अलगदमनावर ठसायचे. ते चेहरे काम तर करायचेच, पण त्यात भावनेचा ओलावाही असायचा. झोकून देऊन कार्य करण्याची क्षमता !!... त्या चेहऱ्यांनवरचे ते स्मित आजही आठवते. समोरच्या साठी खूप काही करून काही केलेच नाही हे भासवणे..... '. प्रकाशून अप्रकाशित रहाणे '. स्वतःच्या कर्तुत्वाची कोणतीही टिमकी न वाजवता अप्रकाशित राहिलेल्या....... या सख्या आज अचानक त्यांच्या प्रतीबिम्बांचा खेळ रंगला !! ~ नीता जयवंत

September 4, 2014 ·

माणूस मनकवडा असता तर किती बरं झालं असतं ना..... न बोलताच खूप सारे साध्य झाले असते......... smile emoticon

September 1, 2014 ·

वेग वाऱ्याचा, वेग धावत्या मनाचा, सारखाच असेल का...? फुलणाऱ्या फुलांचा, उमलत्या भावनांचा, मेळ जमत असेल का...?

माणसाची लहर अन निसर्गाची लहर, एक सारखी असेल का..? निसर्गाची बरसती लहर, निष्पर्ण वेलीला जिवनदान देते..... आणि माणसाची फिरती लहर, सपर्ण कळी खुडून टाकते.....

...................

August 27, 2014 ·

नातं, नात्या पलीकडचं आपण जिवापाड जपतो, ते टिकवण्यासाठी न कळत प्रेमाचं शिंपण ही करतो पण कधी हे नातं अबोल होतं.. राग रुसवा, तुझं-माझं काही तर नसतं, दुराव्याची खोल दरी न कळत लांबते. मनातंल्या अढीची निरगाठ होते. अबोल शब्द मुकेच होतात......... नात्यातली ओढ जणू लुप्त होते. त्या अनामिक नात्याची ओढ मनाला घोर लावते, अन नकळतच मनाची चलबिचल डोळ्यात उतरते....... रुसलेलं नातं मात्र त्या तरल पडद्या आड हलताना दिसत..........

August 26, 2014 ·

आठवणी आठवण्याची एक चांगली गोष्ट असते......... जितक्या जास्त आठवणी आठवू तितक्या त्यांच्या छान आठवणी तयार होतात. न विसरण्यासाठी !

...................

August 7, 2014 ·

माझं त्याच्यावर खूप प्रेम आहे, पण मला वाटतं हल्ली तो ही माझ्या जास्तच प्रेमात आहे, कधीहि बाहेर पडा, दिवसा रात्री याची साथ  आवरजुन असतेच. त्याच हे प्रेम ओलचिंब करत अगदी...... पाऊस! smile emoticon

....................

July 21, 2014 ·

आज बर्याच वर्षांनी हातात पाटी आणि पेन्सील आली आणि सहजच अक्षरे उमटली, 'मला  पाउस आवडतो '. पाटीच्या साक्षीने आठवला लहानपणातला पाउस... देवाच्या म्हातारीचं दळण.. विजांचा प्रचंड कडकडाट.... भेदरलेला चेहरा आणि आईचा पदर. त्या भाबड्या कल्पना किती गोड असतात न..... एक एक इयत्ता पुढे गेल्यावर 'विज्ञान पाउस' कळला ' आणि मग तो हळू हळू उमगत गेला, आवडत गेला.

दर वर्षी पावसावर निबंध लिहिताना पाउस मोठाही झाला अन सुंदरही ! पाण्यातील कागदाच्या नावाच्या जागी आता कागदावर कवितांच्या नावा चालू लागल्या.... पाउस मनीचा सखा झाला. मैत्रिणींसोबत केलेल्या पावसातील खोड्या ओठावर खट्याळ हसू आणू लागल्या. सरीवर सरी वर्षावत वसुंधरा तृप्त करू लागला. श्रावणातले सण, मंगळागौरीचे खेळ. गणपती -गौरी पूजन यातून याची संगत मनाला

लोभवून गेली. प्रेमाच्या सरी ही अशाच बरसू द्या म्हणून  कानी गुज करू गेला.....  काळयाभोर मेघांनी टेकीला आलेलं आभाळ, कुठल्याही क्षणी बरसेल हि आतुरता मनातं, वसुंधरेच्या अन आपल्याही.......................

July 16, 2014 ·

दिवसाचं चलनी नाणं गर गर फिरत, सकाळ अन संध्याकाळच्या छापा काट्यात  रोज ओढ लावत........ उजेडाचा आनंदी छाप क्षणैक मोहात पाडतो, काटा रात्रीचा मात्र काळजात सलतो...... अस्थिर दिवस सुटतो बेलगाम,  काळ काम वेगाने होतो लवकर पसार... नवी आशा नवी दिशा उमलते रात्रीच्या गर्भात  अंधाराला चिरून येतो लखलखता प्रकाश....

....................

June 28, 2014 ·

मनाच्या आरशात आपलं प्रतिबिंब पहाताना परिवारातील. शेजारातील इतर अनेक सख्यांची प्रतिबिंब गोळा झाली..... त्या प्रतीबिम्बांकडे आरपार नजर गेली आणि जाणवल यानां बघत, निरखत तर आपण मोठे झालो. त्यांची तन्मयता, आपुलकी, नात्यांना फुलवत जपण्याची शर्थ..... आपला संसार आनंदी करत दुसऱ्यालाही आनंदी करण्याची वृत्ती...... नकळत मन गुंतत गेल. एक छंदच जडला जणू यानां निरखण्याचा. त्या वयात कामचुकार पणा करून पळ काढताना गम्मत

यायची पण हे कष्टाळू चेहरे समोर यायचे अन अलगदमनावर ठसायचे. ते चेहरे काम तर करायचेच, पण त्यात भावनेचा ओलावाही असायचा. झोकून देऊन कार्य करण्याची क्षमता !!... त्या चेहऱ्यांनवरचे ते स्मित आजही आठवते. समोरच्या साठी खूप काही करून काही केलेच नाही हे भासवणे..... '. प्रकाशून अप्रकाशित रहाणे '. स्वतःच्या कर्तुत्वाची कोणतीही टिमकी न वाजवता अप्रकाशित राहिलेल्या....... या सख्या आज अचानक त्यांच्या प्रतीबिम्बांचा खेळ रंगला !!

June 20, 2014 ·

मनाच्या चौकोनी खिडकीतून क्षितिजापार नजर स्थिरावते अन दिसू लागतात आपणच वठवलेल्या आपल्या भूमिका. अंह, नात्याच्याच नव्हे तर अंतरंगातील... समाजातील,. नोकरीतील  कधी या भूमिकांशी एकरूप झालो, कधी काठावरून हात मिळवून परतलो... कधी गुंतलो कधी सोडवून आलो. खऱ्या खोट्या किती भूमिका वठवल्या..... मनापासून -मनाविरुद्ध, जबाबदार -यत कश्चित, पण कुठे ही कसूर सोडली नाही. कसदार अभिनयाचा वसा नाही आपल्याकडे पण केलेली कोणतीही भूमिका फेक नव्हती...... जिवन रंगभूमी आहे, याचा पुरेपूर प्रत्यय घेतला....

June 16, 2014 ·

नातं तेच असतं, पण त्या नात्या कडे पहाण्याचा आपला दृष्टीकोन ताजा अन चांगला हवा. तो अहम. ती अरेरावी, तो हक्क थोडासा

दूर केला ना तर, नाती उत्तम बांधली जातात. प्रत्येक दोन नात्यातल्या व्यक्ती या क्षमता आणि उणीवा यांचं अद्भुत मिश्रण असतात. क्षमतांचा विचार करून उणीवा थोडावेळ बाजूला करता येतात. या उणिवांची मृदू जाणीवही समजूतदारपणे देता येईल..... पण थोडासा धीर अन खूप सारा विश्वास हे नातं अधिक सुदृढ बनवेल. नाती अधिक रंगतदार होतील.

....................

June 13, 2014 ·

मोरांचं नाचून झालं, विनंत्या आर्जवं अगणित झाली, पैसे हि देऊन झाले.... पण हा काही बधत नाही. याची वाट पहाणं फक्त हाती उरलंय..... आतुरता आता खरंच शिगेला पोह्चलीये. सर्व आसमंत शांत, निवांत करणारा हा.... बालपण जाग करणारा हा. याच्या वर्दीने मातीचा गंध श्वासात भरून घेण्याची इच्छा प्रबळ झालीये......

....................

June 11, 2014 ·

प्रत्येक नातं हे सुख दुःखाच्या लहरी उमटवत असतं. संवादचं वळण जेंव्हा विसंवादाकडे झुकत तेंव्हा नात्या मधे एकाकीपण जाणवायला लागते........ नात्याचा पदर हळू हळू जिर्ण व्हायला लागतो

आणि एका अबोल क्षणी तो हातातून निसटतो... कायमसाठी !!! असं होता कामा नये कधीच.

....................

June 5, 2014 ·

आठवणीना येणारी भरती आणि मनाच्या किनाऱ्यावरचं या लाटांचं आक्रमण, कितीही प्रयत्न केला तरी आपण थोपवू शकत नाही.... कधी मन स्वच्छ धुवून निघत, कधी गढुळत, या लाटाहि कधी वादळी होतात तन, मन आणि नाती सगळंच उध्वस्त करतात....

....................

June 2, 2014 ·

मन असं अचानकच खिन्न होतं.. , कोंदलेल्या आभाळागत उगाचच भरून येत. आता कोसळेल वाटताना, परत मग रित होतं आठवणींचा पाउस मात्र दूर टप्प्यात झरू लागतो.

May 24, 2014 ·

जांभूळ पिकल्या झाडाखाली नाही, पण गच्चीवर येणाऱ्या फांद्या झुकवून काल बरीच  जांभळ गोळा केली. मैत्रिणीच्या बिल्डींगच्या बाजूला दोन मोठी जांभळाची झाडे आहेत. ती गच्चीत घेऊन गेली, आणि मग काय जोर लावू फांद्या खाली करून घोसच्या घोस  तोडले.... हात दुखे पर्यंत. घरी आल्यावर नवरा म्हणालाच "आख्खी टोपलीच आणलीस वाटतं " त्याच्याकडे दुर्लक्ष केल, जांभळ धुतली आणि बसले फराळाला....

....................

May 21, 2014 ·

आयुष्य सुंदर -असुंदर क्षणांची मालिकाच जणू. आयुष्य किती सुंदर आहे, म्हणे पर्यंत ते आपला असुंदर रंग दाखवते. वेड्यासारखी धावपळ, या सुंदर क्षणांना वेचण्याची, जपण्याची. धाव, अस्तित्व  टिकवण्याची त्याच अस्तित्वातील नाती जपण्याची. जीवनातंले वास्तवतावादी क्षण जगताना  अवास्तवतावादी क्षण ही साभाळावेसे वाटतात...... काही वेचलेले क्षण, नाती. या नात्यांना  जपलं, दुरूनच..... सुंदर गुलाबासारखं !

....................

May 12, 2014 ·

अशी माणसं तशी माणसं, कायम भेटतात माणसं.. कवितेतल्या भावांसारखी, गोड वागतात माणसं.. गद्य पाठासारखी, सरळ माणसं.. वाट वाकडी करून भेटतात माणसं.. कादंबरीपेक्षा, सुरस असतात माणसं.. अन रहस्य कथा फिकी पडावी, अशी वागतात माणसं.. काही मात्र पत्रा सारखी अवचित भेटतात, ओलाव्याचा पाउस घेऊन हळूच बरसतात.

....................

May 8, 2014 ·

हसून सार निभवून न्यायचं..... की, रडत कुथत गाणं गायचं? सरीवर सरी बरसत रहायचं.... की, थांबत थांबत बेचव जगायचं? कळीचं फूल होवून फुलायचं.... की, अकालीच गळून जायचं? आठवणींचा पिसारा फुलवून पहायचा... की, उराशी धरून झडू द्यायचा? खळाळत्या पाण्यासारखं वाहायच.. की, साचलेलं पाणी गोड मानायचं? कातळातून देव शोधायचा.... की, माणसातला देव पूजायचा? खडीसाखर होवून विरघळायच.... की तुरटी होवून फिरत राहायचं? मनाची कवाड उघडायची.... की, फक्त निशेची चाहूल घ्यायची? असं जगायचं, तसं जगायचं... जगायचं मात्र नक्की

May 7, 2014 ·

तिचं ते पत्र वाचता वाचता मी भारावून गेले. या वयात जे जसं अपेक्षित होतं, तेच घडत होतं. आनंद अन आश्चर्य या साठी, कि त्या

वाट्ण्यातून तिची प्रगल्भता जाणवत होती. तिच्या या समजुतीला दाद द्यावीशी वाटली. प्रेम प्रेम म्हणजे काय? अडीच अक्षरांचा शब्द,,,,,,, नाही ग, ती एक तरल भावना आहे. या भावनेचे तरंग मनातं अतिशय हळूवार उमटतात पण मग हळू हळू याची आवर्तन होतात. मन सैरभैर होतं. जिथे तिथे पूजलेल्या या देवाची प्रतिमा दिसू लागते, आणि आपल्याही नकळत हि प्रतिमा मोठी होवू लागते. वाऱ्याच्या मंद मधुर झुळकी सारख्या या लहरी मनावर किण किणत रहातात, आपल्याही नकळत आपण या झुळकेवर स्वार होतो.... जाणीवा नेणीवा पार नाहीश्या होतात. मनातं उरतो फक्त एक राग, प्रेमाचा ! " तुला आठवत, लहानपणी तू मला देवळात न्यायचीस आणि डोळे मिटून त्या देवाची मूर्ती मनातं आणायला सांगायचीस, आज माझी अवस्था तिचं आहे " आजुबाजुचा कोलाहल माणसं सगळं अदृश्य होतंय. मी काय पाहिलं ग या प्रेमात,,,? एक सक्षम, संवेदनाशील मित्र, खरं तर जोडीदार म्हणून मला लागलेला त्याचा शोध, मला माहित नाही हे आयुष्य शाश्वत कि पुढे येणार..... एका संभवते कडून दुसऱ्या संभवते कडे जाणारा हा प्रवास. माझा आशावाद सतत मला साथ देईल. आधी मंद भासणारी माझी पावल आता अधीर झालीत.

April 29, 2014 ·

कधीतरी असही होतं, एखाद सुंदर गीत, मनमोहक कलाकृती, सुंदर पुस्तक, हवा हवासा संवाद घडताना मन एका अद्भुत अनुभवातून जातं. या जाणीवेला काय म्हणावं कळत नाही, पण निश्चितच हा अनुभव तनामनातं एक अनोख रसायन निर्माण करतो.....

....................

April 27, 2014 ·

मनाच्या चमचमत्या कोपऱ्यात तूच असतोस, डोळयांच्या बाहुल्यात तूच वसतोस, उघडपणे मात्र खूप दूर असतोस... ना भेट, ना निरोप, ना शब्दांची आतिशबाजी, ना हास्याची लकेर. तरीही तनामनातं भिनतोस मात्र खोलवर ! नातं तुझ्याशी अचानक जडलेल, असावून ते मनातंच जपलेल, भावना का सांगता येतात उघडपणे सगळयाच..? जपल्यात मी त्या हृदयीच्या शिंपल्यात..

April 21, 2014 ·

समुद्राच्या लांबून येणाऱ्या लाटा किती वेगाने येतात, पण जसजसा किनारा जवळ येतो त्यांचा  वेग कमी होतो. मनातंल्या इच्छा ही तशाच....  निसर्गाची साथ, सानिध्य नेहमीच हवेसे वाटते, तो मनाला उभारी देतो, टवटवीत ठेवतो. हिरवीगार दाट झाडी, त्या काळसर हिरव्या छटातून उडणारी रंगबेरंगी पाखर. आभाळाचे बदलते रंग अन त्याबरोबर बदलणारे मनाचेही रंग !

....................

April 21, 2014 ·

क्षण तुझे माझे, अंतरंगातून उमललेले वाऱ्याच्या झुळकीसरशी, गंधफुले आणणारे..

March 27, 2014 ·

इवल्याशा परीशी खेळताना, मन त्यातच रंगले  भातुकलीचा डाव मांडताना, मन बाहुली होवून गेले  लिम्लेट्च्या गोळया लाटून पाहिल्या, मी होतात का पोळया... कुर मुऱ्याचा भात अन जोडीला शंकरपाळया.. गूळ आणि दाण्याची बर्फी चवदार... विकतची जिलबी

पंक्तीला बहार.... बाहुलीच्या लग्नाचा स्वयंपाक तयार नवऱ्याला शोधायला झाले सारे पसार....

....................

March 25, 2014 ·

एक आठवण अशी, धुक्यातून ओघळते, हाताच्या ओंजळीत येते, दंव भरली होते.... एक आठवण पावसाळी, काळयाभोर मेघांची लखलखत्या विजेची, झिम्मड पावसाची. एक आठवण सरत्या संध्याकाळची, तुझ्या माझ्या मनातंलं हळूवार जपण्याची... !

....................

March 24, 2014 ·

स्वप्न सर्वांचीच पूरी होत नाहीत, पण ती पहाणं आपण सोडत नाही. स्वप्न पहाणं सोपं, पण त्यांचा पाठलाग करून त्यांच्या पर्यंत पोहचणं अवघड. धरलेली स्वप्न वाट कितीही वळणदार, नागमोडी असली तरी ती चालणे महत्वाचे असते. चालता चालता या वाटेवरचे दरवाजे बंद होतात..... वाट अधिक अरुंद होते.... पण हे बंद होणारे दरवाजे अधिक ताकद देतात, अधिक आशा दाखवतात... एक दरवाजा बंद झाला तरी इतर अनेक उघडतात, या दरवाजांचा मागोवा घेऊन स्वप्नांकडे जाणे जरुरी असते. जोपर्यंत स्वप्ने आहेत, चालत राहिले पाहिजे.

....................

March 20, 2014 ·

मी जेंव्हा माणसांचा विचार करते तेंव्हा मला झाडाचं त्यांच्या अवयवांशी असलेलं नातं आठवत.... वाटतं झाडांचे अवयव आणि आपल्या आयुष्यात येणारी माणसं, यांचं हि असंच एक नातं आहे. आयुष्यात येणारी

काही माणसं, ही पानांसारखी असतात. झाडांची सावली बनतात पण ऋतू  बदलला कि गळून पडतात, जोरदार वारा याना झाडापासून अलग करतो. ओकबोकं झाड केवीलवाणं दिसतं. माणसं ही तशीच आपल्याला सोडून जातात. आपल्या जिवनातं त्यांचं महत्व तितकंच... या माणसांचा राग मानता येत नाही. काही व्यक्ती या फांद्यांसारख्या असतात, पानांपेक्षा जास्त मजबूत ; पण यांच्या बरोबर  जरा काळजीने रहावे लागते. यांचा आपल्या बरोबरचा प्रवास हा येणाऱ्या वादळावर अवलंबून असतो एखाद दोन वादळे याना आपल्या पासून तोडून टाकतात. यांच्यावर भार देणे धोकादायक ठरू  शकते. सहनशीलतेचा अभाव त्याना दूर नेतो. यांचा जास्त विचार न करता त्यांचे तुटून पडणे बरे. आयुष्यात आपण मात्र शोधत असतो मुळान सारखी माणसं........ मूळ जशी झाडाला घट्ट पकडून ठेवतात, त्याला जीवनरस पुरवतात, मातीची धूप थोपवतात..... तशीच आयुष्यातली काही माणसं, नकळत तुम्हाला साथ देतात, धरून राहतात. तुमच्या उत्कर्षात हातभार लावतात. खोल राहून तुम्हाला जपणारी. तुमच्या यशात आनंद मानणारी. माझ्या आयुष्यातली ही सारी माणसं मला आठवताहेत......................

.....................

March 18, 2014 ·

सांग दर्पणा कशी मी दिसते? आणि आरसा म्हणतो सुंदर, अतिसुंदर!! हा आरसा हिमगौरीच्या सावत्र आईचा नसतो म्हणून उत्तर आपल्याला अपेक्षित असंच मिळत. लहानापासून मोठ्यांपर्यंत आरशाचं वेड सर्वांनाच असतं. दिवसभरात आरशाकडे बघून प्रतिमा अधिकाधिक उजळ कशी होईल याचा प्रयत्न सगळेच करतात.... अपवाद असेलही, पण क्वचित. पण आपलं अंतरंग निरखायला मात्र विसरायला होतं. बाहेरून सुंदर

दिसणारा चेहरा  पण त्याच्या अंतरंगात काय दडलंय, कधीच कळत नाही. आपलं अंतरंग पाहून त्यात योग्य बदल केले तर आपण किती सुखी होवू नाही? पण काळ्याकुट्ट मनाला कोणते Fair & lovely लावणार? चेहऱ्याची सुंदरता निरखण्यापेक्षा ; मनाची समृद्धी, खरेपणा, निरलस वृत्ती निरखणे जास्त गरजेचे आहे. आरशांच्या दालनातंले विविध आरसे आणि त्यातली आपली रूपे पाहिली कि थक्क व्हायला होते, पारा लावलेला काचेचा चतकोर पण माणसाला वेड करतो. शोधूया का मनाचं प्रतिबिब दाखवणारा आरसा..........

....................

March 11, 2014 ·

आयुष्य मध्या वरून पुढे सरकत आणि आपोआप स्थैर्य एकवटू लागत. लढत झुंजत पार पडलेले  क्षण खूप मागे सुटलेले असतात, त्यांची धग जाणवते पण चुलीत मेचके चार दोन निखारे असावेत एव्हढीच....... उकळी आलेलं दुध थंड झालं कि त्यावर अलगद साय धरते. या माध्यान्ही  नंतरच्या आयुष्याचं हि तसंच आहे, दुधावरची साय जपायची आणि उरलेल्या आयुष्याची  आनंदी वाटचाल पूरी करायची.........

March 2, 2014 ·

अधुरे माझे स्वप्न राहिले......... का नयनानो जागे केले..?

....................

March 1, 2014 ·

आयुष्य कितीही समृद्ध वाटल तरी या आयुष्यात कसली ना कसली उणीव राहून जातेच. कधी हि उणीव प्रकर्षाने जाणवते तर कधी त्याची सल जाणवते. मैत्रिण, सखी आपल्या  संस्कारांची, आपल्या ओतीव रंगांची प्रत्येक स्त्रीला हवी असते, पण भाग्यवंतांच्या पदरीच हे दान पडते.

असं म्हणतात मुलगा वंशाचा दिवा....... म्हणोत बापडे पण कन्या मात्र  सगळ्या कुटुंबाची सखी बनते. बाहुली घेऊन फिरायचे दिवस सरतात, शिक्षण, नोकरी, विवाह या साखळीतून  स्त्री परत त्या उंबऱ्यावर येते जिथे तिला अभिलाषा असते परत एकदा त्याच पण जिवंत बाहुलीची. का असतो हा विचार मनी? शरीराने ती माहेरापासून दूर होते पण मनाच्या आत खोल आपले आई-वडील असतात. सासरसाठी धडपडणारी ' ती' माहेर साठीही पारंब्या होवून जाते..... आणि तरीही 'ती' नाकारली जाते. असही म्हटल जातं कि तिला मुलगा म्हणून जगायला शिकवा पण मला वाटते तिला मुलगी म्हणूनच जगायला शिकवावे, तिच्यातल्या अमर्यादित क्षमतांची जाणीव देऊन... शाळा सुटल्या पासून भोवताली चिवचिवणाऱ्या चिमण्या नाहीशा झाल्यात........

.....................

February 28, 2014 ·

रंग बावरी स्वप्ने नकळत  पुन्हा आज मी पाहिली, वेड्या मनाने आज फिरुनी  साथ तुझी मी वाहिली...  हुरहूरल्या तिन्ही सांजा तरीही, तारका अस्तावल्या वाट तुझी परी देखताना, शब्द येई बावरा.. बंधनांचे हे ढिगारे, का मी उपसु लागले  जे कधी ना घडतेही अघटीत  स्वप्न त्याचे पाहिले !

February 25, 2014 ·

एखादा दिवस उजाडतो तोच मुळी उनाड मन घेऊन, आळसाची दुलई पांघरून. मनाचं हे हिरमुसण  मनच पहात रहात आणि मग सुरु होतो एका अमूर्ताचा प्रवास,,,,,,,,,, न पोहचता येणाऱ्या  वाटेने जाणारा, संपता संपत नाही हि वाट. कडू-गोड, चंचल -प्रसन्न, मखमली -

काटेरी सगळया ठिकाणीची सैर होते,,, हळू हळू.............. आपलंच मन निष्क्रीयतेने पहात असतं हा प्रवास. हासू आणि आसू यांच्या पलीकडे जाऊन,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,

February 24, 2014 ·

तुझी काढता गोड आठवण....... मन माझे अंकुरून येई......... का फिरून आठव तुझाच येई आई....... मन तुझ्या मिठीतच जाई..........

February 21, 2014 ·

घडून गेले आजवर जे जे...... मर्मबंधी जपलेले........ का आज ते उसळून आले....... भाव मनीचे गुंफलेले...........

.....................

February 21, 2014 ·

काही नाती किती मधुर असतात ना..? विसरता विसरत नाहीत, पण आठवताना मात्र क्षण अपुरे पडतात. पकडून ठेवावीत हि नाती तर मासोळी सारखी निसटतात हातातून. यांची जणू भुरळ पडते, याना मात्र फिकीर नसते. सदाफुली सारखी फुललेली पण प्राजक्ता इतकीच हळूवार अन नाजूक, काकवीची मधुरता अन चिंचेची आंबट चव याचं मिश्रण म्हणजे हि नाती... मनीचं गुज न सांगता समजणारी, एकाच आकाशा खाली न भेटता बिलगणारी.....

.....................

February 12, 2014 ·

क्लिष्ट मन मानवाचे....... माणसाच्या मनातंले भाव अन अंतर्भाव खरोखरी अद्‌भुत असतात. त्यांचं वागणं आणि त्यांचं बोलण..... ओठात एक अन पोटात एक. भासवतात एक आणि अनुभव मात्र अघटीतच... शक्य आणि अशक्य च्या झुल्यावर का झुलवतात लोक?

जोखायच्याच असतील विचार धारा तर ओता त्या टीप कागदी मनावर भावनांचा उद्रेक आणि अजमवा त्यांना................

....................

February 11, 2014 ·

एका अनामिक क्षणी, तुझ्या भेटीची ओढ होती ~~~~ बिखरलेल्या मनाला, हळुवार साद हवी होती ~~~~~~ स्वराला सुरांची सच्ची साथ हवी होती ~~~~~~~ जगण्याच्या सुंदर लयीला, तुझी दाद हवी होती ~~~~~~ महिफिलीतलं गाणं अन गाण्याची मेहेफ़िल ~~~~ साथ -संगतीविना अधुरी राहिली ~~~~

....................

February 10, 2014 ·

पाण्याचा भार सोसेना होतो आणि ओथंबलेले ढग धारा होवून धरणी वर येतात.. अश्रूही तसेच, हृदयाला दु:ख सोसवेनास झालं कि डोळयातून आपोआप वाहातात....

February 9, 2014 ·

प्रेम म्हंटल कि मला मंगेश पाडगावकर आठवतात आणि त्यांच्या सुप्रसिद्ध ओळी "तुमचं आमचं सेम नसतं. " भावना, ओढ, माधुर्य तेच, पण जातकुळी वेगळी. मनातंल्या रंगीबेरंगी भावना मूर्त स्वरूप घेतात अन मग प्रेमाचा मोहोर फुलू लागतो. नातं मग ते कोणाशीही जुळताना, मनाच्या सच्चे पणाला खूप महत्व आहे, नातं बांधायला हा सच्चेपणा जरुरी असतो, महत्व हे ज्या व्यक्तीशी नातं जुळत तिला असतं, ना कि जाती, धर्म वा आजूबाजूच्या परिस्थितीला. दोन व्यक्तीत जुळणाऱ्या नात्यात कधी कधी गुण अनलिमिटेड पाहिले जातात, अपक्षां पूर्तीचं ओझ लादलं जातं

आणि नात्याचे बंध सुटू लागतात. मनाचे रंग एकमेकात मिसळतात,,,, आणि आपल्या हि न कळत एक गोफ तयार होतो, हे रंग कधी गडद होतात तर कधी फिकट.... यांच्या योग्य प्रकाश रेघा मिसळल्या तर गोफाची सुंदरता वाढते. मला वाटतं आग्रह आणि दुराग्रह हे नात्यातला आधार काढून घेतात. शोधायचा फक्त सहृदय माणूस !! वाद -संवाद, चर्चा -मत, गुण -दोष यातूनच होते मनामनांची जपणूक आणि  नातं अधिक दृढ होतं. कायम साठी !

....................

February 6, 2014 ·

हे मन मोठ व्रात्य आहे. कुठून कुठे जाईल कुठे बसेल, कसं उडेल, प्रत्यक्ष मनही न जाणे...... पण असंही होतं कधी, हे मन एखाद्या चकव्यात सापडतं आणि मग त्यात नको इतक  घुसळून निघत. या चकव्यात शिरताना मनाला जाणीवही नसते.... पण हा चकवा त्या मनाला  नकोस करतो. शक्याशक्यतेच्या साऱ्या कल्पनांचं तो धुमशान घालतो. हा चकवा आयुष्यात  कधीमधी येणारा आणि मति गुंग करणारा........... फसवणारा, गुंगवणारा, जगणं जेरीस  आणणारा..........

February 4, 2014 ·

कधीतरी दिसते वेदना चेहऱ्या मागची, न दिसणारी पण निश्चितच जाणवणारी.......... बारीकशा कुसा सारखी, न दिसता सलणारी, आपल्या दु:खाचा सल सोसायला लावणारी  हा आंतरिक सल जास्त दु:खदायक असतो, दाखवता येत नाही पण वेदना मात्र

जिवघेणी  असते, जाणवतेही कधी कधी हि वेदना चेह्ऱ्या मागची पण समोर दिसतो एक फसवा . मुखवटा..

February 3, 2014 ·

मनोमनी रंगवलेल्या चित्रावर बादलीभर पाणी कोणीतरी बदाबदा ओताव,,,,,,, सगळे रंग तितर  बितर होतात. जपलेलं चित्र विस्कटून होत्याचं नव्हत होतं.... आणि मन? ते तर पूर्ण विस्कटून जातं... अकाली सगळंच संपत. अवेळी रंगवलेली चित्र पूरि होतंच नाहीत का........?

.....................

February 1, 2014 ·

शब्दांची हाक जेंव्हा पोहचेनाशि होते तेंव्हा सुरु होते स्पर्शाची भाषा,,,,,,,,,,, अगदी मंदिरात सुद्धा  तोडात प्रार्थनेचे पुटपुटते शब्द असतात, डोळे देवीच्या दर्शनातं गुंतलेले असतात पण अतृप्त मन  अहिल्येसारखं देवीच्या चरण स्पर्शासाठी आतुर असतं. , जणू हा स्पर्श आपल्याला उद्धरून नेणार असतो.. स्पर्श मायेचा, स्पर्श परिसाचा. तान्हुल हा स्पर्श चटकन ओळखतो. आणि आई साठी  हा स्पर्श तिचं सुखनिधान असतं. छोट्या बाळाची ती गळामिठी मोरपिशी असते.  लग्नातिल सप्तपदी चालताना वधू वराने धरलेले हात म्हणजे एक आश्वासक उबदार स्पर्श !! कायमची साथ देण्याचं स्पर्शातून दिलेलं अभिवचन !!! हिरव्या मखमली हिरवळीचा स्पर्श !!! नाजूक फुलपाखराच्या पंखांचा स्पर्श ! थंडगार पाण्याचा स्पर्श!  घोन्गावणाऱ्या वादळाचा स्पर्श !! मिडास राजाचा हव्यासी स्पर्श !! प्राण देहातून मुक्त झाल्यावर होणाऱ्या अचेतन देहाचा स्पर्श !शाश्वता कडून अशाश्वताकडे  नेणारा,,,,, मैत्राचाही असेल का स्पर्श?

कसा होत असेल हा स्पर्श,,, शब्दांनी, व्यक्त अव्यक्त मनमोकळया भावनांनी,,,,, नक्कीच शब्दांनी होत असावा. शब्दांचे पूल मैत्रीचा स्पर्श जाणतात.

==============2013=============

December 25, 2013 ·

पहाटेच्या दवात भिजलेली तुझी पावले, मी शोध शोध शोधली......... चंद्राच्या प्रकाशात ती अवचित दिसली जणू चांदण वेली वरून........... आभाळाच्या अंगणात हळूच उतरली

========

आठवण आज तुझी मनापासून येतेय अवकाळी आलेला पाउस देतोय असं नाही, आठवणी येण्यासाठी काही निमित्त हवय असहि नाही. आठवणींच्या या समुद्र मंथनातून रत्नजडीत असकाही. वर येत असेल तर ती फक्त तुझी. आठवण ! आठवणी जशा रक्तात भिनल्यात......... की आठ वणी रक्तातून वाहतायत? आठवणीने आठवावा, असा तूच तरआहेस, आणि फक्त..... आठवणीच्या दिवशी च तुला आठवावं असं नाही ना? . तुझ्या आठवणींचं मोरपीस उराशी ठेवलय जपून.

==============

....................

December 4, 2013

कुटुंबातील सर्वांनाच असं वाटतं की आपल्यालाही वेळ द्यावा, आपल्याशी हितगूज करावे आणि हि, कधी कधी आपली आणि कुटुंबाची हि गरज असते..

===========

===================================

October 21, 2013 ·

आपण सर्व आनंदी म्हणून जन्मत नाही, पण आनंद देण्याची क्षमता मात्र आपल्या सर्वात असते.... या आनंदाचा वाटप करायचा सोपा उपाय म्हणजे हास्य.... आपलं गोड हास्य दुसऱ्यांच्या मनाचा आधार बनू शकते.....

===================

सहस्त्र घोड्यावरून येणारे रविराज, प्रकाशाची उधळण करीत सारा आसमंत उजळून टाकतात..... प्रसन्नतेचा वर देऊन साऱ्या जगावर राज्य करतात........

===============

....................

October 20, 2013 ·

सल्ले आणि सल्लेकरांची दुनिया ( वागले कि दुनियासारखं वाटतंय का? ) हं तर अनाहूत सल्ले देणारे ते देत रहातात. नुसता देत नाहीत तर तो पूर्णत्वाकडे गेला कि नाही याची शहनिशा करतात. तो त्यांचा जन्मसिद्ध अधिकार असल्यासारखी !. सल्ला आपण त्यांना विचारलेला नसतो, ज्याला विचारतो तो बेफिकीरीने दुर्लक्ष करतो, ज्याला द्यावा वाटतो तो संपर्क क्षेत्राच्या बाहेर असतो, जो संपर्क क्षेत्रात असतो त्याची लायकी नसते, ज्याची लायकी असते तो जबर किमत वसुलतो,

किमत देण्यासाठी आपल्याकडे त्याच्या योग्य काही नसते.............................. प्रचंड घोळ !! जाऊ देना. प्रय्तेक लिहिण्याला अर्थ असावाच का? { June te sone..... }

===============

October 19, 2013 ·

एक कविता मनातंली...............

. एक मात्र डोळयातली.............

मनातंली आठवून विसरायची......
डोळयातील मात्र सतत जपायची.........

===============

October 17, 2013 ·

ये बारिश की बूँदे, ये गहरी घटाए....

ये हरी हरी घास, और थंडी हवाए......

ये पंछीयोंकी चहक, और गेहरासा जाल है....

रुतुओंकी पुकार लाई, मनमे बहार है.....

===============

October 14, 2013 ·

. त्यातून बाहेर पडायला सावरायला वेळ लागतो.. कधी जखम चिघळते..... परत परत मलमपट्टी करूनही.... !. आपण न केलेला गुन्हा आपल्यावर लादला तर तर वाइट वाटतेच पण घळ घळुन रडूही येते....... का आपण प्रतिकार करू शकत नाही? प्रतिकार करण्याची कुवत कमी पडते......?

आतलं मन ओरडत असतं, पण बाहेरच मन बांधासारखं होतं, तो आतला लोंढा ते थोपवत

... कारणं वेगळी वेगळी असू शकतील पण वृत्ती तीच असते....... दगड बनणे खरंच अवघड आहे.

नात्या नात्यातला वाद संवाद मनावर ओरखडे उमटवतो,,,,, सर गाठ निरगाठ बनते आणि ती सोडवता सोडवता सरणावर जायची वेळ येते......... तरी पण माणसं सांगतात..... दगड व्हा.

अत्याचार होतात, मन दुखावतात, काही गोष्टींची घृणा निर्माण होते... पण माणसं सांगतात दगड व्हा,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,

================

October 11, 2013 ·

क्षणिक स्पंदने हळूच जागवित.....<br>
भाव मनीचा जुना जुना............<br>
आठव येतो आज तुझाही...........<br>
खेळ मांडीला नवा नवा...

================

October 11, 2013 ·

फुलराणी मनातंली, फुलराणी स्वप्नातली......

फुले पाहून मन आनंदित होते, सुगंधित होते.....

आनंदाची सुगंधी फुले आपल्यासाठी सदैव फुलू देत.........

==============

माणूस जन्मतो तो अंगावर कसलीतरी खूण घेऊनच. कधी त्याच्या अंगावर एखादा तिळ असतो तर कधी एखादं आकाररहित चिंन्ह! अपघात झाल्यावर कुठे लागल्यावर त्या जखमेचा व्रण अंगावर शिल्लक

राहतो, मग आपण म्हणतो हि मला लागल्याची खूण आहे. त्या खुणेवरून अपघाताचा पूर्वेतिहास आपणास आठवतो.. एखादी विशिष्ठ वस्तू आपल्याला भूतकाळात घेऊन जाते, त्या अबोल स्मृती जागृत होतात अन सूर उमटतात...... अजून त्या झुडपांच्या मागे सदाफुली दोघांना हसते अजून आपुल्या आठवणीनी शेवंती लजवंती होते !! सैनिकाच्या अंगावरील लढाईच्या खुणा ह्या त्या सैनिकाचे शौर्यच जणू आपणास सांगतात. लढाईच्या आठवणीने, त्या खुणा पाहून सैनिकाचे रो रोम फुलून येतात. चोर चोरी करतो पण आपल्या अस्तित्वाची खूण तो मागे ठेवतो आणि मग तीच खूण त्याचं आयुष्य धोक्यात आणते. मऊ रेतीत अन चिखलाच्या भागात पावलांचे ठसे उमटतात, या खुणांवरून मार्ग काढणे अगदी सोपे असते. ताजमहाल एक प्रितिचिन्ह आहे. एका बादशाहने आपल्या पत्नीवरील प्रेमाची खूण म्हणून ताजमहालसारखं श्वेत्कमल या जगात निर्माण केलय. जगातली प्रतेय्क वस्तू हि कसली तरी खूणच आहे. प्राचीनकाळी निरनिराळी लेणी आणि स्तूप कोरली गेली आणि म्हणूनच आज प्राचीन शिल्पकलेच्या खुणा आपल्यात शिल्लक आहेत. अथांग सागर पसरलेला आहे, त्याच्या लाटा आपटत आहेत किनाऱ्यावर, भरतीच्या आणि ओहटीच्याहि कुठे राहतात त्यांच्या खुणा? आकाशात चंद्र, सुर्य उगवतात -मावळतात, ढग येतात जातात, ग्रहणे होतात, धुमकेतू झपाटतात, तारे लुकलुकतात........ कुठे राहतात त्यांच्या खुणा? ? आकाश पुन्हा लक्ख, निरभ्र, नितळ, निळे दिसते.................

===============

October 7, 2013 ·

ती चिमुकली लाल गुलाबी पावल प्रयत्न करून उभी रहाणारी आणि मग दुडू दुडू धावणारी,,,,, हि पावल मग सतत आपल्या आवडत्या वाटेवरून चाल करताच रहातात पावल, वाट, मार्ग, पथ माणूस सतत मार्गक्रमणा करतच असतो. हि पावल कधी चपळ कधी अचपळ होतात. अनेक अडचणी मार्गात येतात, भरकटण्याचे भय हि असते पण, सावरून परिक्रमा सुरूच रहाते, कधी वेगळी वाट वेगळ्या दिशा खुणावतात, तिथे काही फुलांचा सडा नसतो पण परिश्रमाने माणूस झेंडा रोवू शकतो. धोपट मार्गा सोडू नको,,, हा सल्ला पाळला तर बिकट वाट सोपी होवून जाते,,,,,,,,,,, स्त्री किती शिकली मोठी झाली, दूरदेशी गेली तरी माहेरच्या ओढीने तिची पावल तिच्या बालपणा कडे वळतात. तो सुखाचा काळ ती दृष्टी पंथात ठेवतेच महत्वाच्या वळणावरची सात पावल आयुष्यातली ' सोन पावल' होवून जातात. संसाराच्या भ्रमणात ईश्वराशीही नाते जुळते,,,, पावल मग पंढरीची वाट चालू लागतात. प्रत्येक क्षेत्रातली पावले हि काहितरी सांगतात,,,,,,,,,,,, अस्तित्वाच्या खुणा मागे ठेवतात, सैनिकी पावले शत्रूच्या मनातं दहशत निर्माण करतात, खबरदार जर टाच मारुनी,,,,,,,, म्हणुन राई एव्हढ्या चिंधड्या उडवण्याची धमकी देतात.

नृत्यातील तो लयदार, सुखावणारा पदन्यास आपल्याला नेत्र सुख देतो,,,,, ती थिरकणारी पावल मन आनंदी करतात. अशीही काही पावल ज्यांची आपल्या मातापित्यां पासून साथ सुटते हि पावल मग अनाथ गृहाची वाट चोखळतात.... समाजही त्यंच्या कडे क्ण्णावर्च्या कावळ्या सारखा पहातो..... पण हि पावल हि यशाकडे जातच असतात,,, आम्ही अनभिद्न्य असतो......

अशीच काही आप्त आयुष्यात येतात.... मनाची पावल त्याच्या कडे वाटचाल करतात. तुम्ही आम्ही त्याना म्हणतो मित्र परिवार >>>>>>>>>>

===========

=============October 5, 2013=============

अथांग सागर नेहमीच मनाला भुरळ घालतो, त्याच्या वर खाली उसळणाऱ्या लाटा मनाची स्पंदन अजून वाढवतात...... दिवस रात्र, आणि ऋतू बदला प्रमाणे या समुद्राची विविध रूप पहाता येतात... जसजसे आपण त्याच्या जवळ जातो तशी त्याची हाक ऐकू येते, खाऱ्या पाण्याचा गंध जाणवू लागतो.. समुद्रावरून येणारा खारा वारा कायेला सजग करतो......

सूर्यप्रकाशात हा जणू चांदीच्या उकळत्या रसा सारखा वाटतो......... निळ्या आकाशाचं प्रतिबिंब पडल्यावर याचं पाणि निळाइने भारलेलं दिसत...... रात्रीच्या शांत वेळी काळपट चादर घेलेला सुस्त घोरणारा असा निसर्गाचा चमत्कार वाटतो....... पण रात्रीच्या शांत वेळी लाटांची गाज मनाची गंभीरता वाढवते......

आकर्षण वाटतं याच,,,,,,,, वाटतं उसळणाऱ्या एखाद्या मोठ्ठ्या लाटेवर स्वार होवून मजेची सैर करून यावी..... मनातं हा विचार स्थिरावे पर्यंत याचं रौद्र रूप मन भयकंपित करतं. निसर्गाचा हा अविष्कार जितकां मोहक तितकाच भयंकर.......

याचा किनाराही तितकीच ओढ लावतो...... या किनाऱ्या वरची मऊशार रुपेरी वाळू..... या वाळूत उभ असताना आभास निर्माण होतो, वाटतं...... वाटतं आपण पुढे मागे झुकतोय...... हळुवारपणे पायाला

गुदगुल्या करते हि वाळू,,,,,, असं वाटतं,,,,,,,,,,,,, तासनतास या वाळूत उभ राहून या लाटा पायाजवळ खेळतांना दिवस संपूच नये..

=============

October 5, 2013 ·

आज पासून शारदीय नवरात्र उत्सवाला सुरवात होत आहे. पुढचे नऊ दिवस आम्ही सगळेच हा उत्सव आनंदाने साजरा करू, भक्ती भावाने या आदी मातेच, शक्तीचं पूजन करू, घरोघरी कुमारिका पूजन होईल, मातेच्या बाल रुपाची पूजा होईल.... ज्या मातेने आम्हाला जन्म दिला, काळजी वाहिली तिच्या या बालरुपाची आम्हीही काळजी घेतली पाहिजे... हि सुंदर कळी नेहमी फुलली पाहिजे हा विचार या प्रसन्न दिवशी मनी आला आणि तो आपल्या बरोबर शेअर केला.............

===================October 4, 2013

मनातं खोल खोल तूच तर असतोस........
श्वासातल्या लयीवर तर तू चालतोस..........
खट्याळ हसून परत तूच वेडावतोस......
स्वप्नांचे इमले बांधून घेतोस.................
गुज मनीच समजून आधारही देतोस..........
पण.......................................
भेटीची वेळ मात्र अलगद टाळतोस......

=============

जन्म आणि मरण या दोन्ही गोष्टी प्रत्येकाच्या आयुष्यात फक्त एकदाच येतात. आपण एकटे येतो आणि एकटेच जातो, पण या येण्या पासून जाण्या पर्यंत माणूस सतत कोणाची ना कोणाची साथ सांगत शोधत असतो,,,,, त्यासाठी तो अनेक खटपटी लट्पटि करतो. आपला व्याप,

पसारा, संताप सार काही वाढवतो आणि मग आपलंच सुख शोधत बसतो, कधी कधी फसगत हि होते सुख हाताशी असतं पण त्याकडे आपलं लक्षच जात नाही,,,, आपण आपल्याच सुखाला शोधतो,,,,,,

आणि या सगळयात आपली स्व साथ हि कधीतरी सुटते... सुख पुढे नि मी मागे अशी धावापळी सुरु होते, माझ्यातल्या मी कडे दुर्लक्ष होतं, आरशात आपलं प्रतिबिंब पाहता पहाता मनाचं प्रतिबिंब पहाता आलं असतं तर......... मी माझ्यात कितीतरी सुधारणा घडवू शकले असते,,,

किती सहजपणे दुसऱ्याच्या वर्मावर बोट ठेवते मी....... पण तेच बोट मी जेंव्हा माझ्यातल्या मी वर ठेवते तेंव्हा लक्षात येत,,,,,,, अजून मला माझ्यात खूप बदल करता येतील..... मी शिकतेय अजून !October 3, 2013

============

दृढ विश्वास आणि सामंजस्य यांचं नातं जेंव्हा आपण जुळवू शकतो तेंव्हाच मैत्रीचा वेल मूळ धरून फोफावतो..........

===========

September 30, 2013 ·

देवावरही प्रेम करावे नि :स्वार्थीपणे,,,,,,,, तो एक असा क्षण, ज्या क्षणी आपण देवाचे होतो, मिटल्या डोळयांनी देवात सामावून जातो, त्या क्षणी जाणवतो परम्यात्म्याशी झालेला आपला मूक संवाद........

================

September 29, 2013 ·

मन माझं हळवं होवून........
दडी मारत रानी वनी.......
रंग बेरंगी फुले पाहून......

अलगद येई ताळयावरि...

===========

ओळख आणि हास्य हे हातात हात घालून जात, पण काही वेळा काही व्यक्ती कॅमेरा बनून समोर येतात,,,,,,,,,,,,,,,,,,,,, त्यांच्या कडे पाहू आपण छान पैकी हसावं पण समोरून क्लिक क्लिकाट होतच नाही,,,,,,

==========

झाडाचा रंग, पानांचा रंग, फुलांचा रंग मनाचा रंग या साऱ्या रंगाचं मिश्रण म्हणजे, "आनंद "

===========

क्षण ~~~~क्षणात हसवणारे......

क्षण ~~~~क्षणात रडवणारे.......

जिवनाचं मोजमाप.........................
तराजूत टाकणारे..........

==============

September 26, 2013 ·

रस्ता अखंड चालता, आवाजाने भारलेला,,,,

वाहनांची रेलचेल, चित्र विचित्र आकार....

आणि त्यातलेच चालते, गोल, चौकोनी.....

काळे, पांढरे, हसते, गंभीर चेहरे,,,,,,,

तोही त्यातलाच, एक अवजड ओझे उचलणारा,,,

काळा कुळकुळीत, रांगडा बळकट पण हसरा,,,,

डोक्याला मुंडासे आणि घामाच्या वहात्या धारा,,,,,
केंव्हा पासून मी त्याला पहाते आहे,,,,,,,,,,,,,
त्याची ताकद, त्याची ओझे ओढण्यातली रग,,,,,,
त्याची बेफिकिरी, त्याच्यासारखा तो एकटाच,,,,,
रस्त्यावरच्या सरकत्या चित्रापेक्षा वेगळा,,,,,,
काचेतून दिसणारा आगळा........
सावरून पहाता पहाता, रस्ता वाहाता झाला......
अन तो नजरे आड,,,,,,,

===========

==========

फुले नेहमीच आनंद आणि उत्साह देतात...
जगण्याचा आनंदी मंत्र शिकवतात........
. आपला आजचा दिवस असाच आनंदी व उत्साही असू दे !!!!

=============

मन माझं, मन माझं क्षणो क्षणी अडखळत असतं...
आणि माझाच हात धरून तुरु तुरु चालत असतं......
मन धावत फुलामागे, फुलपाखरू होवून.......
मन धावत लाटांन. मागे, तरंग होवून.....
मन धावत मेघांसवे, पाउस बनून........
मन धावत आनंदाकडे, माणुस बनून...... 24 SEPT

===========

September 23, 2013 ·

तो अबोल पण, स्पष्ट हुंकार मी रोजच ऐकत असते,,,,,,,,,

माझ्यातल्या कळीला मीच जपत असते,,,,,,,,,,,,,

============

September 22, 2013 ·

स्वप्नांची अजब दुनिया खोटे खरे वाटायला लावणारी ...

जमिनीवर चालताचालता, दूर आकाशी नेणारी ...

सजवून स्वप्नांची पालखी, काळ्याभोर मखमली रात्री .......

रंगीत मनाची उंच भरारी, अलगद येऊन जमिनीवर निजली....

==============

कही दूर छोड़ आयी है वो नाते रिश्ते, अपने सपनोंको सजाके रखा था। आनेवाला कल उसके लीए अनगिनत सपने लेकर रुका था,,,,,,,,, पर यात्रा का शुभारंभ होनेसे पहले ही उसकी अंतिम यात्रा शरू हुई। जीना चाहती थी वो पर अब एक बेजान गुडिया बनकर रह गई,,,,,,,,,,,,

रोज़ मरती जिन्दगीमे घटती अत्याचार की घटनाओं से दिल दुखता है,,, क्या फाँसी इन घटनाओको रोक सकती है,,,,,,,,, हर दिन नई घटनाओंका राजकारण बनाया जाता है। न्याय व्यवस्था अपनी तरफसे टिप्पणी देती है, पुलिस अपने काम में सक्षम है ये बता रही है। "क्या करे अबला " उसे तो घरसे निकलना है,,,,,,,,,, खौफ पैदा है हर दिलमे। ...।

पुरे समाजकी मानसिकता बदलनी होगी, हर पुरुष को ये जताना होगा की स्त्री उसके साथ सुरक्षित रहेगी,,,,,,,,,,,,,, हर पुरुष बुरा नहीं होता, बुरी होती है उस समयकी मानसिकता,,,,,,,,, इस मानसिकता का अगर हम अंत कर पाए तो शायद,,,,,,,,,,,,,,,, फिर एक सुघटित

समाज बन पाएगा। ............दुनिया उम्मिदोपर चलती है। 20 sept.........

================

दूर नभाच्या त्या टोकावर, एक अनोळखी तारा निखळतो ....
मनाचा हळूवार तळ क्षणात गढूळतो .......
अभद्र विचार नको म्हणता तवंग बनून रहातात .............
आलबेल असल्याची खूणगाठ मन स्वतःशीच घालत...
अन निद्रेच्या कुशीत अलगद विसावत ......

=============

दिशां मावळती क्षितिजावंरती ...क़ोमेजती हि किरण फुले ......
गुज मनीचे सांगाया का पूर्ण चंद्र हि आज दिसे .........

=========

चंद्र माझ्याच अंगणात होता ......
पण तारे मात्र नाखूष होते .........
मी का बरं ताऱ्यावर चिडावं .........?
जेंव्हा चंद्र हि माझ्यापासून दूर चालला आहे ...

===============

निसर्ग आणि माणूस यांचं नातं जेंव्हा जुळत तेंव्हा मैत्रीचा एक सुंदर राग तयार होतो. निसर्गाच्या जितके जास्त जवळ जाऊ तितकी त्याची मनमोहक रूप पहाता येतात, अनुभवता येतात. निसर्गाचं प्रत्येक रूप माणसाला शहाणं करून सोडत. का द्याव, काय द्यावं याचं भान देत

…………हिरवीगार सतेज पान आपला उत्साह देऊ करतात, सळसळ ता वारा उमेदीन दिशा दाखवतो …. निळ आकाश मन निरभ्र, अथांग ठेवायचा सल्ला देत, प्रसन्न्ता आणि हास्य हि तर फुलांची मक्तेदारी …………मानवाने मानवावर प्रेमाचा वर्षाव करावा …मतभेद. हेवेदावे

याना तिलांजली मिळावी ……माणुसकीचे नवे बीज अंकुरावे …हाच असतो पावसाचा संदेश ! वृक्षाची सावली, वेलींची लवचिकता …………. एक ना अनेक …निसर्गाकडून मिळणारे अनेक ईशारे …. पण हाच शांत निसर्ग जेंव्हा बेभान होतो तेंव्हा मात्र हा:हाकार करतो….. 14

================

उगवता सूर्य म्हणजे पूर्व दिशां,,,, त्रिकालबाधित सत्य!, पण माणसाच्या मनातंला आनंदाचा सूर्य जेंव्हा उगवतो तेंव्हा त्याला एक दिशा नसते तो आठ हि दिशाना तितकाच प्रकाशमान होतो.

उगवता, माध्यान्हीचा, या अवस्था नसतातच ……………नाही का?

=============

जसा हा सूर्यप्रकाश दिवस उजाडताना माझ्या सोबत असतो,,,,,

तशाच तुझ्यां आठवणीही माझ्या सोबत असतात,,,,,,,,,

जीवनाची संध्याकाळ होताना, प्रकाश विरून जाइल,,,,,,,

पण आठवणी मात्र चिरंतन असतील,,,,,,,,,,,, 12

==========

कधी कधी असही होतं तोंडावर मनुष्य नियंत्रण ठेवतो पण अंतःकरण मात्र पिळवटून निघत. उमटलेले,, पण न दिसणारे ओरखडे भरून यायला काळ खूप जावा लागतो...... 11

=============

श्रावण मनावर रुंजी घालत अलगद पसार झाला आणि भाद्रपदाचे आगमन झाले ......

येणार येणार म्हणताना तो आता अगदी वेशीवर आलाय ......आम्हि सारेच वर्षभर त्याची वाट पहातो आतुरतेने ......... त्याच्या स्वागताची तयारी, आरास. सजावंट, नैवेद्य काय करू नि काय नको..... देव पाहुणा येतोय ...किती सुंदर कल्पना ...घरी दारी सारी लगबग ....... पुढ्चे चार दिवस त्याच्यासाठी राखून ठेवलेत............

==============

अन्तःकरण दुसऱ्याचं तेंव्हाच समजत जेंव्हा त्याच्या दु:खाची सहसं वेदना आपल्या डोळयात पाणी आणते ...सांत्वनाची चार फुले, चार शब्द म्हणून आपण समोरच्या पुढे टाकतो, खरंच का आपण त्याचं सांत्वन करतो,,,,,,,,, 4 sept

=============

जगातील सुंदर मैत्र तेंव्हाच बनत जेंव्हा ......

ते तुमचा हात धरून चालू लागत आणि तुम्ही .......

एका अक्षरानेही विचारात नाही का ...? किंवा कुठे? 3 sept

==========

माणसाचं मन त्याच्या डोळयातून प्रतीत होतं ...डोळे खूप काही सांगतात. काही व्यक्ती त्यांच्या शांत डोळयातून अथांग

डोहासारख्या भासतात. काहींचे डोळे म्हणजे भावनांचा उसळता महासागर, काहींचे डोळे नंदादीपासारखे शांत ...न बोलता बरंचस सांगणारे. काहींचे खोडकर, मिश्कीलीचे खेळ करणारे ...काही डोळे आपल्याला नजरेतून एक आश्वस्त भाव दर्शवतात, संभाषण जास्त सुकर होते ...... काही डोळे म्हणजे समाधानाची फुलती पुष्प ......आणि काही जादू करणारे................ 1 sept

===================

दोन देहांची मैत्री जरूर होते पण ..........

दोन मन जेंव्हा आप्त होतात तेंव्हा .......

खर प्रेम निर्माण होतं........... 31 aug

==============

August 30, 2013 ·

परवा कपाट साफ करता करता बरीचशी जुनी पत्र मिळाली, ती वाचता वाचता मी त्यात हरवून गेले, मग मनातं विचार आला स्व हस्ताक्षरात लिहायची पत्र आता खरंच आपण लिहितो का? एक काळ असा होता कि 'पत्र 'हे संदेश वहनाचं एकमेव साधन होतं ...,,, आपल्या माणसाला लिहलेलं पत्र ...क़ाय नसायचं या पत्रात रुसवा, प्रेम, तक्रार, काळजी, समजावंणी, बतावणी .........पत्राने भेटण्याचे दिवस होते ते................

हि बोलकी पत्र समोरच्याला आपलंस करून टाकायची. त्यातलि अक्षर समोर येऊन हसवायची, रडवाय ची, त्या अक्षरांना, पत्राला, लिहिणाऱ्या च्या हाताचा सुगंध असायचा ...बन्द पाकिटातून

काय काय पाठवता यायचे ...नोटा, फुल कल्पनाही करता येणार नाही अशा गोष्टी जायच्या,,,,,,, पण, महत्वाचे म्हणजे आशीर्वाद आणि प्रेम.

नेहमी येणारी एकाच व्यक्तीची पत्रे हि त्या अक्षरांच्या वळणावरून त्याची मनस्थिती सांगत. सुंदर हस्ताक्षरातील पत्र, अन त्यातून ओघळणाऱ्या भावना ...असे पत्र हातून सोडवत नसे.......... काळजीची पत्रे मनाला बेचैनी आणत, सर्व आलं बेल समजल्यावर जीव भांड्यात पडायचा. पत्रांची वाट पहाण हा छंद होवून बसायचा .........डाकियाला मानाचं स्थान होतं ..........

सरहद्दर लढणाऱ्या सैनिकांसाठी, घरची ख्यालीखुशाली कळण्याचा हा हृदयस्पर्शी मार्ग होता ...............आता कोण लिहित कोणाला पत्र, स्व हस्ते ...क़ाळ पुढे चाललाय...........................

===============

August 26, 2013 ·

जगता जगता जीवन संपत.....

मरण काही येत नाही ......

तहान भागता भागत नाही ...

पाउस मात्र रजा घेतो......

नाठाळ झोप खेळ करते ...

दिवसालाही जाग येते ......

स्वप्नांची सजलेली पालखी मात्र ......

तशीच रिकामी पडून रहाते.......

==========

August 24, 2013 ·

आभाळाचा रंग .........

पाण्याचा रंग .........

पावसानंतर च्या जमिनीचा रंग ............

...असतो का मनाचाही रंग ...............?

असो कोणताही कसाही ..................

पण समाधानाच्या छटा मात्र त्यात नक्कीच असाव्यात...

===============

August 24, 2013 ·

हर क्षेत्र में परचम लहराती वो ।सदियोसे अपने परिवार, अपने लोग और अपने देश की मज्बुतिको अपने हाथोसे बांधती वो .... पर आज की घटती घटनाए मन विचलित करती है | एक सभ्य देशके लिए यह शर्मनाक बात है |

=============

August 23, 2013 ·

चाहा था, वशमे करू 'कल' को....................

यहाँ, आजभी हाथोसे दूर निकल रहा है.........

===========

'दयाळू" असणं हे' बरोबर' असण्यापेक्षा जास्त महत्वाचं आहे, कारण कधी कधी माणसाला चातुर्यपूर्ण संभाषणापेक्षा काळजी घेणाऱ्या हृदयाची जास्त गरज असते ...

============

August 22, 2013 ·

श्रावण संपतो उन्हाची तिरीप हळू हळू वाढत जाते आणि निसर्गातील अजून एक जादू समोर येते ...'फुलपाखरू '!

पिवळ्या काळ्या, निळ्या रंगांवर चिमुकल्या नक्षीची पखरण असलेली हि इवली इवली विमाने बागेतून किंवा माळावर उडताना किती सुरेख दिसतात .......... त्यांचं ते फुला फुलावर बसणं सुरेख गिरकी घेऊन परत पहिल्या फुलांवर येणं .... नाजूक मखमली पंखांवरची ती सुंदर नक्षी जणू हारावारचं कोरीव काम ... कोणाची तारीफ करावी तेच कळत नाही. प्रत्येक फुलपाखरू वेगळे त्याची नक्षी वेगळी ...देवाने हि कलाकुसर करताना खूप वेळ घेतला असावा. , याना पाहताना आपली नजरबंदी होते .........डोळे यांच्यावरून हलत नाहीत.

संध्याकाळ होता होता हि फुलपाखरे जशी विरघळून जातात ......पण रात्रीच्या प्रकाशात चांदण्यांच्या पावलांनी परत खोलीत येतात ...त्यां चा भास संपत नाही य़ा भासातून वाटते सकाळ लवकर व्हावी आणि परत आपण त्यांच्या पाठलागावर जावे ...मन मात्र त्यांच्या स्पर्शासाठी आसुसलेलं असतं....

=================

August 21, 2013 ·

काहीही असत्य पचवता येत, पण ' मृत्यु ' हे सत्य पचवायला मात्र अवघड जातं. एक दु:स्वप्न मनाचा पापुद्रा सतत कुरतडत रहाते ...तिच्यातुन आलेली मी, तिच्या शेवटच्या आजारपणात तिच्या स्पर्शासाठी, ओळखीच्या हुंकारासाठी, संवादासाठी जितकी अधीर होतं होते तितकीच ती मात्र अधिकाधिक खोल डोहात जात होती .........कणाकणाने मी तिला त्यात पडताना पाह्त होते ......तिच्या जाणिवाना हाताळत होते. मौनालाही अर्थ असतो ...पण इथे..... मौन अर्थहीन झाले होते ......स्पर्शाचा प्रतिसाद क्षीण होत चालला होता .... सर्व भक्षक काळाने घातलेली झडप .........एक नातं नजरेसमोर अंतर्धान पावल !!

=============

August 19, 2013 ·

श्रावण सरीतील एक थेंब हळूवारपणे ओघळलेला ......

मनाच्या शिंपल्यात थेट जाऊन लपलेला.......

=========

August 16, 2013 ·

आयुष्याचा एक एक क्षण पुढे सरकत असतो. काळ कुणासाठीच थांबत नाही आजचा दिवस संपतो न संपतो तोच अंतर्मन उद्याचा विचार करू लागत .......... प्रश्न, आशा, इच्छा यांचं तोरण दर नव्या दिवशी

मनाच्या दारावर बांधल जातं ......पडणारे प्रश्न आपल्याला उत्तर देतातच असं नाही .... पण आपण मात्र प्रश्न विचारत राहतो. अगणित !...प्रश्न कधी आपल्यासाठी असतात तर कधी दुसऱ्यांसाठी. अपेक्षा असते उत्तर आपल्या मनासारखं मिळावं ...आपल्याकडून आणि दुसऱ्या कडूनही ......

इच्छा, आकांक्षा, स्वप्न खूप असतात सर्व पूर्ण थोडीच होतात, पण म्हणून आपण आशा करायचं सोडतो कुठे ......आशेवर तर जगतो. या आशा, अपेक्षा स्व कडून कमी आणि दुसऱ्या कडून जास्त असतात ............य़ा सर्वाना घेऊनच प्रवेश होतो स्वप्नांच्या दुनियेत ...Dreams

unlimited ......या स्वप्नात आपण बुडून जातो, हि स्वप्न खरी वाटायला लागतात, जगण्याचा श्वास बनतात पण पण कुठेतरी काहीतरी सुटत, रंग फिके पडतात ....... स्वप्न हळूच निसटून जातात ......स्वप्ना नच्या आभासी दुनियेतून आपण वास्तवात येतो .........

परत नव्या आशा, नव्या इच्छा आणि नवी स्वप्न पहाण्यास सज्ज होतो...

==============

August 13, 2013 ·

काही व्यक्तिंशी साधलेला संवाद हा वृत्तीतील प्रसन्नपण थंडीतल्या उबदार सूर्यप्रकाशाची किंवा शीतल चांदण्याची बरसात करून जातं........

==============

August 13, 2013 ·

ये भी एक रिश्ता है ....

जिसमे कोइभि रिश्ता नही है.............

==========

August 12, 2013 ·

संध्याकाळ संपता संपता ...

नजर अधिकच अंधुक झाली ......

वाट पाहून तुझी ...

मनीची खंत बोलू लागली ....

तू माझ्यासाठी आदिव्तीय आहेस .........

पण सख्या मलाही हृद्य आणि भावना आहेत.

=============

August 7, 2013 ·

प्रत्येकाचीच असते का एक कथा ...... घडलेली बिघडलेली, समर्थ असमर्थ, हळूवार, पिचलेली. त्रिकोनाच्या तीन कोनांसारखी ............क़ि वर्तुळाच्या नसलेल्या कोपऱ्या सारखी? हि कथा तो कणाकणाने रोजच जगत असतो. एक टिंब ............आणि पुढे त्याची अनेक टिंबे. .... कधी वर तर कधी खाली ...रेशा बनत जाते .....................

याच रेघेला येऊन मिळतात अनेक बारीक रेघा,,,,,,, काळया -पांढऱ्या, रंगी-बेरंगी, सुखावणाऱ्या -दुखावणाऱ्या ....... तयार होतो आयुष्याचा कॅयालीडो स्कोप ......म्हटल तर फक्त रेषा नाहीतर सुंदर नक्षी !!!!!

============

August 6, 2013 ·

क्षणात येते सर सर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे .............

पावसाचा श्रावणातला मनमोहक खेळ !! हा खेळ मन रिझवतो सतत नवं घड्त असतं, आषाढाची संतत धार कमी होते, मनाचं मळभ दूर होतं आणि सूर्यप्रकाश हसत नाचत दारात येतो ......य़ा सूर्यप्रकाशात पाउस पडतो ना वाटतं हिऱ्या मोत्यांच्या माळा घरंग ळ त खाली येतायत..... झुडपांच्या हिरव्या पानावरून किरण परावर्तित होताना वाटतं जणू पाचूची बेट ............आणि श्रावण सरता सरता पिवळी निळी फुलपाखर निसर्ग अजून सुरेख बनवतात ....... हा श्रावण सगळयांसाठी आनद आणतो, गोडाधोडाची रेलचेल असते, सण आणि सुट्ट्या यांची बट्टी असते. व्रत वैकल्य, पूजा अर्चा, मंगळागौर साऱ्यांचा फेर असतो .... थो ड्क्यात प्रत्येकासाठी एक छान गाठोड असतं. निसर्गाच, प्राण्यांचं, व्रतांच, मेंदीचं महत्व सांगणारा महिना, प्रियाविण उदास होणारी सखी .........झुल्यावर झुलत त्याच्या आठवणीत रमून जाते.................

===========

August 3, 2013 ·

आयुष्याच्या या लांबच लांब उंच सखल रस्त्यावर अनेकानेक वळणं येतात, चढ उतार असलेली, सुंदर, नागमोडी …………आणि याच वळणावर कितीतरी जणं भेटतात …हसणारी, हसवणारी, मुसमुसून रडायला लावणारी, भक्कम आधार देणारी, आपले हळवे क्षण जपणारी ……………………………

याच वळणांवर काही जण भेटतात सुंदर सुवासिक फुलांच्या ताट्व्या सारखी,,,,, मनाचा कोपरा सजवणारी …कधितरि मनाच्या मखमली कप्प्यात कायमची वसणारी …

आधारवड बनून सावली देणारी,,,,,,,,,,,,,,,, या साऱ्यांच्या बरोबरचा प्रवास हसत हसवत करायचा. हीच तर खरी मैत्री !!

==========

August 2, 2013 ·

माणूस हा सामाजिक प्राणी, कळपाने रहाणारा, कुटुंबात रमणारा, मैत्रीचे गोडवे गाणारा …अगदि खरं ! पण माणसात राहून तो कधी कधी चलबिचल होतो …त्याला हवी असते एक छोटीशी जागा space जी त्याला स्वतःलाहि हवी वाटते …आणि ती आपण दुसऱ्यालाही द्यावी अशी त्याची प्रामाणिक इच्छा असते ……

जगात नाहीतरी सगळेच अशाश्वत आहे, रोज काहीतरी घडतय बिघडतय …या सर्वा बरोबर आपले भाव विचार बदलत असतात …मनोमन इच्छा असते चांगल्याची पण मन मात्र आधी वाइटाचाच

विचार करते ......अशावेळी वाटतं खूप काही तरी चांगलं घडावं ...आणि अशावेळी वाटतं एकट रहावं .........रोजचे येणारे नवीन अनुभव तपासावे,,,,,,,,,,,, कधी त्यांचा आनंद घ्यावा ......माझे आणि फक्त माझेच असे हे क्षण,,,,, या क्षणांशी हसावं, बोलाव, खेळावं न जाणो या एकटेपणात किती तरी उत्तर दडली असतील.

==========

August 1, 2013 ·

निरोप कसला माझा घेता, जेथे राघव तेथे सीता ......असं म्हणून सीतेने रामायणातला निरोप टाळला .........तरि निरोप हा एक हृदयद्रावक, संवेदनापूर्ण, जिवघेणा असा सोहळा. हा सोहळा कमी जास्त प्रमाणात आम्हा सर्वांच्याच आयुष्यात येतो..........

निरोप दोन व्यक्तीमधला,, निरोप व्यक्ती आणि कुटुंब यातला, निरोप अनेकांनी घेतलेला एका व्यक्तीचा,,,,,,,, प्रत्येक निरोपाच्या तऱ्हां वेगळया, स्तर वेगळे पण भावना मात्र कमी जास्त प्रमाणात तिच ताटातुटी ची ...

दोन व्यक्तींमधला निरोप ...जर हे एकमेकांच्या फार जवळचे असतील तर खरंच कठीण असतो. एकमेकांचा निरोप घेताना संपूर्ण भावविश्व दुखावलं जातं ...............घालवलेले क्षण, जगलेली आणि जागवलेली साथ सोडताना मन व्याकुळ होते, मनाला वेदना होतात ......

आणि हा निरोप जेंव्हा कायमचा असतो न तेंव्हा तो कसा द्यावा आणि कोणी कोणाला द्यावा हा प्रश्न छळत राहतो ...गुंतलेली दोन

मन एका निरोपाने दूर जाउच शकत नाहीत. नाजूक नजाकतीचा हा जिवघेणा निरोप घेणं फार कठीण.......

===============

July 28, 2013 ·

काहीवेळा इतर देशातल्या तरुण पिढीकडे पहाताना लक्षात येत, यांचं जीवन जगण्याचा छापील साचा नाहीये. हि पिढी आपलं आयुष्य उभ करतेय पण पण भरपूर स्वातंत्र्य घेऊन, वेगळया वाटा शोधायची, चोखाळायची याना मुभा आहे. आपलं स्वातंत्र्य जोपासत प्रत्येक जण घडत आहे. हे घडणं बिघडल तरी समाज त्यांच्याकडे सहानुभूतीने बघतो,,,,,,,, हे अमुकच चांगलं आणि ते तमुकच वाईट......... असं काही नसाव. प्रत्येक मानवीय जगण्या कडे आपल्यालाही माणूस म्हणून मोकळेपणाने पाहता यायला हवे........

================

July 26, 2013 ·

मानवी जिवनातं नेहमीच अपूर्णता असते आणि त्या अपूर्णतेचं दुसर नावच जिवन असतं. जीवनातंले काही क्षण... हळवे... जपलेले................ या क्षणांची बीज रोवलेली असतात मनातं खोलवर...... अंकुरून आली तरी ते अंकूर खुडून टाकायचे........... नाहीसे करायचे.. मनाचा आवेग थोपवून जिवन पैलतीरी सुखरूप न्यायचे.

===========

July 25, 2013 ·

धुपाची वलय, उदबत्तीचा सुगंध, लामणदिव्यातील मंद तेवती वात यात सरमिसळलेला अनेक फुलांचा सुगंध,,,,,,,,,,, या सर्वांचा मिश्र सुवास................ आपण त्याच्या समोर आपोआप नतमस्तक होतो आणि एक अनामिक अदृश्य नातं तयार होतं !!

==============

July 24, 2013 ·

आपल्या आयुष्यात येणारी नवीन माणसं हि कविते सारखी येतात.......

पण म्हणून जुनी माणसे मागे सारता येत नाहीत.......

ही जुनी माणसं मुळाक्षरांसारखी असतात..................

शेवटी कविता वाचताना मुळाक्षरांचीच गरज लागते..

==============

July 22, 2013 ·

कधी कधी एकट रहाणं खूप काही शिकवून जातं..... माझ्यातली मी ओळखणं जास्त सोप होतं. आत्म केंद्रित होवून आपणच आपल्या कडे पहाताना आपले गुण दोष, उणीवा नेणीवा ठळकपणे समोर येतात........... अशावेळी स्वता:ला कितीही वाचनातं बुडवल तरी मनाचा तळ ढवळून निघतो..... आणि पुस्तक आपोआप बाजूलां होतं......

मनाचा उत्कटपणा, त्याचे ताण, त्याची निरागसता, तापटपणा, निर्भीड वृत्ती सगळं सगळं घुसळून निघत...... वर आलेल्या लोण्यासारखं...... याचा स्पर्श हवासा तरीही नकोसा वाटतं राहतो. जिवनातं फार काही नाटकीय घडलय किंवा घडतय असं नाही...... पण साध्या साध्या प्रसंगातून आपल्या आयुष्याचा लेखा जोखा पहाता येतो...

जीवनातंली पाहिलेली अनुभवलेली फसवी, नकली रूप दुरून पहाता येतात. गणित मांडता मांडता अधिक उणे मोजदादिच्या पलीकडे जातात......

===================

July 21, 2013 ·

लहानपणची बाहुली.....

निळे डोळे अन जावंळ भुरे.....

स्वप्न तिचे पहाताना...

डोळे अलगद मिटले.........

तिच्याच ध्यासाने मन सैर भैर झाले....

एका हाती बाहुली आणि एका हाती आसवे....

============

July 21, 2013 ·

सागराची निळी स्पंदने मन मोहवून टाकतात...... पण फक्त दुरूनच....

खोल खोल गेल्यावर मात्र आपल्या रौद्र रूपाने मन कंपित करतात..

=============

July 20, 2013 ·

आपल्या वस्तू सोयीस्करपणे विसरणे...

हि त्याची जुनी सवय....

. पण कधी कधी तो.....

जिवंत वस्तूही विसरतो.....

श्वास घेत ती जिवंत वस्तू...........

त्याची वाट पहात असते......

आणि त्याच्या हे गावीही नसते...

============

July 18, 2013 ·

पानगळीचा ऋतू सुरु होतो आणि झाडाची पान गळायला लागतात .... कधी दहा पाच, कधी एक दोन, कधी अगणीत. मनातंली पिकली पानहि अशीच गळून पडतात आणि मन परत नव्या ताज्या पानांचा संभार झेलण्यास होते.

रुतुमानाने होणारे बदल जसे आपल्या हितासाठी असतात तसेच स्वत: मधे केलेले बदलही सुखावह असतात.

============

July 14, 2013 ·

आपण सगळेच आपलं मागे सुटलेलं बालपण परत अनुभवण्यास उत्सुक असतो .... पण ती संधी परत मिळण्याची शक्यता कठीण ... बालपणात डोकावून पहाताना एक मात्र जाणवल आपल्या कडे प्रश्न खूप होते .... आणि त्यांची उत्तर देणारी माणसंहि खूप होती ....... पडलेले प्रश्न घेऊन त्यांच्या कडे जाताना एक विश्वास होता ... आणि तो नेहमीच सार्थ ठरला. हि उत्तर मिळवताना फार कष्ट पडले नाहीत ... उत्तर पटपट मिळत गेली ............

शाळेचं अंगण सुटल आणि विश्वविद्यालयाच्या पटागणात प्रवेश करताना आयुष्यात आणखी नवीन माणसे आली .... प्रश्न वाढत गेले .... पण यावेळेस......... कधी उत्तर लगेच मिळाली, कधी नाकारली गेली,,,,,,,,,,,

कधी धुत्कारली गेली,,,,,,,,,,, आता प्रवेश होतो जीवनाच्या विश्वाङ्ग्णात ............ नवे लोक, नवीन नोकरी, नव्या जबाबदाऱ्या,,,,,,,,,,, प्रश्न इथेही होतेच पण उत्तर शोधून काढावी लागतात .........न थकता,,,,,,,,,,,, आपोआप काहीच मिळत नाही,,,,,,,,,,,,, रिंगण वाढत जातं,,,,,, अजून मोठ,,,,,,,,,,,, मैत्री, नातं, संसार, घर,,, जबाबदाऱ्या अजून वाढतात पण आपल्या साथीदाराच्या सहवासात त्यांचं ओझ हलक करता येत,,,,,,,,,,,,,,,,

तुमच्या रिंगण कक्षा अजून रुंदावतात,,,,,, येते तुमच्या पुढे एक नवीन पिढी,,,, नवी आव्हाने घेऊन,,,,,,,,,,, परत प्रश्न तुमच्याकडे असतात,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,, उत्तर मात्र त्यांच्या कडे ..............

============

July 10, 2013 ·

लिहिता लिहिता शब्द हि कधी अनाथ होतात ...

लेखणीची साथ सोडून टिबांकडे जातात ...

=============

July 10, 2013 ·

शब्दांचे पक्षी मी कितीही उडवले तरी

तुझ्याच अंगणात ते उतरतील असं थोडंच आहे ...

नि:शब्द होवून कदाचित जातीलही ते ...

दूरदेशी उडून,,,,,,,,,,,,,

================

July 9, 2013 · Mumbai ·

आयुष्य म्हणजे एक सतत चालणारा खेळ आहे. कुठला म्हणावे प्रश्नच आहे. .... कारण सगळयाच खेळात चीटींग आहे ...पहावे तिथे रडीचा डाव आहे. आयुष्य पण आपल्या बरोबर चीटींग करत असते ... कधी डाव, कधी उजवं ... ... दान कसं पडेल यावर सगळं अवलंबून ......

मला मात्र सापशिडी हा आयुष्याशी मिळता जुळता खेळ वाटतो .... एक असा खेळ जिथे तुम्ही शिडी चढून वरती जाता .... पण सापाच्या घरात गेलात कि त्याच्या घशातून खाली ...लडखडत, गडगडत, गुदमरत. (चडफ़डत )

आयुष्यात असाच साप आणि शिड्य़ाचा खेळ चालू असतो ... ...दान चांगलं पडतं, मोठ्ठी शिडी मिळते आणि यशाच्या शिखरावर पटकन चढता येत, पण दान मनाजोगत पडत नाही ....... डोळे झाकून घर मोजावी .... एकच फक्त एकच घर चुकतं आणि आयुष्य सापाच्या तोंडात जातं ! परत एकदा हातात फासा घ्यायचा दान टाकायच, जीवन संपेपर्यंत,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,

नेमक, पाहिजे ते दान पडायला काय बरं करावं लागत असेल ...

============

संध्याकाळ झाल्यावर फुलपाखरे अलगद विरून जातात ....

अंधाराच्या खोल खाईत दडून जातात ...............

पण दिवस उजाडल्यावर मात्र .............

रांगोळीच्या ओळी अलगद उमटवतात...

==========

July 7, 2013 ·

उठून मेघांच्या मऊशार दुलईतून.......

डोकावत चाफ्याच्या पांढऱ्याशुभ्र झाडामागून ...

तो ऐटदार पावल टाकीत आला .......

आणि जांभळया नभीचा राजा झाला ...

============

July 6, 2013 · Mumbai ·

माळावरची ओंजळभर फुल पाखरे
इथून तिथे उडत असतात वाऱ्या बरोबर
आपणही किती सुंदर आहोत ...

सांगत असतात खरोखर ....

==========

July 5, 2013 · Mumbai ·

नात्यातला गुंता आणि गुंतलेली नाती

नात्यातला सोहळा आणि सोहळ्यातिल नाती

नात्याची वीण हि घट्टच घालायची

उसवलेली मात्र अलवार जोडायची

नातं जोडताना जुळवून घ्यावं लागत

नुसत्याच शब्दांनी का गोन्जारायचं असतं ...

नातं म्हणजे का नुसत्याच चौकशा ....?

आपुलकीने प्रेमाने बांधायच्या नात्याच्या दिशा

भांडणातला राग अन रागाचं भांडण विसरायचं असतं

पूर्णविराम देवून ते संपवायचं असतं ...

प्रेम आपुलकी जिव्हाळा यांनी बनत नातं ...

रक्ताच्या पातळ पणालाही घट्ट करतं नातं ...

कौतुकाचे चार शब्द अन सांत्वनाची चार फुले,

उधळून का संपते नात्याची व्याख्या

मायेच्या शालीचं पांघरूण घालूनच सुरु होते नात्याची कथा ...

============

July 4, 2013 ·

पाउस यावा यावा असा पावसाचा इंतझार करणारे आम्ही ... पण हा इंतझार केंव्हाच संपलाय आणि हा पाहुणा आता चांगलाच जम ठोकून बसलाय. खरं तर पाउस एखाद्या बहुरूप्यासारखा आता येईल म्हणताना डोळयापुढून नाहीसा होतो तर आकाश निरभ्र असताना खोडकर मुलासारखा अचानक धावत येवून खो घालतो.

पाउस आला कि जमिनीवर पसरते हिरवी जादू .... हि हिरवी जादू पहाताना आणि पाउस अनुभवताना मन बेभान होतं,. वाटते या जादुई दुनियेत विरघळून जावे ...डोंगर, दऱ्या त्यातून कोसळणारे धबधबे, पावसाचा झिम्मड स्वर, खाली झुकलेले काळे मेघ ... पाउस बरसतो.... हिरव्या पोपटी झाडांची अनेक लोभसवाणी रूप दाखवत, असं वाटते धुक्याच्या झिरझिरीत ओढणीतून आपण समोरचं दृश्य पहातोय ... पायाखालचा मखमली हिरवा गालिचा अन वरचा सातरंगी पूल.

आषाढातला पाउस सतत धार लावतो मन उदास होतं, आठवणी दाटून येतात हळवं मन उगीचच मागे वळून पहात आणि आठवणीत चिंब भिजून जाते ... श्रावणातला पाउस मात्र लाडका होऊन येतो ... येता येता स्वच्छ धुतलेल्या सुर्यालाही आपल्या बरोबर घेऊन येतो आणि लपाछपी खेळत आपल्यावर सणांचा वर्षाव करतो.

सुखद आठवणीबरोबर पावसाच्या दुख:द आठवणीहि असतात. या खचवणाऱ्या आठवणी नको नको म्हणता मागून येतात आणि सप सप वार करतात ... कोसळत्या पावसात जखमा धूवून निघतात आणि मग हळूच खपली धरते ...

निसर्गाची सुंदरता वाढवणारा हा पाउस जणू चित्रकार होवून आपल्याला हवे ते बदल करतो, मजा करतो … रंग हि त्याचेच, कुंचलाहि त्याचाच, पाणीही त्याचेच …. कुठे हिरवे गालिचे तर कुठे रस्त्यावर फुटभर खड्डे. पाउस नवा धडा शिकवतो, नवी नाती निर्माण करतो … ती टिकवायची मात्र आपण ………

===============

July 3, 2013 · Mumbai ·

दिव्यापाशी लावलेल्या समईचा हा इवलासा उजेड …….

फुलांनी सजलेल्या देवावर उजेडाचा छोटासा कवडसा धरतो …

आणि त्या इवल्याश्या उजेडात देव्हारा प्रसन्न हसतो

=================

June 28, 2013 · Mumbai ·

इम्तिहान कि घडिया तो हर पल हर कदम पर है … ऊनसे बचना चाह्कर भी हम नही बच सकते … क्या करे अब आद्तसी हो गयी है … डरते है, गिरते है, पर गिरकर फिर संभलते है ……

==========

June 28, 2013 ·

रिमझिमत्या पावसातून…

कडेकपारी आणि डोंगर माळातून ……

इवल्या इवल्या रानफुलातून .......

पावसाच्या थेम्बातून ......

वाऱ्याच्या घुमण्यातून .......

खळाळत्या झऱ्यातून .......

शोधते आहे ... तुझीच साथ ...

===========

June 27, 2013 · Mumbai ·

क्षण तुझे माझे

अत्तराच्या कुपितले

सुवासाने भारलेले

शब्दांनी ओथंबलेले ...

============

June 25, 2013 · Mumbai ·

स्त्रीची अनेक रूप आणि या अनेक रूपातील सगळ्या घरादाराला तृप्त करणार, अनादि काळापासून चालत आलेलं एक रूप म्हणजे "अन्नपूर्णा" ......स्त्री हि अनादि काळा पासून आपल्या कुटुंबाला, नातेवाईकाना, शेजा ऱ्याना खाऊ -पिवू घालत आली ...,, हौशीने, प्रेमाने, आनंदाने .........एक काळ असा होता कि तिच्या कडे स्वयंपाकासाठी लागणारी साधन अपुरी होती ...जी होती, त्यात शारीरिक कष्ट भरपूर होते पण हे तिने हसत हसत झेलले .... कुटुंबाचे मन जिंकायचे असेल तर

तो मार्ग त्यांच्या पोटातून जातो हे ज्ञान तिला उपजतच असावे ...............

आज काळ बदलला आहे. आजच्या स्त्री समोर असंख्य आव्हाने आहेत आणि स्वयंपाकासाठी लागणारी असंख्य आधुनिक साधने आहेत. पण वेळेचं गणित तिला सांभाळावं लागत. कुटुंबाच्या आवडी निवडी वाढल्यात प्रांतोप्रांतीचे अनेक खाद्य पदार्थ आपल्या जेवणात समाविष्ट झालेत. परिपूर्ण आहाराचं नविन आव्हान तिच्या समोर आहे ...... डाएटचा बागुलबुवा आहे ...... पण या सर्वावर मात करत ती उभी आहे सुहास्य वदनाने ....

============

June 24, 2013 · Mumbai ·

" केशर " ज्याची महती वेगळी सांगायची गरज नाही. त्याचा, स्वाद, सुगंध आणि रंग पक्वान्नाची लज्जत वाढवतो.. काही माणसं पण अशीच असतात ....... आपण त्याना भेटलेलो नसतो .... पण आपल्यासाठी त्यांचं अस्तित्व केशरासारखं असतं ... हवहवस .... पण तितकंच महाग !!!

=======

June 22, 2013 · Mumbai ·

शब्द शब्द जुळवून कधी भावनांचं प्रकटीकरण करावं लागत .......

कधी शब्द सापडता सापडत नाहीत, अभिव्यक्ती साठी .......

कधी शब्द अपुरे पडतात भावनांचं सुरेख मिश्रण करण्यासाठी ....

कधी ओल्या दवात भिजल्या सारखे शब्दही हळूवार होऊन जातात ...

गोड, मधुर, मधाळ शब्द आपलेपणाचं नातं जोडतात ...

मुके शब्द माणसाला खूप सारा धीर देतात ....

मंद प्रकाशासारखे मनाचा अलगद ताबा घेतात ....

पण शब्द जेंव्हा पेटत्या निखाऱ्या सारखे अंगावर पडतात तेंव्हा ....

बिच्चार मन कोलमडून जातं ....

===============

June 21, 2013 · Mumbai ·

काही मांणस ओळख मोर पिसासारखी जपून ठेवतात. भाबड मन पुस्तकात मोरपीस ठेवत ... एक सुंदर अनमोल ठेवा म्हणून, ते आपल्यासाठी एक सुंदर आठवण असते, मऊ हळूवार स्पर्श असतो ... ओळखही अशीच असते...त्या मोरपिसासारखी ... रंगी बेरंगी, नाजूक. , मुलायम स्पर्शी हवीहवीशी वाटणारी .........

June 14, 2013 ·

मोत्यासारखे ओघळणारे पावसाचे तुषार ....

नागमोडी वळणांचा ओला रस्ता ...

मनातं फक्त मी .... मन पाखरू पाखरू !!

==============

June 14, 2013 ·

निसर्गाच्या बदलत्या रूपा बरोबर मनही वेग घेते ताल धरते ... ढगांचा गडगडाट, विजांचा लखलखाट सुरु होतो आणि आकाशाच्या जात्यातून पावसाचं पीठ भुरू भुरू खाली येत अवघी धरणी मग आनदाने फुलून येते .... निसर्गाच्या या रूपावर पशु पक्षीहि आनंदाने वेडे होतात, जणू निसर्ग त्याना नाचायला लावतो...... भिरभिरणाऱ्या वाऱ्या बरोबर मनही गिरक्या घेत ... या निसर्गाबरोबर मनालाही गती येते .......

कधीतरी ऊनपावसाचा पाठ शिवणीचा खेळ चालू होतो आणि मग सप्त रंगाचा एक पूल आकाशात दिसू लागतो ...... खुणावतो, त्या तिथे पलीकडे येण्या साठी ......... रंग, गिरकी, नृत्य, गती, लय निसर्ग एव्हढा आनंदी कधीच नसतो .........

============

June 13, 2013 ·

एखादी गोष्ट मनाच्या खूप खूप आत असते, पण ती सतत आठवत रहाते, ती तशी का आठवते ... लक्षात येत नाही .... आणि मग अचानक असा एक चोरटा क्षण येतो आणि ती कारण मीमांसा आपोआप उलगडत जाते ....

==========

June 7, 2013 · Mumbai ·

माणसातलं काय ओळखावं तर .... त्याच्या कडे असणार देवपण ... देवत्वाचा असलेला अंश !! हा जर ओळखता आला तर किती गोष्टी साध्य होतील. अवघे जगची निर्मळ झाले .... जसा.... निसर्ग !....... आकाशाकडे पाहिलं तर या आकाशात चंद्र, सूर्य उगवतात, तारे लुकलुकतात धुमकेतू झपाटतात पण हे उंच उंच आकाश पुन्हा स्वच्छ होतं. आगमन -निर्गमनाच्या कोणत्याही खूणा ते ठेवत नाही ... पावसाळी मेघ येतात, विजांचा कडकडाट होतो, पण या उंच आभाळाला त्याचं देणे घेणे नाही .... ते तेव्हढ्या पूरत गुंतत ................

आपण का नाही निसर्गाकडे पहात ...? बरसणारे काळे मेघ किती दूर असतात ...... पण त्यातून पडणारा पाउस मात्र आपला असतो ... आशेने आपण त्याच्या कडे पहातो .... नातीही अशीच असतात का?

==========

June 6, 2013 · Mumbai ·

झाड तुम्ही कुठेही लावा प रसात, रस्त्याच्या कडेला, डोंगरमाथ्यावर कुठेही .... सावली देण्याचं काम ती इमाने इतबारे करतात. काही मांणस हि तशीच असतात, फळण, फुलणं या मूळ उद्देशांचं पालन तर ती करतातच पण आपल्या सहवासात येणाऱ्या व्यक्तीला आपल्या मायेची सावली देणे हे काम ती निरलसपणे करतात ...समाजासाठी काहीतरी करावं किमान आपल्या चांगल्या विचारांनी लोकांचं प्रबोधन करावं हेही खूप स्तुत्य काम यांच्या कडून होत असतं ......

आज एक चांगला विचार मांडला तर शे पाचशे लोक तो वाचतील आणि त्यातल्या एकाने त्या विचाराचे पालन केले किंवा पाठ पुरावा केला तरी त्यातून समाज घडेल …… हीच ती सावली सतत पडणारी /देणारी …. खरंच समाजालाही अशा डेरेदार वृक्षांची गरज आहे ………

===============

June 5, 2013 · Mumbai ·

हास्य तेंव्हाच पूर्ण होतं जेंव्हा ते तुमच्या मनातून येत, डोळयात दिसत आणि चेहऱ्यावर विलसत …… तुम्हा सर्वांच्या जीवनातं असे हसरे क्षण येवोत …

============

June 4, 2013 · Mumbai ·

आयुष्याला शेवट आहे, ते संपणार तर आहेच … पण आयुष्यातले सुंदर क्षण …. ते अधिक सुंदर करता येतील का? हे क्षण आपण चांगले जगू शकू का का? मुलायम नाती, मधुर आठवणी आणि प्रेमळ माणसं अत्तराच्या कुपी सारखी जपली तर हे नामुमकीन नाही.

==============

June 3, 2013 · Mumbai ·

आपल्या आयुष्याला जर पुस्तकाची उपमा दिली तर रोजचा दिवस एक पान आहे. ना ते पान आपण फाडू शकत ना तो दिवस आपण

पुसू शकत ... आपण फक्त एव्हढंच करू शकतो ... चांगल्या विचारांची सुरेख रांगोळी घालून तो दिवस आनंदी मात्र करू शकतो ...

==============

June 1, 2013 · Mumbai ·

एका "चंदनी" दारावर हलकेच थाप पडते.... आतून प्रतिसाद मिळतो मैत्रीचा ... कधी कधी उलट ही होत . दार बंदच रहात . . आणि मग हा मिळालेला प्रतिसाद , हे नातं , आपण जपण्याचा फुलवण्याचा , वाढवण्याचा कसोशीने प्रयत्न करतो . अपेक्षा असते निखळ मैत्रीची ,मन समजून घेण्याची आपलेच , आपल्यातले कळलेले ... अन न कळलेले विचार जाणून घेण्याची. . हाच तो मैत्रीचा जोडणारा पूल . रक्ताच्या नात्यापेक्षा सापेक्ष विचारांचे एक जाणत मन . आपण शोधत असतो ...एक आश्वासक उबदार हात ... जो हातात घेतल्याशिवाय त्याची ऊब जाणवावी हि साधी अपेक्षा ...

मैत्रीत मन आरशासारखं / इतक ... स्वछ हव. त्या मनाची स्पदन जाणवावीत, असं असेल का निखळ मैत्रीतलं मन? अपेक्षित असतं हितगुज, पण समोर येतो मुखवटा !! मैत्रीतला तो निर्व्याजपणा लोप पावलाय का? कधी वाटतं या मैत्रीच्या वाटेवर आपल्याला शिडी बंनता येत नसेल तर ... कमीत कमी साप तरी बनू नये. खरंच का मैत्री एव्हडी तकलादू असते, स्वार्थाने बरबटलेली असते? ? नका स्तुती करू... पण पाठीवर निंदेचे फटकारेही नका मारू !!

का हा मैत्रीचा वेल गगनावेरी जाण्याआधीच जमीनदोस्त होतो? कोणता आजार बळावतो आणि हे मधाळ नातं कडू होवून "राम" म्हणत....

================

April 9, 2013

राग, द्वेष, हक्क, आणि अहंकार यांची
आयुष्यातून वजाबाकी केली की
आयुष्य सोन्यासारखं उजळून निघत.
==========

April 14, 2013

गंध गंध या फुलांचा
रंध्रात हा पसरे जसा
स्पर्श त्यांचा सांगून जाई
मृदू मुलायम ह्ळूवारसां ...
==========

April 19, 2013

समजूतदारपणा म्हणजे नेमक काय .......? तुम्हाला न आवडणारी गोष्ट, समोरच्याला आवडते म्हणूनहसतमुखाने ती स्विकारणे किवां करणे किंवा होकार देणे .... किती सोप आहे ......

===

April 23, 2013

नुसते शब्दांचे फसवे बुडबुडे, स्पर्श होताच फुटणारे ....... खोल गर्तेत जाणाऱ्याला सावरणारे अनेक हात ............ शहाण्या साठी शिकलेला धडा ...... निर्लज्जासाठी पालथ्या घड्यावरचं पाणी ...... अंत:करणाच्या चरकातून मोहक शब्दांचं आलं लिंबू घालून काढलेला भावनांचा मधुर रस ............ रोजच्या रोजचा संवाद .... कधी सुखद, कधी चिडका, कधी आपलेपणाचा, कधी हिणवणारा ... अनेकानेक छटांचा !! या छटा एखाद्या चक्रासारख्या सतत एकामागून एक जात असतात. हे शब्द मग ते कोणत्याही भा षेतिल का असेना भावनांचा पापुद्रा मात्र तसाच असतो ......शब्दांच्या जंजाळात भले भले फसतात आणि काही मात्र या विहिरीतून कोरडेच बाहेर येतात. खरंच काय आहेत शब्द? एक अस्त्र ....... कि आधार ......? एक फसवा बुडबुडा ...कि भावनेचा गुंता..........?

===========

April 22, 2013 ·

कधी वाटतं, झोपेत आपण रात्रभर कुठलीतरी वाट चालत आहोत. पाय थकून जातात पण मनाचा शोध मात्र संपत नाही, काळोखाची चादर अंगावर ओढून, थकलेली मी पाय ओढत परत चालतच रहाते, त्या न संपलेल्या वाटेवर. ......

================

April 21, 2013 ·

राजस, लोभस आणि देखणं व्यक्तिमत्व लाभलेली ती ....

रोजच पहाते मी तिला .......

दु:ख मात्र एव्हढच आहे कि ............

अमावस्येच्या चंद्रासारखी ती पण शापित आहे !

===========

April 23, 2013

वर नभी बघताना, एकच तारा चमकत होता ...मोर मात्र मनीचा, मोर होवून नाचत होता ....

=======

April 18, 2013 ·

विश्व तुझं माझं आणि आपलंच
चिमण चाऱ्याच, काडी काडीने जमवायचं
भुर्रकन उडून, अलगद विसावायचं
एकमेकांसाठी एव्हढच फक्त करायचं
===========

April 18, 2013 ·

काहीजण रुसले ना कि त्यांचा रुसवा दूर करणं थोडं अवघड असतं ... पण तो रुसवा दूर करण्यातील गंमत काही न्यारीच !!

===============

आज एका अफाट गतीनं आयुष्याचा वारू धावत आहे ... या गतीतील एक असा धागा जो तुम्हाला एकमेकांशी बांधून ठेवतो ...

एक अकृत्रिम नातं, न तुटणार ...... अडीच अक्षरी शब्द प्रेम ... !! प्रेम एक अशी भावना, जी फक्त स्त्री आणि पुरुष यांच्यातच का असावी? ? हि भावना भावंडे, आजोबा- नातवंडे, गुरु-शिष्य, आई-मुल, मित्र -मैत्रिणी, आपले सख्खे शेजारी यांच्यातहि तितकीच उत्कट प्रेमाची

असावी. पण ... कधी कधी वाटतं 'लळा जिव्हाळा शब्दच खोटे कुणी कुणाचा नाही '

प्रेम हे फुलासारखं नाजूक आणि टवटवीत असाव, शंका-कुशंका न घेणार, उदार मनान मदत करणार, आपलं म्हणणार. समोरच्या व्यक्तीच्या मनातील जखमा हळूवार भरून काढणार .......... देवाची भक्ती हे आपलं त्याच्या वरचं प्रेम.

मला वाटतं देव तेंव्हाच प्रसन्न होत असेल जेंव्हा आपण खऱ्या अर्थाने त्याच्यावर प्रेम करत असू.

प्रेम करताना आपण काय आहोत हे बघणेही जरुरी आहे .........तुम्ही किती निखळ निर्व्याज प्रेम देवू शकता ......माणूस म्हणून प्रेम करण्यास तुम्ही लायक आहात का? ............ प्रेमाच्या बाबतितील आपली कर्तव्ये आणि त्या अनुषंगाने आलेली जबाबदारी याचं भान तुम्हाला आहे का? ............

प्रेमाची हि ज्योत तेवती ठेवणे हे आपल्याच हाती आहे ... नाहीतर ...............

सदियोसे बहती प्रेम कि गंगा बहती रहेगी ............

==============

April 14, 2013

कालचक्राच्या पाळण्यातून वाटतं खूप मागे जावं .... आयुष्यातले नवे पण, परत एकदा अनुभवावे ...... जगण्यातील झिंग अन ऊत्साहि नशा ......करतील पल्लवित मनीच्या आशा ...मागे वळून बघताना क्षणभर डोळे लकाकतात ....... पण,,, थकल्या मनाला पट्कन जाग येते ......आणि ऊत्साहाची नशा हळू हळू ओसरते ......

====================

April 12

चावून चावून चोथा झालेलं वाक्य ... जग ही एक रंगभूमी आहे आणि या रंगभूमीवर वावरणारे आम्ही सगळे कलाकार आहोत. खरंच आपण सगळेच मुखवटे घालून वावरत असतो. जे नाही ते आहे असं चेहऱ्यावर दाखवायचं आणि नेटाने पुढे जायचं. तुम्ही जितके जास्त एक्स्प्रेसिव्ह समोरचा तितकाच तुमच्या प्रेमात. हे मुखवटे घालून वावरताना, आपली भूमिका निभावताना आपण कधी कधी आपल्याला विसरतो आणि दुसऱ्याची भूमिका आपली म्हणून जगू लागतो. चेहरा खरा, कि त्याच्या वरचां मुखवटा ...? कधी कधी हे मुखवटे नाइलाजाने घालावे लागतात. ऑफिसातला एक, समाजापुढचा एक, कुटुंबातला वेगळा, मित्रातला वेगळा ... अनंत मुखवटे ... कर्णाला कवच कुंडले होती. आपल्याला मुखवटे ...घरातून बाहेर पडताना एक सुरेख स्मिताचा मुखवटा चढवायचा कि झाली दिवसाची सुरुवात. आणि मग सफाईदारपणे वठते, एक दिवसाची नाट्यशाळा!! .... गरजेनुसार यात भावनांची

अदलाबदल करायची ...जिसका जवाब नही ...!३ ६५ दिवसांचा अंक पुरा ...... नव्याला आरंभ ! खरं काय आणि खोट काय ...? पण हे सगळं करता करता एक दिवस असाही येतो ....... एखाद्या अनामिक आगीने मुखवटा होरपळून निघतो .........आणि आणि समोर येतो आतला खरा खुरा चेहरा ............ क्रूर, निष्पाप, संयमित, समजूतदार, दयाळू, निगरगट्ट, मनोहारी, गांजलेला .........

================

April 12, 2013 ·

तुझ्या माझ्यातला पाउस आठवतो तुला....?

कशा आपण भिजत भिजत दूरच्या टेकडीवर जायचो.....

अन जाता जाता रस्त्यावरच्या डबक्यातल्या पाण्यात पाय आपटून

पाण्याचे तुषार अंगावर उडवायचो..........

रागाने बघणाऱ्याला हळूच सॉरी म्हणून पुढे पसार व्हायचो ...

ते हसणे, ते भिजणे ते एकमेकीना जीवापाड जपणे..

सार काही आठवत आता ......

गाणाऱ्या पावसाच्या तालावर फेर धरून नाचायचो...

नाचता नाचता हळूचकन इंद्रधनुच्या पायऱ्याहि चढायचो....

कमानीच्या रंगाना हात लावून टाळया वाजवून हसायचो …

जादूभरे ते दिवस विसरता विसरत नाहीत ………

आणि अजूनही गाणाऱ्या पावसाची आठवण मनातून जात नाही …

==============

April 6, 2013 · Mumbai ·

मैत्री कोणाशी करावी.............? तर फुलांशी करावी, झाडांशी करावी, काट्यांशी करावी, गरिबीशी करावी, निसर्ग, प्राणी, मानव सगळयांशी मैत्री करावी. निसर्गालाही मन असतं, झाडं तुमच्यावर प्रेम करतात,, तुम्ही त्यांना वाचवा ती तुम्हाला सावली तर देतीलच पण अजूनही खूप काही देतील. दुसऱ्या ची मने समजून घ्या, आपल्यातली चिमूटभर गोडी त्याना दया. त्यांच्या विचारांची भावनांची कदर करा, दुखऱ्या मनावर हळू वार फुंकर घाला..... हि अनोळखी मने जाणून घेताना या फुलांचा एक अनोखा गुच्छ तयार होईल आणि मग होईल सुगंधाची उधळण.... मैत्रीचा हा अनोखा सुगंध पसरतच राहील !!

===================

April 6, 2013 · Mumbai

जगात वावरताना काही वेळां आपल्या मना विरुद्ध काही गोष्टी सांगितल्या जातात, या आपल्याला पटतातच असं नाही, पण होतं काय कि अक्कल गहाण ठेवून गाढवाला सुद्धा आपलं पिताश्री बनवावं लागत. परत सागणारे जे सांगतात त्यात त्यांचं म्हणणं असतं तुम्ही तुमचं तत्वज्ञान वापरू नका आम्ही सांगतो तसंच वागा किंवा तुमचं तत्वज्ञान वजा करा. हे म्हणजे जेवणातून मीठ वजा करण्यासारखं...... म्हणजे माझ्यातला ' मी ' बाजूला ठेवून त्यांनी सांगितलेला 'मी' 'माझ्यात आणायचा... बापरे धाप लागली ! किती कठीण !! असा 'मी' कुठे सोडता येतो का? ? योग करताना किती सुरेख सांगतात कल्पना करा तुम्ही सुंदर बागेत आहात.......... कर्म ! रात्रभर लाईट आणि वीजेचं थैमान. चालू होतं कसली झोप अन कसली बाग.......... आता बाग नाही दिसली तर चूक माझी आहे का? जे अतार्किक आहे ते पटवून घेणं थोडं अवघड आहे...... बघुया जमत का जिवनाच्या शेवटच्या टप्प्यावर......

===========

April 6, 2013 · Mumbai ·

प्रेम किणकिणाऱ्या नाजूक काचेसारखं असतं

तडा जाऊन भंगल तरी मनोमन जपायचं असतं

=========

April 5, 2013 · Mumbai ·

अबोला............ जो आपण कोणत्याही नातेसंबंधात निकराने पुढे रेटतो. आजच्या या धकाधकीच्या युगात अनेक आव्हानाना सामोर जावं लागत. प्रश्न यक्ष म्हणून समोर उभे राहतात, हळूवार नाती तुटेपर्यंत ताणली जातात. चूक कोणाची याचा कोणीच विचार करत नाही. दरी आणि दुरावा दोन्ही वाढत जातात, आणि नाती क्षणात तुटतात !. क्षुल्लक कारणाने तुटलेले हे रेशीमबंध तुटताना हळहळ नक्कीच वाटते. पण हे नातं वाचवण्याची धडपड आपण करतो का? यशस्वी माघार घेऊन त्या नात्यांना गोंजारण्याचा प्रयत्न तरी करतो का........... अशावेळी गरज असते स्व संवादाची, नात्यातील गुंतागुंत हळूवार सोडवण्याची, आपली आग्रही भूमिका थोडी मागे सारण्याची......... पण लक्षात कोण घेतो?

============

April 2, 2013 ·

एकटेपणा........ हवाहवासा वाटणारा................ समुद्राचा अथांग किनारा, संधीप्रकाशाची सुरवात, पाण्यावर विसावलेला तो सूर्याचा लाल गोळा... आणि समोरचा पाण्याचा सागर, मागे नजर जाते तो दिसते किर्र हिरवी झाडी, जांभळया डोंगरांच्या साथीने चुप चाप उभी. काही क्षण... आणखी काही क्षण...... आणि मग काळोखाची चादर वरखाली पसरते. आपलं एकटेपण अजून एकट वाटू लागत. मनाचा उभार हळू हळू ओसरायला लागतो........ समुद्राची गाज हळू हळू जाणवायला लागते. एक अनोख संगीत आसमंतात पसरत............ अनामिक भितीची एक लहर नसानसातून झिरपू लागते................ मन आणि शरीर थिजून जातं......... क्षणाक्षणाने ही जाणीव वाढू लागते........... आणि

एव्हड्यातच दूर..... समोर बोटीचे दिवे लुकलुकू लागतात................ मन जाणीवेत येऊ लागत..................... परतिचा मार्ग नव्याने दिसतो !

=================

April 1, 2013 ·

वाट बघता बघता दुपार, संध्याकाळ होते,
दूरवर कुठेही तिच्या नजरेत त्याची चाहूल नसते.
=================

March 31, 2013 ·

काही झाडांवर फुलांचा बहर उशिरा येतो, खूप वर्षांपासून लावलेलं मोगऱ्याचं रोप किंवा बरंच जुन आंब्याचं झाड, यावर आता फुल येणारच नाहीत म्हणून त्यांच्या कडे आपण दुर्लक्ष करतो...... पण अचानक एक दिवस मोगऱ्याचं ते छोट झुडूप चिमुकल्या कळयानी बहरून जातं.... तसेच काही सुहृद, आपल्या आयुष्यात खूप उशिरा येतात, त्यांचं येणं हि आपल्यासाठी पर्वणी असते. त्यांच्या सहवासाची गोडी आपल्याला पुरवून पुरवून चाखायची असते. हे सुहृद म्हणजे ग्रीष्मातील पावसाच्या सरी असतात, सावली देणारी झाडे असतात, तृषा शांत करणारी पाणपोई असतात. आपण यांच्या येण्याची, सहवासाची, मित्रत्वाची आतुरतेने वाट बघतो. त्यांच्यामुळे जीवनातंले क्षण परीस स्पर्श लाभलेल्या सोन्यासारखे होतात

==============

March 22, 2013 ·

तिन्ही सांजेच्या कातर वेळी

नको वाटते हि उदासी

झाडांच्या या दाटीमधुनि

रविकिरणांची अदभूत खेळी

मनाभोवती पिंगा घाली

नात्यांची नाजूक पाकोळी

देवापुढति बसूनी मग ती

वात सरकवी निरांजनाची.

===============

March 22, 2013 ·

तो एकच विषण्ण क्षण ज्या क्षणी मनातील ती भावना प्रबळ होते, जिवना वरचा विश्वास डळमळीत होतो. किती तरी लक्ष योनी पार करून मिळवलेला मनुष्य जन्म संपवून टाकावा वाटतो............ बेगुमानपणे आपलं आयुष्य संपवून टाकावं का वाटतं? ? प्रय्तेकजण एक आयुष्य जगत असतो............. कोणी हसत हसवत जगतो, कोणी रडत रडवत जगतो, कोणी लढत लढवत जगतो तर कोणी हेच आयुष्य नंदनवन बनवून जगतो !! जगणं महत्वाच. ज्या क्षणी जगणं ओझ वाटू लागत त्या

क्षणी आत्महत्येचा विचार मनातं येत असावा. आपण आपल्या दुसरया वरील प्रेमाच्या कितीही वल्ल्गना केल्या तरी, स्वतः इतक प्रेम माणूस कोणावरही करत नाही... मग स्वतःच्याच इतक्या प्रेमात असलेला माणूस आत्महत्या का करतो? ......... म्हणजे कारण न टाळता येणार आहे /असाव. रोज क्षणाक्षणाने मृत्युला कवटाळण्य़ापेक्षा एकदाच एक मिठी मारली तर ती निश्चीत सुखावह असेल का? ? आपलं आयुष्य संपवण्याची प्रेरणा जेंव्हा मिळत असेल, तेंव्हा काय आणि कशी आंदोलन उमटत असतील? ? स्वतःवर इतक प्रेम करणारा माणूस आयुष्याला तिलांजली देतो तेंव्हां तो भेकड की शूर? ? परमेश्वराच्या ओढीने त्यांनी हा निर्णय घेतला असावा......................................... !!

============

March 21, 2013 ·

प्रेम म्हणजे निळयाशार आकाशाची गर्द निळाई प्रेम म्हणजे सागराच्या तळाची गहिरी खोलाई प्रेम म्हणजे सुरावटींचा मधुर प्रवास प्रेम म्हणजे शुभ्र मनांचा सुरेख मिलाफ

===========

March 20, 2013 ·

सल्ले आणि सल्लेकरांची दुनिया ( वागले कि दुनियासारखं वाटतंय का? ) हं तर अनाहूत सल्ले देणारे ते देत रहातात. नुसता देत नाहीत तर तो पूर्णत्वाकडे गेला कि नाही याची शहनिशा करतात. तो त्यांचा जन्मसिद्ध अधिकार असल्यासारखी !. सल्ला आपण त्यांना विचारलेला नसतो, ज्याला विचारतो तो बेफिकीरीने दुर्लक्ष करतो, ज्याला द्यावा वाटतो तो संपर्क क्षेत्राच्या बाहेर असतो, जो संपर्क क्षेत्रात असतो त्याची लायकी नसते, ज्याची लायकी असते तो जबर किमत वसुलतो, किमत देण्यासाठी आपल्याकडे त्याच्या योग्य काही नसते.............................. प्रचंड घोळ !! जाऊ देना. प्रय्तेक लिहिण्याला अर्थ असावाच का

March 19, 2013 ·

आम्हा गृहिणीसाठी रोजचा स्वयंपाक हा कुटुंबाचे पोट भरण्यासाठी करायचा की त्यांच्या जिभेचे चोचले पुरवण्यासाठी करायचा, हा थोडासा गुंतागुंतीचा मामला असतो. अर्थात गृहिणीही तितक्याच हुशार असतात त्या बरोबर सुवर्ण मध्य काढतात. पण कधी कधी उदरभरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म म्हणून समिधा टाकाव्या तर भरपूर धूर होतो. आणि आता पुरे सात्विक जेवण म्हणून डोळे मोठे होतात. मुलीना हवं असतं चटपटीत खाण. आणि इथून रस्सीखेच सुरु होते. मुलाने गाणं शोधलं "कोण होतीस तू, काय झालीस तू " एकतर आता जास्त तेल तूप खायचं नाही म्हणून जेवण करावं तर हे ऐकून घ्यावं लागत. नोकरी असेल तर रोजच्या जेवणाची आखणी करावी लागते..................... यातून तावून सुलाखून आता बाहेर आल्यावर वाटतं, तेच ठीक होतं. आता २४ तास घरी म्हणजे पसंद अपनी अपनी,. खयाल अपना अपना. तसे आम्ही

कायस्थ खाण्यासाठी जगतो ! तरीही हल्ली बरेच पर्याय आहेत, पास्ता, पिझ्झा, नूडल्स हे आजच्या पिढीचे पदार्थ. मग मधली फळी, आणि शेवटी आम्ही......... पोषणमूल्य जपा, क्यालरीज मोजा नसता ताप डोक्याला. पण आपली भारतीय खाद्य संस्कृती इतकी महान आहे........... की खाल्लेला एक पदार्थ परत खाण्या साठी खूप अवधी जावा लागेल. असो भारतीय नारी मात्र जेवण करायला कधीच कटाळत नाही............. अर्थात " द्रौपदीची थाळी " मला कोणी भेट केली तर ती, मी आनंदाने स्वीकारेन !

-------------------

March 19, 2013 ·

रांगोळी हा प्रत्येक भारतीय स्त्रीच्या जिवनाचा अविभाज्य भाग आहे. दारासमोरचा अगदी चतकोर तुकडा का असेना पण तिथे तुम्हाला सुंदर नाजूक रेखाटन दिसेल. आणि म्हणूनच आपली संस्कृती जगाच्या पाठीवर ठाम ऊभी आहे. मला वाटतं रांगोळी हा प्रकार प्रभू रामचंद्र जेंव्हा परत आले तेंव्हा पासून गुढ्या तोरणे व, रांगोळयांनी त्यांचे स्वागत केले, हे प्रत्येक मनातं लिहिलेलं आहे. पूर्वी सडा सारवण करून दारात रांगोळी काढत. शुभ चिन्हाची हि रांगोळी मन आणि परिसर दोन्ही प्रसन्न करते. आजकाल या रेखाटनाचे खुपसारे प्रकार पाहण्यात येतात. दिवाळी अन पाडवा या दिवशी तर रांगोळयांचे महत्व अजूनच वाढते. स्त्री मोठी असो कि लहान रांगोळीत मात्र ती रमून जाते.

-------------

March 12, 2013 ·

आते है वो जब बहार लाते है,

चले जानेसे ऊनके तो........ , फुलभी मुरझा जाते है ।

March 12, 2013 ·

सांग दर्पणा कशी मी दिसते............? उत्तर अर्थातच सुंदर, अतिसुंदर असंच असणार, परत परत आपलं रूप न्याहाळं ण्याचा छ्द आपल्या सर्वांनाच असतो, किती वेळा किती बाजूंनी आपण स्वतःलाच पाहतो उत्तरही तेच मिळत आपल्या स्वतःच्या प्रतीबिबा बरोबर जर आपल्या मनाचे प्रतिबिंब पाहता आले तर काय बहार येईल !! मन अधिकाधिक सुंदर कण्याचे अनेक उपाय शोधता येतील. :))))))

March 9, 2013 ·

आयुष्यात येणारी माणसं आणि आयुष्यातून जाणारी माणसं यांना आपण थोपवू शकत नाही.

काही व्यक्तिमत्व इतकी अलगद आपल्या आयुष्यात प्रवेश करतात कि हे समाजायला थोडा अवधीच लागतो, मात्र एकदा

हा प्रवेश झाला कि ती आपलं विश्व व्यापून टाकतात, मोगऱ्या च्या मंद मधुर वासासारखी !!तो सुवास मग

मनभर पसरतो......

-----------------

March 5, 2013 ·

स्त्री कितीही शिकली, कितीही आधुनिकतेकडे झुकली ती कितीही स्वतंत्र झाली आणि तिच्या स्वातंत्र्याचे कितीही गोडवे इतरांनी गायले तरी तिच्या वरचा स्त्रीपणाचा शिक्का काही पुसला जात नाही. तेच तेच करून तीही कधीतरी कंटाळते, वाटतं बस झालं... उबग आला या जगण्याचा, किती करायचं, किती परीक्षा द्यायच्या? अरे यापेक्षा किडा मुंगी बरे... तिची स्वप्न.. कधीही पूरी न होणारी... तिला वापरणारी नाती आणि त्यांच्यासाठी झटणारी ती.... तेच घर, तेच स्वयंपाकघर, तेच फर्निचर. तिच कोमेजलेल्या पालेभाजीसारखी नाती... पाणी शिंपडून ताजी न होणारी!!! या साऱ्या गोंधळात ती "नाच ग घुमा" सारखी घुमतेय... सगळं निभावतेय, कर्तव्य बजावंतेय... अनेक प्रश्न... उत्तरे मात्र हरवलेली !! एक स्त्री म्हणून तिला नेहमीच परीक्षा द्याव्या लागल्या... समजत्या वयापासून अभ्यासा शिवाय ती काही न काही शिकतच होती परीक्षा देतच होती........ एक झाली कि दुसरी.... आणि मग आली मोठी परीक्षा, वधू परीक्षा !!ते निरखण, पाहण, प्रश्न आणि उत्तर... मग" विवाह वेदी "...... नंतर संसारातलं पाहिलं पाऊल आणि त्याच बरोबर येणाऱ्या लहान सहान परीक्षांची न संपणारी यादी, अनेक कसरती, अनेक नाती तोडलेली आणि जपलेली.... या संसारात ती मात्र सतत ऐरणीवर होती... घरची जबाबदारी झेलताना आपला आत्मसम्मानहि तिला लांब ठेवावा लागत होता. पुरुषासारखं राबून, मर मर काम करून स्त्री पणाच्या कोशातून तिला बाहेर पडता आलेच नाही ! नोकरी करणारी ती.... कधी सावज होता होता वाचत होती, कधी धैर्याने लढत होती. बाहेरच्या या बुभुक्षित नजरांचा तिला धाक वाटे, चीड येई, घृणा निर्माण होई, किळस

येई.... पण तिचे पुढे जाणे अटळ होते... सन्मानाच्या शब्दाविना !!! खरं तर समाजाला देण्यासाठी तिच्याकडे सुंदर, शाश्वत गोष्टी आहेत पण त्याचा कोणी विचारच केला नाही. आई, बहिण, बायको, वाहिनी, मुलगी, सून अशा अनेक जबाबदाऱ्या तिने सांभाळल्या पण यातून निवृत्त होणे तिच्या साठी अवघड झाले आहे. विचाराच्या प्रवाहात तिला आलेले स्मशान वैराग्य...... ती झटकून मोकळी होऊच शकत नाही.......... आता तिला प्रतिक्षा आहे फक्त कायमच्या निवृत्तीची !!!!!

--------------

निरागसता एक असा गुण ज्याच्या आपण प्रेमात पडतो, पटकन विश्वास ठेवतो. निरागसता आणि लहान मुल हे एकच समीकरण मला माहित आहे. पण या छोट्यांच्या निरागसतेलाहि कधी कधी बेरकीपणा, खोडसाळपणा आणि स्वार्थीपणाचा वास येतो. यांचा वयोगट १ ते १३. पण संवाद साधून प्रतिक्रिया मात्र घेता येते ९ पासून पुढे..... मला मात्र भावतो ९ ते १३ हा वयोगट. या वयातील हि मुल सांगितलेले ऐकून घेतात त्यावर प्रतिक्रिया देतात किंबहुना या प्रतिक्रिया आपल्याला हव्या तशा आपण त्यांच्या कडून मिळवू शकतो.

लळ|, जिव्हाळा, प्रशंसा, थोडेसे चुचकारणे या सर्वाला हि मुले लवकर वश होताना दिसतात. आत्मविश्वासाची फुंकर घालून हळूवार मैत्रीची फुलपाखर यांच्या मनातं फुलवली कि तुमचं अर्ध काम झालं. त्यांच्या मनाजवळचं आईचं नातं अधिक जपावं लागत. मुली जास्त समजूतदार असतात. या सुंदर चिवचिव करणाऱ्या चिमण्या आजूबाजूला असल्या कि खूप छान वाटते या चतुर चिमण्या आपल्या शिक्षकांना कसे

खूष करावे हे ओळखून असतात. शिक्षकी पेशाच्या या फुलोऱ्यात गमावत काहीच नाही कमावतो मात्र खूप.... या मुलाचं निस्वार्थ प्रेम !!

माझ्या शाळेतली सगळीच मुल गुणी आहेत. आज जगाच्या पाठीवर कुठे कुठे हि मुल आहेत, संम्पर्कात असतील, नसतील पण त्याच्या बद्दल अभिमान आणि प्रेमच वाटते ! आज वयाच्या वाढतेपणा बरोबर सर्वच आठवत नाही. परवा विक्रम म्हणाला, "टीचर शिक्षक दिनाला मी तुम्हाला गुलाबाचे प्लास्टिकचे फुल दिले होते तेंव्हा " त्या" फुलाला एक वलय होतं.

मला अजूनही तो मुलगा आठवतोय, तो पुढच्या वर्गात गेला आणि मी दुपारी तो सकाळी यायचा, हा मुलगा त्याची सकाळची शाळा सुटल्यावर आमची प्रार्थना होई पर्यंत थाबायचा, सुरवातीला लक्षात आले नाही पण, लक्षात आले अन मग हसू आले... एक छोटा "बॉय फ्रेंड" मिळाला मला.

काही नाती मुल आपल्या शिक्षकात शोधतात...... माझा फ्री पिरीयड होता, मी आपलं काम करत होते मुल आपलं, इतक्यात एक मुलगा जवळ आला आणि म्हणाला "टीचर तुम्ही आज खूप छन दिसता हा रंग छान दिसतोय तुम्हाला"{ इ. ५ }एक क्षण मी त्याच्याकडे पहिले आणि म्हटलं "अरे आई कोणत्या रंगाची साडी नेसली रे आज? " टीचर, आई सकाळीच ऑफिसला जाते मी जाताना कधी पाहतच नाही तिला" त्या क्षणी अभिपाय देण्याची आपली उर्मी त्याला दाबून ठेवता आली नाही. अशी अनेक उदाहरण अंतर्मुख करायला लावणारी.

गेल्या वर्षीची गोष्ट... वर्गात असाच एक खोडसाळ मुलगा, त्याला समजावून मी थकले. शेवटी" तू कायम पहिल्या बाकावर बस म्हणजे खोड्या कमी करशील" म्हणून पहिल्या बाकावर बसवले..... दिवसातून कमीतकमी ३० /३५ वेळा मी त्याचे नाव घ्यायची... एकदा मी वैतागून त्याला म्हटले " अरे इतकेवेळा मी देवाचे नाव घेतले न तर तो प्रसन्न होऊन म्हणेल मिसेस जयवंत वर मागा मी प्रसन्न आहे!" का कोणास ठावूक दुसऱ्या दिवसापासून त्याच्यात थोडी सुधारणा झाली. काही दिवसांनी त्याच्या आजीशी शाळेत भेट झाली आणि त्याच्या विचित्र, खोडसाळ वागण्याची कथा कळली.

या सगळ्या अनुभवातून खूप शिकता येत आपल्या वाटचालीत दिशा मिळते. प्रत्येक वेळेस आपण यशस्वी होऊच असे नाही पण प्रयत्नांची पराकाष्ठा करणे गरजेचे आहे. मला वाटतं शिक्षकाला उत्तम अभिनय करता यायला हवा. नव्हे हे एक अतिरिक्त अंग असावे. शेवटी आम्ही मानवी मन हाताळतो यंत्र नाही !!!! '

--------------------

February 21, 2013 ·

निरनिराळ्या प्रकारच्या मिठाया आपण सगळेच आवडीने खातो. या मिठाईचा मूळ गाभा म्हणजे त्याची गोडी, मग या गोडपणाला निरनिराळ्या आवरणातून, रंगातून, आकारातून अधिक चवदार, स्वादिष्ट बनवल जातं. तसंच हसणं हि असतं, मधुर, आकर्षक अन गोड. काचेतून

मिठाई जास्त खुणावते, पण हसणं मात्र प्रत्यक्ष समोर आलं कि जास्त छान वाटतं.

हसण्यावर बरीच वाक्य आहेत, कविता आहेत. जसं " हसा आणि लठ्ठ व्हा ", हसत राहा, हसा ज्यामुळे लोक संभ्रमात पडतील ", हसले ग बाई हसले अन कायमची मी फसले", " सखी शेजारिणी तू हसत रहा हास्यात फुले गुंफित रहा" आणि या वाक्यांबरोबर मिठाई सारखे हसण्याचे प्रकारही आहेत. "हसत रहा" हा संदेश देणं सोप आहे पण चेहऱ्या मागचे अनेक कष्टदायी भाव, चेहऱ्यावर आणू न देता चेहरा हसरा ठेवणे हे एक कौशल्य आहे.

लहान मुलांच्या सुरेख चेहऱ्यावरचे "निरागस हसू " कोणाला आवडत नाही? जीवनातंले कटू अनुभव येण्या आधीचे

हे हसू ! तर निष्पाप चेहरा आणि निष्पाप हसू !!ज्या हसण्या वर

आपण प्रेम करतो.

२ खोडी काढून, गम्मत करून आपण हसून समोरच्याला हसायला भाग पडते ते हे खट्याळ हसू !!{खोडसाळ कन्हय्या !!}

३ मोहक हसू, ज्या हसण्यात सार जग विरघळून जाते, ज्याची मोहिनी सर्वांवर पडते ते हसू { परी, अप्सरा, मेनका, रंभा }

अर्थात पृथ्वी तलावर तारका आहेतच ! ४ स्मितहास्य, हसू कि नको याच्या सीमारेषेवरच. हसलं तरी सुरेखच आणि नाहीतरी सुरेखच !!हे हसू दिसायला सुंदर !!५ खळ खळून हसणे, मनाचा मोकळेपणा दर्शवणारे, खळाळता झरा जसा वाट काढतो तसं हे हसू !मनाची शुद्धता यातून पारखता यावी !६ कमावलेलं हसू हे हसू एका कोनातून हसलेल, " मर्यादित" याचा विशिष्ठ कोन सहसा बदलत नाही. समोरच्याला आनंदाचं गाजर दाखवणार. या हास्यातून समोरचा त्याला अपेक्षित अर्थच घेतो.

पुढाऱ्यांचे हसू असेल का?

७ छद्मी हसू, केलेल्या कुरघोडीचा अवर्णीय आनंद ज्यातून प्रकट व्हावा असे हसू {दुर्योधन? }

८ गड गडा टी हसू, आपल्याच किंवा कोणाच्याही बोलण्यावर प्रचंड आवाजात हसले जाते ते !

९ उच्कीदार हसू, हे ऐकताना समोरच्याला उचकी लागली असे वाटून, त्याला पाणी देण्यासाठी आपण उठावे या प्रतीक्रीयेपाशी आपल्याला आणणारे हसू !

१० केविलवाणे / ओशाळ वाणे, हेही थोडेसे नाराजीने हसण्याचे प्रकार. हे हसणे पाहून त्याबद्दल सहानुभूती वाटते.

मी मात्र बुडून जाते " खळीदार" हास्याच्या प्रेमात !! गालावर खळी पडून हसणाऱ्या व्यक्ती किंवा उलटपक्षी हसताना ज्यांच्या गालाला खळी पडते त्या व्यक्ती !!..... त्या इवल्याशा खड्ड्यात

पडून बुडायला होतं !!!!!!!!!!!!!

------------------

February 20, 2013 ·

जीवनाच्या बागेत फुलणाऱ्या फुलांपैकी एक फुल

प्रकाश शलाके सारखी तेजाची रेघ

सकाळच्या सूर्यासारखं तेजस्वी अन टवटवीत

तितकंच कणखर पण जवळचं वाटणारं

रंगीत तरीही रंग माझा वेगळा म्हणणार

मनी विचार येताच, ओठावर स्मित आणणारं

वाऱ्यालाही दाद न देता, आपल्या पाकळ्या जपणार

आणि अधूनमधून डोकावून, आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव करून देणार !!!!!

============

February 20, 2013 ·

एक ओळखीचा चेहरा पण कधीही न पाहिलेला ;

रोजचेच नेमके संवाद ' पण त्यांचे आवाज मात्र न ऐकलेले

रोजचीच विचारपूस, ' पण त्यातला ओलावा मात्र न जाणवणारा

ओठावरचे ते सुंदर, मधुर हसू पण त्याचा खळ खळ|ट मात्र कोसो दूर !

मी पणाचा तो चढेल आलेख, आणि अचानक कोसळलेला त्यातला फोलपणाचा सूर.....

काहीच खरं नाही? कि सर्वच त्या क्षणापुरत खरं !

नाही मानली तर दगडाची निर्जीव पुतळी ; अन मानली तर देवाची पूजनीय मूर्ती !!

==============

February 16, 2013 ·

शब्द अपुरे पडतात अन मग स्पर्शाची ओढ लागते. शब्द आपल्याजागी अत्यंत प्रभावी असतात पण आपण सारे स्पर्शाचेहि

भुकेले असतो. देवाची स्तुती आपण करतो, त्याचं सुंदर लोभसवाणं रूप डोळयात साठवतो पण आतून धडपड असते ती त्या भगवंताच्या पद स्पर्शाची, त्याच्या चरणावर माथा टेकण्याची.

देवाशी संवाद साधताना त्याच्या स्पर्शाची आस असतेच.

सुंदर, मृदू, मुलायम फुलाचा स्पर्श.... किती सुखद किती हवासा !!. फुल खुडताना मला नेहमी वाटते, आपण याला खुडतोय, खरंच याला काही वेदना, यातना होत असतील का? पण खुड्ल्यानंतर मात्र त्याच्या सुवासासाठी नाक अधीर होतं.... नाकाला जाणवतो फक्त सुगंधाचा स्पर्श......

इवलासा जीव जन्माला येतो... आणि मग त्या आईची धडपड सुरु होते त्या बाळाला घेण्यासाठी, स्पर्श करण्यासाठी. तो स्पर्श जेंव्हा ती करते तेंव्हाचा आनंद अवर्णनिय असतो. मन शांत, तृप्त होतं. निर्मितीचा आनंद आपल्या हातात असतो या स्पर्शाची जादू मनातंल्या उर्मी वाढवत असते................

असाही स्पर्श न केलेला !! शरीराचा अणुरेणु या स्पर्शासाठी आसुसलेला असतो, मन आक्रंदत असतं डोळे तुडुंब भरून वाहत असतात..... त्या रक्तामासाच्या गोळयासाठी... जो तिला परत कधीही दिसणार नसतो.... खोलीतली डॉक्टरांची कुजबुज तिच्यापर्यंत पोहचत असते....... ती केविलवाणी होऊन

डॉक्टरांना सांगण्याचा प्रयत्न करते, डॉक्टर फक्त एकदाच मला त्या बाळाला पाहू द्या, हात लाऊ द्या.... पण तिचं कोणीही ऐकत नाही... अचानक कुठेतरी कसलीतरी कळ जाणवते, काहीतरी टोचल्याची वेदना जाणवते........... आणि मग ती एका अंधाऱ्या खोल विवरात कोसळत जाते. तो स्पर्श साकारण्याची तिची धडपड अपूर्ण राहते.........

================

February 5, 2013 ·

राधा ही बावरी........ राधा का बावरी झाली..... कृष्णा वरच्या तिच्या प्रेमामुळे? .... राधा आणि कृष्णाचे हे नातं मनाला भुरळ घालत... किती खरं किती खोट असही वाटतं.... पण या नात्याच्या झरोक्यातून नजर टाकताना राधेचं कृष्णावरचं अपार प्रेम आणि भक्ती दिसते. नुकतंच लग्न होऊन सासरी आलेली राधा..........

पहिल्यांदा जेंव्हा गोकुळात येते तिची कृष्णाशी भेट होते आणि तिच्या मनातं कृष्णाविषयी एक हुळूवार भावना जन्मते. आणि हीच भावना नंतर अखंड ज्योतीचं बनून जाते....................

स्त्री ही देहाने दुर्बल असली तरी मनाने अधिक भावनाप्रधान आहे. सेवाभाव आणि त्याग हे स्त्रीच्या ठिकाणी असलेले नैसर्गिक गुण. गोकुळात रमलेल्या राधेला जी आपुलकी आणि प्रेम मिळाले त्याने ही सासुरवाशीण तिथे अधिक ओढली गेली. कृष्णाचा मोकळा स्वभाव, त्याचे मुरली वादन, त्याचे मनोहारी रूप आणि सासुरवाशीण म्हणून राधेला

समजून घेण्याचा त्याचा प्रयत्न.. यातून राधा अधिकाधिक कृष्णमय होत गेली. कृष्णाच्या फक्त आठवणीने तिचे मन व्याकूळ होत होते.

कृष्ण होता जीवन जगण्यास उदुयक्त करणारा, दीनाना सबळ करणारा.... याच कृष्णाविषयीच्या प्रेमातून राधा कृष्णाची भक्त झाली. याच आपले पणातून, प्रेमातून कृष्णाने राधेला जन्मोजन्मीच्या ऋणानुबंधांची जाणीव करून दिली. गोकुळात राधेवर टीकाही झाली पण............ प्रेमाच्या या आंतरिक प्रवाहाला कोणी थाबवू शकले नाही. कृष्णाचा फक्त ध्यास आणि स्मरण राधेच्या मनी होते. या भगवंताचे गुण तिने ओळखले होते. यावरून तिचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. प्रत्यक्ष ईश्वर तिचा सखा होता.. असा सखा असणारी राधा बावरी असूच शकत नाही............................

आणि म्हणूनच कृष्णाआधी तिचं नाव येत.......... राधा!!

==========================

January 30, 2013 ·

प्रेम कशावर कराव.....?

वाऱ्याच्या वेगावर, ताऱ्यांच्या चमचमण्यावर

पावसाच्या सरींवर, फुलांच्या सुंदरतेवर

निसर्गाच्या हिरवेपणावर, माणसातल्या माणुसकीवर

तान्हुल्याच्या स्पर्शावर, प्रेम कशावरही कराव...........

पण हे प्रेम समजून कराव, त्यातला अर्थ उमगून कराव

प्रेम अगदी भरभरून कराव, उतू जाणाऱ्या दुधासारखा फसफसून कराव.... प्रेम हि भावना मनाला सुखावते, प्रेमाची उत्कटता ओठातून विलगते........ प्रेम करताना हातचे राखू नाही.........................

पण त्याचे दुकानही मांडू नाही..........

प्रेम करावं तान्हुल्याच्या जावंळावर.............

प्रेम करावं त्याच्या निष्पाप निरागस्तेवर................

प्रेम करावं त्याच्या मिटलेल्या चिमुकल्या मुठींवर.....

प्रेम करावं त्याच्या मऊ मुलायम रेशीम स्पर्शावर....

प्रेम कशावरही कराव..........

===============

एक छोटी ७ वर्षांची चिमुरडी माझ्या कडे येते. काल बोलता बोलता मला म्हणाली " ए टीचर तुझी मदर टंग काय? "

मी :मराठी

ती: मग फादर टंग? ? ?

मी : सोना अगं फादर टंग नसते.

ती :पण माझ्या क्लास मधे माझी मैत्रीण आहे नं तिचे वडील गुजराथी बोलतात आणि आई मराठी मग फादर टंग वेगळी आणि मदर टंग वेगळी आहे कि... smile emoticon तिच्या बऱ्याच शंकांचं निरसन करावं लागत... तिचा अजून एक प्रश्न " ए टीचर मुलीचं का नाव आणि

आडनाव बदलतात, मुले का नाही? .. आता यापुढे कि नाही आपण त्यांना सांगू कि... हे बरोबर नाही तुम्ही च नाव बदला

ओके!............ मी. लहान मुले किती निरागस असतात कधी कधी............ !!!!!!

===============

January 22, 2013 ·

आजच्या या घाईगडबडीत स्कूटर चालवता येणे हे आपण आपल्यासाठी आत्मसात केलेले एक कौशल्य \ वरदान आहे. माझ्या किती मैत्रीणीना स्कूटर येते माहित नाही पण दुचाकीवर स्वार होणाऱ्या कोणत्याही सखी बद्दल मला अभिमान वाटतो. पटकन बटण दाबून किंवा किक मारून हवेत दुपट्टा उडवत जाणाऱ्या या ललना बघून मन सुखावत. माझे डोळे त्यांच्या जाणाऱ्या दिशेकडे टकमक बघत राहतात........... आणि हे मला का जमू नये हे मला खुपायला लागत. अं... प्रयत्न केला पण त्याला काळ लोटला. तेंव्हा तितकी गरजहि वाटली नाही... पण आता मात्र हे जाणवत कि, मनातं आल्यावर लगेच जाता यायला पाहिजे. मुलाला सांगावे तर त्याच्या दहा सूचना आईकाव्या लागतात,....... "बसल्यावर कॉमेंट्री करू नकोस, मागे बसणाऱ्यासाठी धरायला सोय आहे, तू खांद्यावर हात दाब्लास तर ब्रेंक लागत नाही, डावी-उजवीकडे वळताना हात दाखवायची गरज नाही गाडीला मागे दिवे असतात", टीचर ",.. हि हाक कुठूनही आली तरी हात हलवू नको आख्खी मोटारसायकल हलते. शेवट... मी दहा ठिकाणी थाबणार नाही. " एवढ सगळे ऐकल्यवर, माझी चल

म्हणण्यातली ताकद कमी होते. आता माझ्या सुनेने मला स्कूटर शिकविण्याचे शिवधनुष्य पेलायची तयारी दाखविली आहे पण मीच मागच्या बाकावर आहे.... अरे त्यापेक्षा माझे रिक्षावाले काका बरे तासभर आधी फोन केला कि येतात आणि लायब्ररी ते रिचार्ज कुठेही थाबतात............ पण दुःख असं आहे कि वेगावर स्वार होऊन वाऱ्याशी हितगुज करीत मोकळ्या रस्त्यावर भन्नाट जायची माझी इच्छा अपुरी राहते.

दुचाकीवर स्वार एम. एच. १२ चे रंग बिरंगे रस्ते मी जेंव्हा पाहते तेंव्हा मनाचं फुलपाखरू अलगद त्या काल्पनिक दुचाकीवर स्वार होते. या जन्मी न जमलेली गोष्ट मला आता पुढच्या जन्मी पुरी करण्यासाठी देवाकडे विनवणी करावी लागणार.............. "हे भगवान अगले जनम मुझे बिटीयाही कि जो.. पर आतमविश्वास कि मात्रा जरा जादा भर देना प्लीज !!!!"

================

January 12, 2013 ·

नाती अगणित.. अनमोल मोत्यांसारखी..........

जपता जपता तुटणारी आणि ओघळता ओघळता वेचून जपायला लावणारी...

नात्यांचे असंख्य पदर, अनेक पापुद्रे हळुवारपणे हाताळण्याचे.

नातं... आई मुलाच, नातं.. बाप लेकीच, नातं सासू सुनेच, नातं शेजारणीच, नातं देव आणि भक्ताच, नातं गुरु शिष्याचे, नातं न पाहिलेल्या मित्रमैत्रिणींचे........ अनेकानेक मोती......

काही माळेत गुफलेली नाती तर काही शिमपाल्य्तून हळूच हसणारी नाती, काही तर समुद्राच्या खोलाईतून बाहेर येण्यासाठी धडपडणारी नाती............

नाती हसवणारी नाती रडवणारी... नाती नतमस्तक करायला लावणारी.... काही फक्त काठावरून डोकवायला लावणारी......

अश्या नात्यात काही नाती मात्र फक्त बेगडी स्वार्थाने लडबडलेली

एक नातं विश्वासाचं.. पण दुसरं अविश्वासाने पोखरलेल

एक नातं खूप दुरून आपलेसे करणार... आणि दुसर जवळ राहून

सुद्धा परक करणार...........................

पण एक नातं मात्र सर्वांसाठी सारखं, घट्ट रोवलेल.............

आपल्या मातीशी नातं सांगणार !!!!

================

January 10, 2013 ·

प्रत्येकाचे जगण्याचे तत्वज्ञान वेगळे असते. पण मनातंले विचार कधी कधी अस्वस्थ करतात..... जगणे हि एक कला आहे. कोणतीही कला ही सुंदर असते, असावी. त्याचप्रमाणे जगणेही सुंदर असावे ही सर्वसामान्य

अपेक्षा, पण खरेच जगणे इतके सुंदर असते का? .... कधी कधी सुंदर या शब्दापासून ते कोसो दूर असते. जगण्याकडे कला म्हणून पाहायचे असेल तर ते कलात्मकपणे रचलेले असावे. त्याला अर्थ असावा, लयकारी असावी, हाताशी भरपूर रंग असावेत, स्वप्नांचे इमले रचून ते पूर्ण करण्याची ताकद असावी. जगणे हे " टेलर मेड " असावे असं नाही पण ते सुसह्य मात्र नक्की असावे.

उभ्या आडव्या, साध्या सरळ, वक्र अशा रेशातून एक आकृती बनते त्यात साजेसे रंग भरले कि तीच कलाकृती अप्रतिम होते. पण जगण मात्र इतक सोपं होत नाही. कधी कधी उभ्या आडव्या रेषा आखताना आणि खोडताना पाव आयुष्य संपून जाते, आणि मग त्यात रंग भरता भरता नुसती दमछाक होते.

प्रतेयेकाच्या वाट्याला इंद्रधनुष्य येईलच असे नाही, पण आपले जगणे सुंदर करण्यासाठी काही रंग त्यात जाणीवपूर्वक भरावे लागतील.. विश्वास, सहकार्य, सहानुभूती, आपुलकी, दया, माया, शांती आणि प्रेम..... तर कदाचित आपली जगण्याची कृती अधिक सुरेख होईल.. आणि म्हणता येईल... रंग माझा वेगळा.

==============

January 3, 2013 ·

आठवणी आठवायच्या असतात, आठवणी साठवायच्या असतात... आठवणींच्या पसाऱ्यातून त्या अलगद वेचायाच्या असतात.......

कि आयुष्याच्या झुल्यावर झुलत त्या फक्त कुरवाळ|याच्या असतात............

आठवणी असतात गोड खडीसाखरेच्या खड्यासारख्या पटकन विरघळणाऱ्या...........

आठवणी असतात गाभूळलेल्या चिंचेसारख्या आंबटगोड चवीच्या. आठवणी असतात कडू कार्ल्याच्या चवीच्या पटकन गिळायला लावणाऱ्या..........

काही आठवणी मात्र असतात मउ, मुलायम सुंदर मोर्पिसासारख्या......

फक्त हुळूवारपणे जपायला लावणाऱ्या........................ !.

==========

May 3, 2013 · Mumbai

आकडे आणि मी यांचा छत्तिसचा आकडा आहे. मी त्यांच्या वाटेला जात नाही आणि ते माझी लायकी ओळखून असावेत. पैश्याचा व्यवहार म्हणजे आकडे, ते नवरा समंभाळतो. मी आपली उगाच यक:श्चीत सहीची मालकीण. माझा हिशोब सुधारण्यासाठी घरच्यांनी माझ्यावर बरेच प्रयोग केले पण यशाने नेहमीच त्याना हुलकावणी दिली. प्रकरण अंगाशी आलं कि काय काय प्रकारे ते झटकून टाकता येईल हे मी शिकले. अं, जसं समजा मला मोजून पैसे दिले आणि त्या पैश्याचा हिशोब तुला द्यावा लागेल असे सांगितले कि मी सावध खेळी खेळते, हिशोब निट जमला नाही पैसे उरले, कि मी आधी बरेच पैसे पर्स मध्ये होते असं सांगते नाहीतर मैत्रिणी भेटल्या सगळयाना घेऊन गेले खायला असं सांगून हिशोब पुरा करते. शेवटी भाजीवाली तुझ्यापेक्षा हिशोब लवकर करते असा शेरा मारून माझी फाईल बंद होते. आता माझी पर्स हि कॉमन बँक झाली आहे/ सुट्टे किवां बंदे पैसे मिळण्याचा सुकर मार्ग .........प्रत्ये क जण सांगतो पण ............. मलाच नक्की आठवत नसल्यामुळे मी कोणालाही काही विचारत नाही. कधी असं होतं मलां कोणीतरी काही आणायला सांगत मी आणून देते आणि समोरचा सोयीस्करपणे पैसे द्यायला विसरतो मी वाट बघते चार, दहा दिवस आणि मग हिमुसून गप्प बसते ...... ते मागण्याची हिम्मत नसते मग मी मनाची समजूत घालते कि कदाचित आपण त्याचं मागच्या जन्मीचं देण लागत असू .........मध्ये बराच काळ जातो अन मग लक्षात येत अरे मागच्या जन्मी आपण बऱ्याच जणानां फसवलेलं दिसतय ..................!!

=========

May 3, 2013 ·

केतकी, प्रत्येक माणूस फुला इतका निर्मळ नसतो ग .... असता तर हे जग किती सुंदर होतं ......पण काही मन मात्र खरोखरी सुंदर असतात आणि मग आपण त्या मनाच्या प्रेमात पडतो !!!

=========

May 3, 2013 ·

किती खरं ग !!

नात्यांचा गुन्ता

आणि

गुंतलेली नाती ...

नाती सुखावतात ...नाती दुखावतात ....

मन जपणारी नाती क्वचितच असतात.

=========

May 4, 2013 · Mumbai

नसतेस घरी तू जेंव्हा ... जिव तुटका तुटका होतो .... असं विव्हळणारे पतीदेव किवा बायको माहेरी कधी जाईल आणि तिचे माहेराहून येणे कसे लांबेल याची वाट पहाणारा पतीदेव .... दोन परसस्पर विरोधी प्रतिक्रिया .... ( शक्य असतं तर मांजरीसारखं गोणीत घालून दूरच्या माहेरी सोडण्याची कल्पना पण बरी आहे ) लग्नानंतर स्वातंत्र्य संपल म्हणणारा नवरा ते स्वातंत्र्य अबाधित कसं राहील याची (च ) काळजी घेत असतो. (काही सन्मान्य अपवाद असतीलही ) पण आपल्या गुणवंत बायकोला साप साप म्हणून धोपटणारे कमी नाहीत. (शब्दश : अर्थ घेऊ नये ) असं मानू कि आज लग्नाचं वय ३० आहे तर गेली तीस वर्ष त्याला आईची सवय आहे .... ती सवय एकदम सुटणार नाही. आलेली मुलगी घरात रुळायला हि वेळ लागणार पण मुलगा कोणाच्याहि हातातलं बाहुल बनत नाही .......... जसं जसा काळ जातो तसं तशी त्याला आपल्या सहचरीणीच्या सहवासाची, टापटीपीची, तिने केलेल्या पदार्थांची ...थोडंयाशा धिटाईने कमावती असेल तर पैशांची सवय लागते. कोणतीही सवय वाइट्च. सध्या माझ्या नवऱ्याला एक मोठी चिंता सतावते आहे ... माझ्या पच्शात त्यांचे जेवणाचे किती हाल होतील ...... ऐकून माझा आत्मा तृप्त झाला. त्या निमित्ताने भरल्या (? ) ताटावर बसून माझी आठवण तर निघेल ............... बघा भारतिय नारी कसे सुखाचे शिडकावे शोधत असते. 'माहेरची माणसे' हे एक बायकोची खिल्ली उडविण्याचं बलस्थान. यांची सगळी माणसं देवगणातली आणि आमची राक्षसगणातली ... यांच्या बहिणी पंचक न्या स्मरे नित्यम आणि आमच्या गुलाबी GANG वाल्या .... अरे किती नावं ठेवाल? ( मला म्हणायचं कुठे पाप फेडाल? ) बोलून उपयोग नाही । तशी भारतीय पुरुष हा रडण्यात

कमीपणा मानतो .... तो सदैव लढायला तयार असतो. (सन्मान्यांनी आपणास वगळावे ) लग्नापर्यंत होयबा नंतर नंतर मेरी सुनो !'मला अवेळी घरी आलेलं चालणार नाही, आईचं घर सोडून आलीस म्हणजे माझ्यावर उपकार केले नाहीत पगाराची स्लीप दाखवत जा ............. एक ना अनेक. बिचाऱ्या भारतीय नारी नवऱ्याच्या आज्ञा झेलत झेलत आयुष्य सार्थकी लागलं म्हणत प्राण सोडतात .........

==========

May 8, 2013 · Mumbai

माणसं ओळखणे हि एक कला आहे. भले भले सुद्धा येथे फसतात तर माझी काय कथा !! माणसं ओळखणे, वाचणे, समजणे त्यंच्या बद्दल अंदाज बांधणे या उंच सखल पायऱ्या आहेत. या पायऱ्या चढताना आपण दरवेळी यशस्वी होऊच असे नाही कधी कधी तोंडावर आपटायलाहि होतं. कधी मनातंल्या मनातं हसू येते, कधी कपाळावर हात मारावासा वाटतो. हवामान खात्या सारखे अंदाज कोलमडून पडतात. यांच्या कडून शाबासकीची अपेक्षा करावी तर हे नाक मुरडतात आणि आपण एखादी शुल्लक गोष्ट करावी तर यांच्या टाळया ऐकू येतात. .........माणसं ओळखण्याची एखादी शाळा आहे का ... किमानपक्षी एखादा क्लास ......? ?

============

May 9, 2013 · Mumbai

आपण झोपतो कशासाठी,, स्वप्न पहाण्याचं स्वप्न पहाण्यासाठी ... ती अद्भुत मनोहारी दुनिया जिथे जे नाही ते आहे असा भास निर्माण होतो ती दुनिया......... स्वप्न !!नको असलेलं फेकून द्याव, पाहिजे तेच खरं मानावं. ख़ोट खरं समजावे आणि खऱ्या ला खोट्याचे लेबल लावावे ... खऱ्या आयुष्यातल्या खोट्या लढाया प्राण पणाने लढाव्या आणि खऱ्या लढाया भ्याडासारख्या सोडून जाव्या ... भावनांच्या समुद्रात खोल डुबून यावं ...चमत्कारी, भुलवणारी स्वप्न नगरी !!एका स्वप्नातून दुसऱ्या स्वप्नातली लांब उडी .... अजून एक गंमत. या लांब उडीतून सुरु होते एक मस्त धमाल किवां एक भयावह पाठलाग .......... असं वाटतं स्वप्न संपूच नयेत, अनंत काळ चालू रहावीत ....... पण त्यासाठी झोपलं पाहिजे ..................

============

May 11, 2013 · Mumbai

जास्वंदीचं लाल चुटूक फुल, बाप्पाचं आवडत, हिरव्यागार पानातून डोकावणारी टपटपीत कळी ... मऊशार स्पर्शाची, आदल्यादिवशीची कळी, दुसऱ्या दिवशी पूर्ण फुलात बदलते ... हे फुल हसून जगाकडे बघत .... आतले पिवळे पराग कण डौलाने दिमाखात उभे रहातात .... जसा सूर्य मावळतो ... फुलही कोमेजत ...पाकळय़ा मिटून जातात ...... दुसऱ्या दिवशी हेच फुल गळून झाडाच्या बुंध्याशी पडत हतबल मलूल ...... कितीस आयुष्य या फुलाच? फक्त एक दिवस ! पण या एका दिवसासाठी हे फुल उमलत आनंदी रहात ....... आपण हसत आपल्यालाही हसवत ...... आपल्याकडे कितीतरी हजार दिवस असतात ...

============

May 15, 2013 · Mumbai

येणारा पै पाहुणा, गृहिणीची लगबग ...

घराचं नीटस असण, मुलाचं गोंडस वागणं ...

किचन मधली हासती भांडी, भाजीपाल्याची दंगा मस्ती ...

घरभर दरवळणारा खमंग सुवास .......

हसणाऱ्या या घरात .........

पाहुण्याना मिळतो पाहुणचाराचां सुरेखसा ..........

वर्ख लावलेला विडा ............

============

May 16, 2013 · Mumbai

कातर संध्याकाळ, अचानक ठरवलेली ती भेट ..........

उगाच पाझरून येणारे डोळे ....

तिचा समजावंणीचा सूर, त्याचा बेदरकार भाव .........

सारे सारे नकोसे झाले .... आणि ............

आकाशात ढग दाटून आले ......

बुडता सूर्य पार नाहीसा झाला ..........

संधी प्रकाशानेही काढता पाय घेतला ......

पावसाची धो धो बरसात सुरु झाली ......

मात्र दोन मने नेहमीसाठी एक झाली .........।

=============

May 16, 2013 · Mumbai

नोकरी करणाऱ्या काय किंवा न करणाऱ्या .... आजकालच्या सगळ्याच महिलाना multitasking करावं लागत. स्वयपाक, मुलांचा अभ्यास, आपल्या कामाच्या ठिकाणी लागणारी आवश्यक तयारी, दुसऱ्या दिवशीचं कामाचं नियोजन एक ना अनेक, एकाच वेळी अनेक गोष्टी करण किंवा त्या होतील याचा पाठपुरावा करण याचा मनावर प्रचंड ताण येतो. .... मन विचारांच्या भुंग्याने पोखरून निघते. या ताणामुळे कधी कधी शारीरिक त्रासहि सुरु होतो. याशिवाय स्त्रिया या भावूक असतात, जीव ओतून काम करण्याची वृत्ती असते, वेळ इथे वाचवून तिथे कसा जास्त देता येईल याचे गणित मनातं सुरु असते .........पुरुषही multitasking करतो पण त्याच्या स्वभावातून ते आपल्याला जाणवत नाही. आनंदही तो तितक्याच मनोभावे साजरा करतो आणि कामाचही टेन्शन घेत नाही. स्त्रीला हे जमल तर कदाचित ती आहे त्यापेक्षा जास्त सुखी होईल. जास्त ताण येऊ न देता काम तडीस नेणे हा पुरुषांचा चांगला गुण शिकण आपल्या फायद्याचं व्हाव.......................

==========

May 17, 2013 · Mumbai

मृत्यु समोर दिसताना, त्या मृत्युवर मात करून जगणे सुकर करावे कि ......की त्याचे भान आहे म्हणून जास्त चांगले जगण्याचा प्रयत्न करावा .........

==========

May 18, 2013 · Mumbai

भिनी भिनी खुशबू मनको मधुर एहेसास कराती है .........

मनपर सुगंधकी बौछार कराती है ...............

मनका पंछी दूर दूर तक उड पाए ..........

ऐसी हर जादू हरदम कराती है .............

==========

May 18, 2013 · Mumbai

तिच्या मनाचा बालीशपणा दूर कुठेतरी मागे सरलाय. विचारांची अनंत मंडल आजूबाजूला फेर धरून नाचतायत स्त्रीच्या

भावमनातिल सर्वात महत्वाचा पण तितकाच नाजूक निर्णय ती घेतेय .... ... हे भारलेपण हवहवस वाटतंय, यातील उत्सुकता, अधीरता, सुंदरता हरपू नये असं वाटतंय तिला ...मी पण परत परत हात जोडून देवाकडे प्रार्थना करते, देवा हे सगळं असंच सुंदर असू दे. याचा शेवटही गोडच होवू दे !!

==========

May 24, 2013 · Mumbai

आपल्या या जाळीदार वीणीच्या नक्षीदार आयुष्यात अनेक प्रसंगांची उलट सुलट विण नियती घालत असते. कधी सुई वरून जाते कधी खालून, कधी तिरकी कधी सरळ, कधी दोनाचा एक तर कधी एकाचे दोन ...यातली एखादी विण एखादा टाका उसवत जातो ... कुठे आणि कसे जुळवावे कळत नाही ......... आयुष्यातल्या आठवणी अशाच, कळत नाही, कुठल्या साठ्वाव्या अन कुठल्या सोडाव्यात .... अगदी बाळपणापासूनचा तो काळ आठवत राहातो ...... त्या अनुषंगाने आठवते एखाद पुस्तक, शिक्षक, मैत्रिण, हातावर मारलेली पट्टी, परवचा, मनाचे श्लोक, सागर गोटे, चिमणीच्या दाताने तोडलेली कैरी, कवितेची चाल, झिपरी बाहुली ......तो प्रसंग चित्र रुपात आठवतो ...... ते तसं का घडल या कारण मीमांसेत मन अजुन हळवं होतं ....... चिंध्यांची ती झिपरी

बाहुली ......मला वाटते मुलींच्या भावविश्वातला हळूवार कोनाडा ...हि बाहुली एक विशिष्ठ काळ बरोबर असते ......... पण तिची साथ मात्र सुटत नाही .... तीचं नकट नाक, घारे डोळे ...आठवतात ......कच्चा भात आठवतो ....... मला वाटतं बालपणीचं शिक्षण या बाहुलीच्या साथीनेच सुरु होत असतं ....... तरुणपणात आपणच बाहुली म्हणून मिरवत असतो ....... आई होण्याची चाहूल लागते आणि ... काळया डोळयांची, कुरळया केसांची सुरेख बाहुली आपल्या कुशीत यावी असे प्रत्येक स्त्रीला मनोमन वाटते ....... या बाहूलीच्या रूपाने जणू तिला स्वत : साठी एक मैत्रिण हवी असते ......तिच्या रक्ता मासाची, तिच्या संस्कारांची ...... उसवलेली विण बाहुली पर्यंत आली ......

==========

May 29, 2013 · Mumbai

तुझ्यातली मी मला कधी भेटलीच नाही ......

. दूर जातानाही तिची सावली देखील दिसली नाही .........

==========

May 29, 2013 · Mumbai

वारा अचानक पडून गेला ....

पालापाचोळा निपचित झाला ......

झाडांच्या फांद्या निशब्द होवून ......

फुलांचे हितगुज ऐकू लागल्या .......

==========

May 29, 2013 · Mumbai

. काळयाभोर ढगांचा तो विशाल पुंजका

खाली येत रेंगाळला ....

वारा मात्र ढकलत त्याला .........

दूर घेऊन गेला .......

==========

May 30, 2013 · Mumbai ·

माझ्या सारखाच तोही कलेकलेने वितळत होता ...

माझ्या वितळण्याला अंत नव्हता ...

त्याचं वितळण मात्र काळापुरतच होतं ...

रात्रभर तोही वाट तुडवत होता .......

माझ्या सारखाच वण वण भटकत होता ....

क्षणात ढगांची चादर लपेटून आपला चेहरा लपवत होता ......

मी पायातले काटे वेचीत त्याच्या कडे पहात होते ....

तो मात्र ओळख चुकवून दिसेनासा होत होतां ......

==========

May 31, 2013 · Mumbai

आठवतात....... त्या तुझ्या माझ्यातल्या गोष्टी? नक्कीच आठवतील. कारण तू त्याना जपलयस .... शेल्फ मधील पुस्त्कांसारखं ......तरीपण .... कशाची निवड करशील कोणास ठाऊक ......वर खाली होणाऱ्या तुझ्या विचार आवर्तनांची .... मलां चांगलीच सवय आहे ......

==========

May 31, 2013 · Mumbai ·

ती येते एक अनामिक सुगंध घेऊन
पसरवते सर्व आसमंतात बेधुंद होवून
प्रश्न मात्र एव्हढाच आहे की ...
माझ्या सारख्या उपेक्षित फुलाने करायचं काय?

मैत्री खातर तिच्यात मिसळायचं ......

कि स्वतःहून स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडायचं?

==========

May 31, 2013 · Mumbai ·

आठवतात....... त्या तुझ्या माझ्यातल्या गोष्टी?

नक्कीच आठवतील. कारण तू त्याना जपलयस ....

शेल्फ मधील पुस्त्कांसारखं ......

तरीपण ....

कशाची निवड करशील कोणास ठाऊक ......

वर खाली होणाऱ्या तुझ्या विचार आवर्तनांची ....

मलां चांगलीच सवय आहे ......

==============

May 28, 2013 · Mumbai

जीवनातं येतात असे काही क्षण, अशा काही व्यक्ती ज्या आपलं जीवन अधिकाधिक सुंदर बनवतात. फ़ुलकऱ्याच्या हातातला हार जसा तो

एक एक फुल घालतो तसा तो जास्त सुंदर दिसतो .... हि फुलही लहान मोठी, रंगीत पांढरी ...वरून सुंदर कलाबूत लावली जाते आणि हाराची शोभा वाढते ...... आयुष्यात येणारी माणसं हि तशीच ... यातली कलाबूत म्हणजे अनेक मंतरलेले भारलेले क्षण, ज्या धाग्यात हा हार गुफला जातो ते हळवे क्षण ...कधी अचानक ......... धरलेला हात सुटतो. क्षण अजून हळवे होतात ... हारातली फुले कोमेजतात ना अगदी तसेच ... हात सोडून गेलेले ते क्षण... आज आठवताना असं वाटतं हे क्षण अजून चांगल्या प्रकारे घेता आले असते ...... दुखाचा कडू घोट गिळल्यानतर चिमूटभर साखरहि तोंडात टाकता आली असती. ...... रागावून, संतापून जगण्यापेक्षा ...... बर्फाची पिशवी वापरता आली असती ......... सुटलेली साथ ......त्याचं दु :ख करण्यापेक्षा त्या साथीने मला काय दिले ......... हे आठवून त्याचा आनंद साजरा करता आला असता ......हर बीता हुवा वो लम्हा ...............साथ छोड़ता. साथ बटोरता|

=========

May 23, 2013 · Mumbai

खरतर सुखाच्या प्रत्येकाच्या व्याख्या वेगळया असतात. "आज मला एकवेळ पोटभर जेवण मिळू दे " हि एका, खूप दिवस उपाशी माणसाची सुखाची कल्पना असेल .......... कदाचित प्रत्येक दिवस, जीवनातील प्रत्येक टप्पा हा सुखाच्या वेगवेगळया कल्पनांनी सजत असेल .... हरएकजण सुख दु:खाच्या हिंदोळयावर झुलत असतो हा झोका किती उंच जाणार याचं भानही माणसाच्या ठायी असतं. पण मनाचं पाखरू मात्र

रुंजी घालत रहात सुखाच्या शोधात ... जणू म्हणत ... क्षण एक पूरे सुखाचा ......

=============

May 23, 2013 · Mumbai

सुख म्हणजे नक्की काय असतं ...? काय असतं सुख? ... एक संकल्पना .... एक आभास .... का फक्त आपल्याला हवं ते आणि हवं तसंच जग? सुख मानण्यावर असतं? सुख सुख म्हणतात ते असतं तरी कुठे? आणि मिळत कस? .... जगी सर्व सुखी असा कोण आहे ...... हे माहित असून सुद्धा आपण या सुखाला शोधत असतो. जीवनभराची धडपड सुखी माणसाचा सदरा शोधण्या साठीच असते. एक स्त्री म्हणून मला वाटते मी स्वतंत्र आहे .... मी सुखी आहे ... खरंच असं असतं का? सुखी होण्याचे निरनिराळे मार्ग आपण शोधतो ...... पण अचूक मार्ग .........' माझ्या कडे सुखाने पाठ फिरवली ' हे एक परवलीचं वाक्य, घासून गुळगुळीत झालेलं ....... माणूस म्हणून प्रत्येकाच्या तक्रारी वेगळया ... पण सुरावट तिच... आयुष्याच्या बाजारात सुख नक्की कुठे मिळेल आणि कसं मी ते घेऊ हे शोधता शोधता .... सुख मात्र हातावर तुरी देत ............ सुख म्हण्जे नक्की काय असतं .........?

=========

May 22, 2013 · Mumbai ·

काही प्रश्न अन त्यांची उत्तर .... ... कधीच मिळत नाहीत. कधी वाटतं हे प्रश्न अनुत्तरीत आहेत तेच बरं आहे नाहीतर .........मनावरचे ओरखाडे अजून तिव्र होतील, न जाणो रक्ताच्या बारिक थेंबांची नक्षी नकळत उमटेल .........

===============

May 21, 2013 · Mumbai

आवाजाची एक दुनिया असते, गाणारे आवाज नाहीत, काही असे आवाज जे आपण कधीही विसरू शकत नाहि. त्या आवाजाना ऐकता ऐकता आपण मंत्रमुग्ध होतो. समयोचित शब्द, मृदू मुलायम भाव, समोरच्याच्या अस्तित्वाची घेतलेली काळजी ....... आणि मग सुरुवात त्या संभाषणाची जे कधी संपूच नये असं वाटतं .......

=========

May 21, 2013 · Mumbai

अथांग सागराच्या या लाटा अविरीत फुटणाऱ्या, पुढे पुढे उचबळत येत आपल्या मनीचे हितगुज सांगण्यास उत्सुक अहमिकेने किनाऱ्या कडे धावणाऱ्या............. पण कितीशा पोह्चतात किनाऱ्यापर्यंत? .........मधेच विरून जातात फुटून जातात, अलगदपणे एकमेकीत मिसळून जातात .........भावनाही तशाच .... विरघळून जातात न बोलता .......... !

===========

May 20, 2013 · Mumbai

संध्याकाळ डोंगराला वळसा घालून झुकती झाली ....

वाराही नम्र झाला .......

अंधाराने सुरु केला उजेडाचा पाठलाग ...............

चढ चढून चढून थकलेले पाय ......

घामाच्या धारांनी भिजलेली मान .........

मन मात्र निवांत, शांत .......

जणू आत्मभेटीचा आनंदच .......... !!

========

May 18, 2013 · Mumbai ·

तिच्या मनाचा बालीशपणा दूर कुठेतरी मागे सरलाय. विचारांची अनंत मंडल आजूबाजूला फेर धरून नाचतायत स्त्रीच्या भावमनातिल सर्वात महत्वाचा पण तितकाच नाजूक निर्णय ती घेतेय .... ... हे भारलेपण हवहवस वाटतंय, यातील उत्सुकता, अधीरता, सुंदरता हरपू नये असं वाटतंय तिला ...

मी पण परत परत हात जोडून देवाकडे प्रार्थना करते, देवा हे सगळं असंच सुंदर असू दे. याचा शेवटही गोडच होवू दे !!

============

May 12, 2013 · Mumbai

कसे आवरू मना? ? , माझ्या मनातंली गोष्ट, मनातं आल, अन केल, मनाचे खेळ ....... मनाशी संबंधित नाना विधाने देहाचं सहावं इंद्रिय !!एक काळोखी गुफा ......... एक खोल विहीर ...... उजेडाचा मळा ...मनाचा वेध घेणे खरंच कठीण आहे. कधी मनाला आनंद होतो कधी दु:ख, कधी वेदना, कधी फुलपाखरू ! कधी मन चोरी होते कधी अंगारा सारखे क्रोधीत .... अनेक भावनांचा झेला? अनेक प्राण्यांचे संमेलन .... या मनाचा पाठलाग करणे अशक्य होते. आपलेच मन आपण दाखवू शकत नाही. माझ्यातली मी कधी शांत कधी अशांत ......... बहिणाबाईनि अगदी खरं सांगितलं आहे मन वढाय वढाय उभ्या पिकातलं ढोर .......... आणि त्यांच्याच ओळीत ...... अरे इंचू साप बरे याले उतारे मंतर

==========

May 1, 2013

तज्ञ हि एक मजेदार जात आहे, काहीवेळा तज्ञ हे बिरूद अचानक नावामागे चिकटत आणि काहीवेळा बिरूद मागे असूनही त्यां तज्ञाला कोणीही खिसगणतित धरत नाही. (दैव एकेकाच!!! ) उदयाला आलेले तज्ञ हि एक अजून वेगळी तऱ्हा. हे प्रसिद्ध पावलेले 'तज्ञ ' आपल्या तज्ञप णाची अशी काही चौफेर फटकेबाजी करतात की, भल्याभल्याना त्यांच्या समोर बोलायची संधीच ते देत नाहीत ............ कारण' ते तज्ञ '! >>>>>>असे बरेचसे तज्ञ पहायला मिळतात निरनिराळया

वाहिन्यानच्या 'खास बात' मध्ये. काहीवेळा या तज्ञानां पकडून आणले असावे अशी शंका यायला बराच वाव असतो. कदाचित हा स्वखर्चाने आलेला तज्ञ प्रसिद्धीच्या लालचेपायी प्रकाशात येतो आणि आमचं दूरदर्शन त्याला फुकटात 'तज्ञ' बनवत. पण असेही 'तज्ञ' आहेत ज्यांच्या जवळ सांगण्यासारखं खूप आहे जे ...... अधिक प्रभावी, अधिक उत्तम आहे पण हे व्यक्त करण्याची संधी त्याना मिळाली नाही किवां दिली गेली नाही ( ते संधी साधू नाहीत म्हणून की काय.. )... अशी संधी मिळाली तर तेही "हिरो " होतील.

==================

April 23, 2013

सूरमयी संध्या, जसजशी जवळ येते

आठवण फक्त तुझीच, मनी दाटून येते

कंठ दाटून येतो, डोळे पाझरू लागतात

अंधार मात्र जास्तच गडद होत जातो

आणि मग ...................

आशेचं पाखरू त्या काळोखी घरट्यात ...मुकाट बसून रहात .........

========

============ 2012=====================

दिल्लीत काय किंवा देशभर काय बल्लातकाराच्या ज्या घटना आपण ऐकतोय त्या पार्श्वभूमीवर शिवाजीराजेंच्या कारकिर्दीतील एक गोष्ट आठवते...... कल्याणच्या सुभेदाराचा खजिना लुटून राजांचे सैन्य जेव्हा माघारी आले तेव्हा सोन्या चांदीच्या आणलेल्या लुटी बरोबर एक अत्यंत लावण्याखणी असा अनमोल खजिना राजेना सादर करण्यासाठी आणला गेला.... मेण्यातून सुभेदाराच्या सुनेला जेव्हा दरबारात आणले गेले तेव्हा राजानी एक क्षण तिच्याकडे पहिले आणि ते म्हणाले, "आमची आई जर अशी रूपमती असती. तर आम्हीही सुंदर झालो असतो. ". त्यांनी दरबाराला आज्ञा करून तिचा योग्य सन्मान केला, साडीचोळी दिली व तिला परत तिच्या सासरी पाठवले, याला म्हणतात स्त्री दाक्षिण्य , संस्कृतीची चाड, शुद्द वर्तन परस्त्री बद्दल असणारा आदर... मन उद्विग्न होते सगळयाची चीड येते आणि नकळत एक विचार मनातं स्थिरावतो.. स्त्री. पुरुषांच्या बरोबरीने सर्व काही करते पण तिची बोळवण शेवटी एक उपभोगीय बाहुली म्हणूनच होते.............................. !!!!!

======19. 12. 12===========

माणूस जन्मतो तो अंगावर कसलीतरी खूण घेऊनच. कधी त्याच्या अंगावर एखादा तिळ असतो तर कधी एखादं आकाररहित चिंन्ह! अपघात झाल्यावर कुठे लागल्यावर त्या जखमेचा व्रण अंगावर शिल्लक राहतो, मग आपण म्हणतो हि मला लागल्याची खूण आहे. त्या खुणेवरून अपघाताचा पूर्व इतिहास आपणास आठवतो.. एखादी विशिष्ठ वस्तू आपल्याला भूतकाळात घेऊन जाते, त्या अबोल स्मृती जागृत होतात अन

सूर उमटतात...... अजून त्या झुडपांच्या मागे सदाफुली दोघांना हसते अजून आपुल्या आठवणीनी शेवंती लजवंती होते !! सैनिकाच्या अंगावरील लढाईच्या खुणा ह्या त्या सैनिकाचे शौर्यच जणू आपणास सांगतात. लढाईच्या आठवणीने, त्या खुणा पाहून सैनिकाचे रो रोम फुलून येतात. चोर चोरी करतो पण आपल्या अस्तित्वाची खूण तो मागे ठेवतो आणि मग तीच खूण त्याचं आयुष्य धोक्यात आणते. मऊ रेतीत अन चिखलाच्या भागात पावलांचे ठसे उमटतात, या खुणांवरून मार्ग काढणे अगदी सोपे असते. ताजमहाल एक प्रितिचिन्ह आहे. एका बादशाहने आपल्या पत्नीवरील प्रेमाची खूण म्हणून ताजमहालसारखं श्वेतकमल या जगात निर्माण केलय. जगातली प्रत्येक वस्तू हि कसली तरी खूणच आहे. प्राचीनकाळी निरनिराळी लेणी आणि स्तूप कोरली गेली आणि म्हणूनच आज प्राचीन शिल्पकलेच्या खुणा आपल्यात शिल्लक आहेत. अथांग सागर पसरलेला आहे, त्याच्या लाटा आपटत आहेत किनाऱ्यावर, भरतीच्या आणि ओहोटीच्याहि कुठे राहतात त्यांच्या खुणा? आकाशात चंद्र, सुर्य उगवतात -मावळतात, ढग येतात जातात, ग्रहणे होतात, धुमकेतू झपाटतात, तारे लुकलुकतात........ कुठे राहतात त्यांच्या खुणा? ? आकाश पुन्हा लक्ख, निरभ्र, नितळ, निळे दिसते.........

============18. 12. 12===========

सागराची निरनिराळी रूपे पहिली कि मनातं अनंत विचार येतात. अमर्याद पसरलेला सागराचा जलसंचय पाहून आपले खुजेपण लक्षात येते, त्या पाण्याकडे पाहताना छाती दडपून जाते, असं वाटते एक छोटीशी लाट बोल बोल म्हणताना आपला हात धरून आपल्याला ओढून नेईल. रात्रीच्या शांत वेळी त्याची गाज मन चलबिचल करते. सकाळच्या

सूर्यप्रकाशात चान्दिसारखे चमचमणारे हे पाणी मात्र मनाला मोहविते. दिवसभरात या पाण्याची विविध रूपे जाणवतात. भरतीच्या वेळी घोगावत येणाऱ्या लाटा त्यांच्या विक्राळ रुपामुळे भीतीदायक वाटतात. किती शक्ती आहे या समुद्रात ! मोठी जहाजे गडप करतो हा आपल्या उदरात. थरार आणि मोहकता दोनही याचीच रूप. असा हा अनाकलनीय समुद्र आपल्या पोटातील जलचरांचा खजिना मात्र उदार हस्ते आपल्या पोटभारीसा ठी देतो.

==============10. 12. 12===========

बीजाचं रोप होतं, त्याला अंकुर फुटतो त्याचं पुढे झाड होतं, एक सुरेख काळी त्यावर उमलते आणि त्या कळीचे रुपांतर फुलात होतं, तेव्हा त्या कळीचं अस्तित्व संपलेलं असतं. हे सुंदर फुल सुगंध निर्माण करतं पण किती क्षणिक ! फुल सुकलं कि त्या सुगंधाची सौंदर्याची खूणही नाहीशी होते पण बकुळीचं ईवलेसे फुल मात्र सुकले तरी आपल्या अस्तित्वाची खूण म्हणून मधुर मंद सुवास मागे ठेवते. निसर्ग खुणा मागे ठेवतो मानावे तर तो त्या सफाईदारपणे पुसूनही टाकतो.......

=============23. 11. 12========

जीवनातं येतात असे काही क्षण अन अशा काही व्यक्ती कि ज्या क्षणात माणूस बदलून टाकतात. उताराला लागलेला माणूस थोपवला जातो सोयीच्या मार्गावर वळवला जातो, तो क्षण हाती परीस घेऊन येतो आणि लोखंडाचे सोने करतो.

========19. 11. 12=======

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील  सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. त्याशिवाय वर्षाला सुमारे तीस ते चाळीसलाख वाचक वेबसाईटवरून पुस्तके डाऊनलोड करतात.

अर्थात याने आमचं समाधान नाही. सुमारे बाराकोटी मराठी माण्सांपैकी किमान अर्धे म्हणजे सहा कोटी लोक "वाचक" व्हावेत अशी आमची इच्छा आहे. माउलिंनी सांगितलंय. "जो जे वांछिल ते तो लाहो". आमचीही वांछा "तो" पूर्ण करील. करीलच.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail.com या पत्त्यावर पाठवा बरं!